
कविकुलगुरु - कालिदास - संस्कृत - विश्वविद्यालयः

श्रीगणेशायनमः ॥ श्रीहंसगुरवेनमः ॥ ॐ नमोशिवगुरुहंसा ॥ सच्चित्सुखाकारासुवेषा ॥
निरालंबशांतप्रकाशा ॥ निष्प्रपंचाद्या ॥१॥ नमोकल्याणस्वरूपका ॥ नमोस्वयंप्रभा
महार्का ॥ नमोचित्सुखप्रदायका ॥ त्रिकालाबाध्या ॥२॥ नमोचराचरनिवासा ॥ चिद्रू-
पदीपाअविनाशा ॥ निरस्ताज्ञानस्वप्रकाशा ॥ जगज्जीवना ॥३॥ नमोसदसद्विवेच-
का ॥ मुक्तमुक्ताहंताच्छेदका ॥ नमोबंधमुक्तीग्रासका ॥ अतीतगुणा ॥४॥ नमोअमू-
र्तामूर्तिधरा ॥ नमोजीनिर्विकाराकारा ॥ नमोजीलाविग्रहासारा ॥ अपरिणामा ॥
॥५॥ नमोएकास्वकीयाश्रया ॥ नमोपूर्णैकतेजाद्वया ॥ नमोअतीतामायामया ॥ नि-
र्मलरूपा ॥६॥ नमोमहातेजाप्रखरा ॥ नमोसौम्यतेजाअपारा ॥ नमोअनुपम्यादेवें-
द्रा ॥ अनाद्यनंता ॥७॥ नमोजीयेशभेदभिन्ना ॥ देवभक्तोपाधिविहिना ॥ नमो-
जीमीतूं विलक्षणा ॥ केवलरूपा ॥८॥ जयजयजीपरात्परा ॥ देवाश्रीसद्गुरुउदारा ॥

आत्मस्वरूपासर्वेश्वरा ॥ निरूपाधिका ॥ ९ ॥ जयजयप्रणवरूपा ॥ सदसत्तातीतस्वरू
पा ॥ सविकल्पेंशी निर्विकल्पा ॥ अधिष्ठानिया ॥ १० ॥ जयजयजीसर्वगता ॥ जयज
यजी नित्यसता ॥ जयजयजीसर्वात्मता ॥ अपरिच्छेद्या ॥ ११ ॥ जयजयसमविहिना ॥
जयजयविषमाभिन्ना ॥ जयअद्वितीयानिर्गुणा ॥ अभेदरूपा ॥ १२ ॥ जयजय गुरुअ-
खंडा ॥ जयजयगुरुउद्दंडा ॥ जयजयजीआसिधारा ॥ अत्यंतसूक्ष्मा ॥ १३ ॥ जयगुरु
मंगलमूर्ति ॥ जयगुरुश्रीसरस्वती ॥ जयगुरुअंबिकापति ॥ ब्रह्मयाहरि ॥ १४ ॥
अखिलसृष्टितूंचहोशी ॥ परितेस्पर्शेनाचीतुशी ॥ कोणजाणेकैसाअससी ॥ स
द्गुरुराया ॥ १५ ॥ पुराणेंशीशास्त्रांचेवाद ॥ थकूनझालेनिर्विवाद ॥ हरलाशेषाचाहि
मद ॥ स्तवितांतूतें ॥ १६ ॥ आणिवेदाचियाअंगवणें ॥ थोरथोरांहेंदशाहोणें ॥ तेथें
मीतुझापारजाणें ॥ केवीघडेल ॥ १७ ॥ येथेवेदश्रुतीचेंएक ॥ प्रतीकघेणेंसद्विवेक ॥

तेंचनिषेधावधीशेष ॥ होइजेमौनें ॥ १८ ॥ मौनेंचिवेदाचियाश्रुति ॥ तुझियासा
क्षात्कारायेती ॥ जैशीसीतादेवीचीवृत्ती ॥ श्रीरामचंद्रिं ॥ १९ ॥ वेदस्तवेंपूर्णजाह
ला ॥ जनहीखुणेतेंपावला ॥ तोचिभावमातेंस्फुरला ॥ तुझियारूपें ॥ २० ॥ म्हणो
निसोडूनमीपणा ॥ निघालोंतुझियास्तवना ॥ नयनचाळिलानयना ॥ पहायाजै
सा ॥ २१ ॥ नातरीआदित्याचार ॥ भेटेंपरतलास्याव्योमीं ॥ कींतरंगगंगासंगमीं ॥
जैशियापरी ॥ २२ ॥ एवंदृश्यभासकारण ॥ सदसत्समूळखंडोन ॥ जाहलाजोतुज
शरण ॥ अनन्यभावें ॥ २३ ॥ तोचिअहंममतेहुनी ॥ कर्तृत्वभोक्तृत्वासोडुनी ॥ अज्ञान
तेंहीओलांडुनी ॥ पैलाडगेला ॥ २४ ॥ त्याशीचशिखासूत्रत्याग ॥ झालायसनाच्या
हीसांग ॥ हरलास्वरूपवियोग ॥ योगाचिसदां ॥ २५ ॥ अनिष्टअवघेंनासलें ॥ शोकां
चेंमूळचिखुंटलें ॥ निजानंदालागींलाभलें ॥ स्वानंदपद ॥ २६ ॥ ऐसाजोअखंडैकरस ॥

तोचिपूर्णपरमहंस ॥ परीयामूळेंका बिनाश ॥ रूपाचितुझी ॥२७॥ तेहीखळूपाव्हा
ययाशी ॥ तोचियोग्यनिःसंशयेंशी ॥ जैसाजनकाचे धनाशी ॥ पवित्रपुत्र ॥२८॥ ते
साच्चतुष्टयसाधनी ॥ तोचियेथ पावे मिळणी ॥ लवणाशी सिंधुजीवनीं ॥ सिंधुच-
जैसें ॥२९॥ झालेंजन्मत्याचेंसार्थक ॥ गेलासदैत्तअविवेक ॥ एकपणहाहीअशेष ॥
सरलाबोध ॥३०॥ आतांयेथूनपुढेंकांहीं ॥ बोलणेंचउरलेंनाहीं ॥ परीश्रीगुरुरूपा
बाही ॥ बोलायामातें ॥३१॥ भारतीयुद्धनपाहतां ॥ संजयजैसा होदेखतां ॥ तैसेंचि
मौननभंगतां ॥ बोलणेंपुढें ॥३२॥ ऐसेंहेंमंगळत्रिविध ॥ सुत्तचतुष्टयानुबंध ॥ ये
येकेलेंअसेविशद ॥ सहजास्थिती ॥३३॥ इतिश्रीअमृतार्णवस्य त्रिविधमंगळा
नुबंधचतुष्टयव्याख्यायाः प्रथमसर्गः ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ छ ॥ ॥

श्रीहंसगुरवेनमः ॥ आतां साधनचतुष्टय ॥ कैसेंतेंसांगेंयथान्वय ॥ आणून श्रोत्यांचा आशय ॥ बोलतवक्ता
॥१॥ विवेकवैराग्यसाधन ॥ चौथीमुमुक्षापरिपूर्ण ॥ हें साध्यचा तुरंगसैन्य ॥ जयश्रीत्याशी ॥२॥ कामादि
कशत्रुदुर्धर ॥ यांशींबळेंवीनसमर ॥ करूंगेलियाअनिवार ॥ महाभयचि ॥३॥ मित्रत्व होतेंजें पहि
लें ॥ घालवूनवैरजोडिलें ॥ तरीप्राणीसुखामुखलें ॥ इहपरत्रीं ॥४॥ कामबळेंस्वर्गादिजोडे ॥ कामह
ननेंमोक्षघडे ॥ दोन्हीनसतांअंगींपडे ॥ निषिद्धाचिया ॥५॥ तेणेंप्रपंचपरमार्थ ॥ जाऊंबुडे निजस्वा
र्थ ॥ नरकवासाचा अनर्थ ॥ आदळे अंगीं ॥६॥ ह्मणोनि यांसावधपणें ॥ प्रयत्नेंहें कार्यसाधणें ॥ त
रीचहोयश्लाघ्यवाणें ॥ जिणेंआपुलें ॥७॥ श्रोतींपरिसावेंसादर ॥ विवेकह्मणजेविचार ॥ निवडा
वेंअसारसार ॥ वेगवेगळें ॥८॥ सारतेंब्रह्मासस्वरूप ॥ असारमायानामरूप ॥ ज्याशीह्मणतीअ
ध्यारोप ॥ समस्तश्रुति ॥९॥ अध्यारोपतोहाअध्यास ॥ समूळसर्वदृश्यभास ॥ येविषयीं होणें
विरस ॥ वैराग्यतेंचि ॥१०॥ वैराग्यसाधावयायुक्ति ॥ पाहिजे साधनसंपत्ति ॥ शमदमादिकनिश्चि

ती॥ साही प्रकारें॥११॥ अंतःकरण पंचकाशी॥ संलग्न की जे ब्रह्मात्म्याशी॥ तैं जरी पूर्व पापें त्याशी॥ न
धरी मंद॥१२॥ तरी मग ऐसें करावें॥ सगुण देवाशी चिंतावें॥ स निषिद्ध काम्य अघ वेंचें॥ सांडून ध्या
न॥१३॥ सगुण निर्गुणाचें ध्यान॥ तें जाणावें शम लक्षण॥ याशीच नाव उपासन॥ बाह्यांतरंग॥१४॥
बहिरंगोपासन स्थिति॥ स्थिर नाहीं केल्या चित्तीं॥ तरी पूजाव्या प्रेमें मूर्ति॥ सर्वेश्वराच्या॥१५॥
किंवा काम्य निषिद्ध त्यागें॥ विहित कर्म कीजे अंगें॥ ब्रह्मार्पण बुध्यनुरागें॥ आर्चा अभक्तें॥१६॥ आ
चेंशी नित्य नैमित्तिक॥ आचार दमाची ओळख॥ अंतबाह्य निश्चयात्मक॥ कर्म तें हेंचि॥१७॥ इं
द्रियां कर्मीं होतां रति॥ बाह्य विषयां होनिवृत्ति॥ तेचि विषयीं उपरति॥ कीं बाह्य तप॥१८॥ परी द्वं
द्वें शीतोष्णादिक॥ सोसावीं अंगीं अवश्यक॥ तैंच सत्तप सिद्धि चोख॥ कर्माची होय॥१९॥ ये विशीं
नुपजावा त्रास॥ याकारणें दृढ विश्वास॥ धरिला पाहिजे विशेष॥ श्रीगुरु वेदीं॥२०॥ वेद वाक्यें क
के परोक्ष॥ श्रीगुरु वाक्यें अपरोक्ष॥ हें जाणून उभयीं दक्ष॥ धरिती श्रद्धा॥२१॥ ये श्रद्धेशी तेंस्थि

रपणा॥ जें यथालाभें तुष्टि मना॥ शमादिक साही साधना॥ जाणावें ऐसें॥२२॥ हे शमादि षट्क संपत्ति
॥ इचेंचि नांव कर्म भक्ति॥ जे का श्रवणादि सख्यांतीं॥ भक्ति अष्टधा॥२३॥ नवमी आत्म निवेदन॥
तें ज्ञान भक्तीचें लक्षण॥ जे साधतां जन्म मरण॥ मिथ्यात्व नासे॥२४॥ न को वाटे मिथ्या बंधन॥
हे चि मुमुक्षुत्वाची खूण॥ कैं चुकेल जन्म मरण॥ भेटे कैं स्वामी॥२५॥ कैं पावेन मी निज सुखा॥ कैं
ना तळेन सुख दुःखा॥ केव्हां होईन होपारखा॥ बंध मोक्षासी॥२६॥ काय तरी करूं साधन॥ जे
णें लाभे गुरु निधान॥ ऐसा छंद लागला पूर्ण॥ अहिर्निशी ज्या॥२७॥ त्या छंदें पाषाण पादप॥ दि
सों लागले गुरु रूप॥ परी नाभि करें न अल्प॥ आश्वासी कोणी॥२८॥ म्हणोन धांव घे पुढारीं॥
तंव छाया देखे सामोरी॥ आला भव गज केसरी॥ वाटे न नमो॥२९॥ तेथें हीन दिसतां कोणी
॥ धायमोकली दीर्घ वाणी॥ आणि म्हणे कां न अजूनी॥ दयाळा येशी॥३०॥ अहो सूर्य चंद्र नक्षत्रा
॥ अहो वृक्षा गिरी समुद्रा॥ अहो ब्रह्मया हरि हरा॥ दावा जी स्वामी॥३१॥ मुंगीचें अंतर आणशी॥

अमृ॰ २

सर्ग २

तो तूं काय माझें नेणशी ॥ मी चकी हलभाग्य तुशी ॥ काय सांबोल ॥ ३२ ॥ परी गुरुराया सर्वज्ञा ॥
माझी ऐशी आहे प्रतिज्ञा ॥ मूर्छा मृत्यू तरही संज्ञा ॥ रक्षीन तुशी ॥ ३३ ॥ मरून शतधा जन्मेन ॥
परी येका तुज पावेन ॥ यांत अन्यथा नाहीं आण ॥ स्वामी तुझी च ॥ ३४ ॥ वेळेशी नुगवे चिचंद्र ॥ किं
वा वर्षेना जलधर ॥ तरी काय गतिच कोर ॥ चातका अन्य ॥ ३५ ॥ सूर्य उपेक्षी चक्रवाका ॥ तरीम
शी ही गुरुसखा ॥ परी पाहों ना ऐकों लिखा ॥ आज वरी या ॥ ३६ ॥ ऐसें जें तळमळें चित्त ॥ तेव्हां
चि तो मुमुक्षु सत्य ॥ अन्नार्थ घाबरा क्षुधित ॥ कळों ये जैसा ॥ ३७ ॥ कीं व्याघ्र समुदायीं गाय ॥
सांपडतां मोकली धाय ॥ तेणें चिरी ती स्मरें पाय ॥ श्रीगुरुंचे जो ॥ ३८ ॥ तो चि येक गुरुवचनीं ॥

पा

विश्वासेल मनापासुनी ॥ कोंडला गज जैसा वन्हीं ॥ न सोडी जळा ॥ ३९ ॥ बहुत्यीं कीं क्षारमधु-
रीं ॥ मुमुक्षु राहे समोत रीं ॥ सुकीं आणार केव्हां तरी ॥ प्रासा भीं जैसा ॥ ४० ॥ रळता हे जरीमरण
॥ का खेदें आता नाक कान ॥ मुमुक्षु तैसा सोशी शीण ॥ द्वंद्वाच्या अंगीं ॥ ४१ ॥ रोगनिवृत्ति चिये आ

८

श्रीराम २

शा ॥ पथ्यें नुबगे आर्त जैसा ॥ शमदम तपीं ही तैसा ॥ मुमुक्षु जाणा ॥ ४२ ॥ साही प्रकारें हे संपत्ति ॥
भाग्यें आली ज्याचिया हातीं ॥ तें हात जोडून पुढती ॥ वैराग्य उभें ॥ ४३ ॥ गर्भवती आली या घरीं ॥
गर्भ ये जैसा बरोबरी ॥ साधनसंपत्ति माझारी ॥ वैराग्य तैसें ॥ ४४ ॥ विवेकाचे अंग मिळणी ॥ बीज
मुमुक्षु तें गर्भिणी ॥ संपत्ति जाहली तेथुनी ॥ विरागा जन्म ॥ ४५ ॥ तेणें आधीं वधून कामा ॥ कं
टाळविला रूपनामा ॥ जीव कैसा त्याचिया क्रमा ॥ अवधारिजो ॥ ४६ ॥ माया स्फूर्ति तृणांत देहीं ॥ भो
गभोगितां प्रीति नाहीं ॥ सती जैशी शृंगार ताही ॥ उदासमनीं ॥ ४७ ॥ किंवा वृश्चिकाचिये स्पर्शीं
॥ कोणी नेच्छी षड्रसान्नाशी ॥ एक चि इच्छी स्वमानसीं ॥ निजाश्रय स्थिति ॥ ४८ ॥ याना व जाणि
जे विराग ॥ याची प्राप्ति तें महद्भाग्य ॥ ब्रह्मविद्ये पूर्ण सौभाग्य ॥ तें एकें येणें ॥ ४९ ॥ असो वैराग्य
जें का पद्म ॥ तें चि इतरांचें गौरव ॥ कीं चारी साधनें हे पर्व ॥ महोदयाचें ॥ ५० ॥ ब्रह्मा सैक्य सद्विष
याचा ॥ हाचि अधिकारी जी साचा ॥ येथें कथिला असे वाचा ॥ अल्पसंकेतें ॥ ५१ ॥ इतिश्री अमृता

ता

अमृ० णीवस्यसाधनचतुष्टयसंपन्नव्याख्याःद्वितीयसर्गःसमाप्तः॥ ७७॥ ॥९॥ ॥७७॥ ॥ सर्ग

२ २

श्रीराम

२

श्रीहंसगुरवेनमः॥सप्तश्रुतिश्लोक॥तो आह्माउभयांरक्षो॥देवोभुक्तिपराक्रमा॥असोअधीतंते
जस्वी॥करोऐक्यंअविद्विष॥१॥मुमुक्षुतासाचज्याशी॥प्रार्थनाहेचित्तकृत॥श्रुतिसंमतहे
शांति॥त्रिवारोच्चारणेंदृढ॥२॥श्रोतीयेथेंकेला आक्षेप॥याउक्तीचेंकायस्वरूप॥तेंकरूनविस्तृ
तअल्प॥सांगेंगापुनः॥१॥ऐसेंअवधारूनवक्ता॥आहलाप्रांजळबोलता॥परिसाजीसाव
धचित्ता॥करूनक्षण॥२॥जीवन्मुक्तिरूपार्थशांति॥जेवर्णीयजुर्वेदश्रुति॥तदर्थासध
रूनचित्तीं॥हेउक्तिअसे॥३॥तोह्मणिजेतोपरात्पर॥ओंकाअसिपदाख्यथोर॥आह्मातवं
पदांसाचार॥ऐक्यतेंरक्षो॥४॥तत्पदतोचिगुरुईश॥त्वंपदआणा जीवशिष्य॥हरून
हाद्वैतवार्ध्यांश॥स्वात्मत्वंदेवो॥५॥भेदकीं द्वैताचें हनन॥तेंचि भयाचेंनिवारण॥याना
वआणिजेरक्षण॥परिपूर्णत्वें॥६॥अप्राप्तलक्ष्यरूपप्राप्ति॥ब्रह्मामृतज्याह्मणेश्रुति॥त
त्सानेंकरोनियांतृप्ति॥राखोअखंड॥७॥अमृतप्राशनाचेंतत्व॥ब्रह्मविद्येचेंअधीतत्व॥

अमृ॰ १

सर्ग ३

ह्मणंजे ब्रह्मापरोक्षत्व ॥ स्वप्रकाशलें ॥८॥ हें पूर्णामृतपान होतां ॥ बळें नेआजातशत्रुता ॥ अंगीये
ऊन कृतार्थता ॥ ऐसीच होय ॥९॥ द्वैताशी समूळजिंकिलें ॥ सामोरें न येऐसें केलें ॥ निःशेष कु
रूनयकिलें ॥ नुरतां नाव ॥१०॥ कीं नामरूपक्रिया हानि ॥ विजपीआहला करूनि ॥ श्रीत्रिवि
क्रमत्रिभुवनिं ॥ जैशियापरी ॥११॥ ऐसा हा शांतीचा मुख्यार्थ ॥ कथन केला सेयथार्थ ॥ मुमु
क्षूचा परमस्वार्थ ॥ तो मुख्य येणें ॥१२॥ शांत्यर्थ ऐकूनि पावन ॥ श्रोते पुसती विचक्षण ॥
ब्रह्म तें काय त्याचें चिन्ह ॥ सांगेंगा कैसें ॥१३॥ पूर्व सर्गीच्या निरूपणें ॥ हें होतें वि आत्मापु
सणें ॥ तें ऐसेंच तुझ्या मुखानें ॥ निघालें येथें ॥१४॥ आणी कही शांतीचा अर्थ ॥ ऐकूनियां
आले मनांत ॥ जेजे कांहीं प्रश्न सार्थत ॥ पुसों ते सांगें ॥१५॥ शबल ब्रह्म तें कवण ॥ कवण ई
श जीव कोण ॥ प्रकृतीचें काय लक्षण ॥ परमात्मा ही ॥१६॥ ब्रह्मादि देव कोण होती ॥ कासया
शी ह्मणावें जाती ॥ कर्माकर्मस्वरूपस्थिति ॥ तप तें काय ॥१७॥ काय असुर ज्ञानाज्ञान ॥ संसा

श्रीराम १

र बंध मोक्ष कोण ॥ सुख दुःख स्वर्ग गहन ॥ नरक काय ॥१८॥ परमपद तें कोण तें ॥ उपास्य कोण स
कळांतें ॥ विद्वान ह्मणावें कोणातें ॥ आणि मूढ ही ॥१९॥ सन्यासी तो असे कोणता ॥ ग्राह्य अग्राह्य
काय चित्ता ॥ समाधि नाम ही तत्वतां ॥ कोणाशी आहे ॥२०॥ ऐसे एकूणतीस प्रश्न ॥ सांगावे वि
शद करून ॥ वक्ता ह्मणे जी सावधान ॥ ऐकिजे क्रमें ॥२१॥ सकळ उपाधिरहित ॥ परब्रह्म अ
नाद्यनंत ॥ निर्गुण शुद्ध आणि शांत ॥ निरवयी ॥२२॥ नित्यानंदरूप चिन्मय ॥ अखंडैकरस
अद्वय ॥ इतुक्या लक्षणांचें काय ॥ तात्पर्य ऐका ॥२३॥ अन्यथाभानाचा विकार ॥ स्पर्शूं न श
केल्यांची मेर ॥ जैसा न येचि अंधकार ॥ आदित्यापुढें ॥२४॥ जे थें विकारचि असेना ॥ तें होणें जा
णें बोलूं येना ॥ श्यामता नसतां गगना ॥ वर्ण हा जैसा ॥२५॥ आतां सर्वगतास घना ॥ देशभेदें
भेद होईना ॥ नाना सीमा होतां खंडेना ॥ वसुधा जैशी ॥२६॥ स्थित्युत्पत्ती लयें पोसलें ॥ ब्रह्म
जन्मलें ना निमालें ॥ वर्षादि काळें नव्हे ओलें ॥ शीतोष्ण नभ ॥२७॥ घरमठ भिन्न अनेक ॥

ग

आकाशालिप्तसर्वीं एक॥ तैसें ब्रह्म निश्चयात्मक॥ परार्थमात्रीं॥२८॥ एवं देश काळवस्तूशी॥
ब्रह्म अलिप्तदिवानिशी॥ यास्तव श्रुतिह्मणे त्याशी॥ अनंत ऐसें॥२९॥ तेवी गुणत्रया दुर्ध-
रा॥ येणें विनाहीं ज्या सामोरा॥ आल्या जैसा मरे त्रिशिरा॥ श्रीरामापुढें॥३०॥ कीं त्रिशिराख
रदूषण॥ अशक्यचि करूं बंधन॥ रामा परब्रह्मा लागून॥ गुण हीं तैसें॥३१॥ मायाकीं अ-
विद्येचा मळ॥ याचा नाहींच ज्या विटाळ॥ जैसें येतां जातां आभाळ॥ निर्मळ नभ॥३२॥ शु
द्धता पाहतां इतुकी॥ वरी शांति ही अति निकी॥ काय सांगूं धरा ही तुकीं॥ नव्हे ज्याच्या॥३३॥
अहंब्रह्म ऐशी जे स्फूर्ति॥ केवळ ब्रह्मीं नाहीं रती॥ कोणी स्मरे आपणाप्रती॥ तरी का भे-
दे॥३४॥ ह्मणोन ब्रह्म स्वयमेव॥ अखंडित निरवयव॥ स्फुरणेंवीन विद्याशिव॥ नाजीवा विद्या
॥३५॥ जीवेश्वरांवांचून जग॥ हाहीन घडेचि प्रसंग॥ पर्जन्यवृष्टि जैशी ढग॥ न सतां न व्हे॥३६॥ एवं
स्वगत सजातीय॥ तैसाचि भेद विजातीय॥ हे एकचि ब्रह्म अद्वय॥ तेथें न सती॥३७॥ परब्रह्म

सच्चिदानंद॥ तेंही निवेदितों विशद॥ तरी ऐकिजो जी सावध॥ होऊन क्षण॥३८॥ जैसा कावाद्यामाजी नाद॥
शब्दाचक्षरीं अर्थ सिद्ध॥ तैशीच ब्रह्मसत्ता शुद्ध॥ सर्वदां असे॥३९॥ कीं इक्षुदंडामाजी रस॥ अत्यु
त्तमपुरुषीं यश॥ नातरी अभ्रीं जैसा कस॥ सद्रूप तैसें॥४०॥ एवं होतां अनुभवेना॥ परी जो कांहीं आ-
हेपणा॥ तें सद्रूप आणावें मना॥ चिद्रूप ऐका॥४१॥ तपनीं स्वभावें उष्णांश॥ आदर्शीं प्रतिबिंबा
वास॥ तैसें चिजें का स्वप्रकाश॥ तें चित्स्वरूप॥४२॥ अथवा रूपादि निरासें॥ नेत्रादिकीं देखणें
जैसें॥ तैसें ज्ञान जें सदां असें॥ चित्स्वरूप तें॥४३॥ नातरी अक्षांलें सारून॥ उपेक्षूनि विषय
मन॥ उपरी ज्ञानदशा पूर्ण॥ उरे तें चित्॥४४॥ किंवा वृत्तिविषयें समासि॥ अवधि शेष बोधस्थि
ति॥ तें चिद्रूप ऐका निश्चिती॥ आनंद ऐसा॥४५॥ रस रसना दोहींवीन॥ जे कांहीं माधूर्यचीं
खूण॥ तैशी मुख्यत्वें ओळखण॥ निजानंदाची॥४६॥ अथवा आरंभसुरता॥ प्रकटलें ज्ञान
सतां॥ मुळ जे कांहीं सुखावस्था॥ तैसा आनंद॥४७॥ कीं बहुप्रकारींचे अर्थी॥ प्रियाप्रियोपेक्ष्य

रूपता॥ तेमुख्यत्वें होत्या करितां॥ आनंद तोचि॥ ४८॥ किंवा लय विक्षेप संधी॥ माजी होत सुखाची
सिद्धि॥ तद्बिंबभूत निरवधि॥ मुख्यानंद तो॥ ४९॥ भाव अभाव ज्ञाना ज्ञान॥ सुखदुःखेंन मळेपू
र्ण॥ तें ब्रह्म सच्चित्सुखघन॥ निजात्मरूप॥ ५०॥ ऐसें ब्रह्म सच्चिदानंद॥ त्रिप [illegible] दीं एकचि अभेद॥
जैसा मृदु श्वेत सुगंध॥ कर्पूर एक॥ ५१॥ सत तें चिज्जाणावें चित्॥ सच्चित् आनंद विख्यात॥ मृदु
त्वचि ज्या परी श्वेत॥ तेंचि सुगंध॥ ५२॥ त्रिपदें सांगाया कारण॥ एकेकें न व्हे ओळखण॥ स्वयें जो
ब्रह्मात्मा सघन॥ तया चिकदा॥ ५३॥ ह्मणोनि त्रिपदें करून॥ परब्रह्म कथिलें पूर्ण॥ जैसें वर्तूळ स
तेज औष्ण॥ बिंब सूर्याचें॥ ५४॥ पदत्रयें सांगून ब्रह्म॥ निवारिला मायादि भ्रम॥ सूर्य अग्नि त्रीष
सोम॥ वाळिले जैसे॥ ५५॥ येथें कित्येकांची उक्ति॥ असज्जड दुःख निवृत्ती॥ सच्चिदानंद अ
स्ति भाति॥ प्रिय ह्मणावें॥ ५६॥ परी हें कदापि शोभेना॥ सूर्यी अंधारचि असेना॥ येरां भासतां का
तो उणा॥ प्रकाशविशीं॥ ५७॥ जें अंधकारा निवारावें॥ तेंच सूर्यें तेजस्वी व्हावें॥ नाहीं तरी काय मु

कावें॥ स्वप्रकाशत्वा॥ ५८॥ वारील जे व्हां सर्वगुण॥ तेंच परब्रह्म निर्गुण॥ कायक्रिया हरी संपूर्ण॥ तेव्हां
अक्रिय॥ ५९॥ सदसताशी दवडितां॥ मग ब्रह्म अजाति तत्ता॥ सर्व कांहीं संबंध आतां॥ मग असंग॥
॥ ६०॥ हें बोलणेंचि अप्रमाण॥ येणें अनुभवा दूषण॥ ह्मणोनि श्रुतीशी जें मान्य॥ तेंचि बोलावें॥ ६१॥
अहो जें वाचापरतती॥ मनादिक धीर सोडिती॥ तेथें केवी शब्दप्रवृत्ति॥ होईल हो जी॥ ६२॥ गुण
क्रिया जाति संबंध॥ विधिमुखा सह निषेध॥ हाचालोंन शके चि शब्द॥ शुद्ध स्वरूपीं॥ ६३॥ गाढनि-
द्रा पन्न नरा शी॥ शब्द आणीत जागृतीशी॥ विस्मरलिया स्वस्मृतीशी॥ दे शब्द जैसा॥ ६४॥ तैसें नि
र्गुणत्वें निद्रित॥ ब्रह्म शब्दें केलें जागृत॥ ऐसें कां न ह्मणावें भ्रांत॥ ह्मणेल कोणी॥ ६५॥ तरी जो
निद्रा जागृतीशी॥ स्वकीय प्रकाशें प्रकाशी॥ तेथें हे बोलीच वायशी॥ समजावी जी॥ ६६॥ तमें नि-
बुद्धि हासविला॥ मध्यान्हीं वा आणून चित्ता॥ मूर्खें तेथें दीप लाविलां॥ फळलें काय॥ ६७॥ सूर्य दावी ना
हरी तम॥ व्यर्थ मूर्खाशी झाला श्रम॥ तेवी शब्दाचा ही संभ्रम॥ स्वरूपीं व्यर्थ॥ ६८॥ तस्मात् शब्दा-

ची श्रेष्ठता ॥ मायेअज्ञानाचिआतौता ॥ त्याहीनज्ञान घनास्वता ॥ नाहींजीनाहीं ॥ ६९ ॥ दावावया आपुलें मुख ॥ आदर्शआत्याहीसंमुख ॥ तेणेंकायस्वमुखामुख ॥ भेटलेंनवें ॥ ७० ॥ मुखनसतांही दर्पण ॥ आहेचआहेमुखीपूर्ण ॥ सच्चिदानंदबोलेंवीन ॥ ब्रह्महीतैसें ॥ ७१ ॥ इति० अमृ० ब्रह्म स्वरूपविवरणव्या० तृतीयसर्गः समाप्तः ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

श्रीहंसगुरवेनमः ॥ श्रोतेह्मणतीअत्युत्तम ॥ निरूपिलेंत्यांपरब्रह्म ॥ जेणेंसंतोषलेंपर म ॥ चित्तआमुचें ॥ १ ॥ आहतानसतांपाल्हाळ ॥ थोडयाशद्बीं अर्थपुष्कळ ॥ कडीबंधबो लसरळ ॥ अनुभवाचे ॥ २ ॥ हाचिविस्मयहोतमना ॥ आह्माश्रोत्यांच्याक्षणक्षणां ॥ त स्मात्सात्त्वकंयरदाना ॥ ध्वनियांसाच्या ॥ ३ ॥ तूंसकळबुधवरद ॥ आख्यायावत्ताशीप्रसि द्ध ॥ तेयथार्थआहेहाबोध ॥ पाहतांतुझा ॥ ४ ॥ अगागुरुरूपावसंतीं ॥ तूंकोकीळ विसुनिश्चिती ॥ ह्मणोनतुझ्याबोलींप्रीति ॥ अत्यंतआह्मा ॥ ५ ॥ आतांआमुचेंहेंमा नस ॥ यापुढीलप्रेमास ॥ पाहूनश्रोत्यांचासंतोष ॥ विनवीवक्ता ॥ ६ ॥ माझी वाणीरसरहित ॥ परीतुह्मीकृपाळूसंत ॥ तुह्मीचअसाबोलवीत ॥ निरूपणहें ॥ ७ ॥ एन्हवींमिमुखदुर्बळ ॥ बोलोंचिनेणेंजीबरळ ॥ चंद्रकांतींसुधाकल्लोळ ॥ चंद्रेंविस त्य ॥ ८ ॥ क्षीरसिंधुचियाअमृतें ॥ जैसेंनयाद्वीतपिंडोतें ॥ तैसेंतुमचेंचितुह्मातें ॥ सां

आमृ० १

गावेंज्ञान ॥ ९ ॥ शौनकासर्वमुनींनीं ॥ य केलेंसूतालागुनी ॥ कींजेंसेंसनकादिकां नीं ॥ सनंदनाशी ॥ १० ॥ म्हणालचंद्रकांताचीन ॥ कायकरीचंद्रकिरण ॥ हेंसत्यपरी नानारत्न ॥ वसुंधरादि ॥ ११ ॥ ऐसेंहोतांमाझेंचिप्रेम ॥ जेव्हांतुम्हांसंतांपरम ॥ तेव्हां हामाझाचिनिःसीम ॥ भाग्योदयजी ॥ १२ ॥ सामर्थ्यअसतांश्रीकृष्णा ॥ द्यायाजय श्रीभाग्यार्जुना ॥ जैसापुढलीकेलारर्णा ॥ तैसेंचहेंहीं ॥ १३ ॥ श्रोतेम्हणतीपुरेपुरे तुष्टलोंऐकूनउत्तरें ॥ आरंभकरावागाखरें ॥ निरूपणाशी ॥ १४ ॥ ऐकूनश्रोतयांचीवा णी ॥ जीमहाप्रसादम्हणूनी ॥ प्रवर्तलालोंसोव्याख्यानीं ॥ आदरेंवक्ता ॥ १५ ॥ अव्यक्तरू पमूळमाया ॥ महत्तत्वहोतेंथुनियां ॥ त्रिगुणाहंकाराचीकाया ॥ तेथूनसूक्ष्म ॥ १६ ॥ पुढेंतैशीचसूक्ष्मभूतें ॥ प्राणविषयाक्षेंदैवतें ॥ पिंडब्रह्मांडस्पष्टहोतें ॥ त्यापरीज्ञा लें ॥ १७ ॥ ऐशाअनंतमायाशक्ति ॥ सांठवल्याशाजेंघटलीं ॥ तदुपाधिसतेंख्या

सर्ग ४

श्रीराम १

ति ॥ शबल ब्रह्म ॥ १८ ॥ हेंचिनिरूपणप्रांजळ ॥ ऐकाहोऊनीयांनिश्चळ ॥ अव्यक्ततें चिस्फूर्तिमूळ ॥ ब्रह्माहमस्मि ॥ १९ ॥ तेचिस्फूर्तिमूळप्रकृति ॥ जैशीअग्नीतदाह शक्ति ॥ किंवाअत्यंतसूक्ष्मस्थिति ॥ परावाचेची ॥ २० ॥ अथवावायूचीलहरी ॥ सूक्ष्म रूपेंगगनोदरीं ॥ कींआद्यावस्थेच्याऽयापरी ॥ नूतनांकुर ॥ २१ ॥ ऐशीमूळमायाप्र कृति ॥ माझारीपूर्णभव्यक्ति ॥ प्रतिबिंबलीजेंशीस्थिति ॥ हेमाचिनगीं ॥ २२ ॥ आ हेदिसतेंतीचप्रिय ॥ तेंएकहेमचिअद्वय ॥ परीप्रियास्तिभातिहोय ॥ नगचिभ्रमें ॥ २३ ॥ नगहानाहींचदिसेना ॥ नाहींतोप्रियहीहोईना ॥ परीभासेअन्यथामना ॥ प्र तिबिंबतें ॥ २४ ॥ सत्याचेंलक्षणअसतीं ॥ असत्याचेंसत्यावरूती ॥ बिंबप्रतिबिं बनिश्चिती ॥ याचेंचिनाव ॥ २५ ॥ जौबिंबप्रतिबिंबभाव ॥ तोचिअन्योन्याध्यास वाव ॥ सत्यज्ञांकूनिरूपनाव ॥ मिथ्याचेंदावी ॥ २६ ॥ तेणेंचिरीतीमूळमाया ॥ अस

अष्ट० ॥२॥

दादिकां आपुलिया ॥ स्वयें ब्रह्मीं आरोपूनियां ॥ सदादिशाली ॥ २७ ॥ सत्यत्व अव्यय सर्गि ॥ कमायेशी ॥ कींमायिकत्व सदृस्वरूशी ॥ म्हणोनियां नाम भत्माशी ॥ शबलब्रह्म हासंकेत ॥

॥ छाया हेतु माया अव्यक्त ॥ परी हे त्रिकाळीं विवर्त ॥ नामें रूपें जी ॥ २९ ॥ या अव्यक्त मायेपासून ॥ महत्तत्व झालें निर्माण ॥ तयाशी त्रिगुण समान ॥ म्हणती माया ॥ ३० ॥ जैशी पश्यंति रूपें वाणी ॥ तैसें गुणसाम्य लक्षणीं ॥ कीं स्त्री भासे जैशी गर्भिणी ॥ केवळें कार्की ॥ ३१ ॥ तेथून गुणाक्षोभ झाला ॥ त्रिविधा हंकार जन्मला ॥ गर्भिणी प्रसवे गर्भीला ॥ जैशिया परी ॥ ३२ ॥ त्रिविधरूप अहंकार ॥ त्याजें देवता त्रय थोर ॥ तयाशी ब्रह्मा विष्णु रुद्र ॥ ऐसें म्हणती ॥ ३३ ॥ अहंकार त्रयांपासून ॥ झाली सर्व सृष्टि निर्माण ॥ जैशी अवस्था होतस्वप्न ॥ जीवाच्या ठायीं ॥ ३४ ॥ तेंचि सविस्तर कथन ॥ अवधाराजी सावधान ॥ अहंकार तम प्रधान ॥ तन्मात्रा त्यापें ॥ ३५ ॥ पंचतन्मात्रा सूक्ष्मभूतें ॥ तेंचि तत्वें अपंचिकृतें ॥ सत्वरजप्राधान्यी भूतें ॥ देवतें तैशीं ॥ ३६ ॥

श्रीराम ॥२॥

जाहला हेतु ॥ ३७ ॥

असो आतां शब्दतन्मात्रा ॥ ती माडीजी सत्व उभारा ॥ तोचि अंतःकरण श्रोत्रा ॥ ३७ ॥ उभाराजो रजोगुणाचा ॥ तेथून होय व्यान वाचा ॥ निमित्त शब्द विषयाचा ॥ तमोगुण तो ॥ ३८ ॥ भीतरी स्पर्शतन्मात्रेच्या ॥ उभाराजो सत्वगुणाचा ॥ तेथून मन आणी त्वचा ॥ प्रकट झालीं ॥ ३९ ॥ रजोगुणाची उभारणी ॥ त्याचा समान आणि पाणि ॥ तेथी शुद्धतमापासूनी ॥ स्पर्श विषय ॥ ४० ॥ रूपतन्मात्रास त्वगुण ॥ त्यापासून बुद्धि नयन ॥ रजें उदानें शीचरण ॥ तमापें रूप ॥ ४१ ॥ रसतन्मात्रेंतील सत्वा ॥ पासून होय चित्त जिव्हा ॥ प्राणोपस्थ रस सभ्दावा ॥ रजें तमें यें ॥ ४२ ॥ गंधतन्मात्रास त्वापासून ॥ जाहलें अहंकार घ्राण ॥ अपान गुद रजोत्पन्न ॥ तमापें गंध ॥ ४३ ॥ हेचि निरूपण मागुती ॥ कथन करूं आत्मयुक्ति ॥ जेणें सदृढ होय चित्तीं ॥ विषय हाजी ॥ ४४ ॥ शब्दतन्मात्राजे संबंध ॥ अंतःकरण तिचें अर्ध ॥ व्यान श्रोत्र याचे शीं शब्द ॥ शेषार्द्धाचे हें ॥ ४५ ॥ स्पर्शतन्मात्रा परिपूर्ण हे ॥ अर्धभाग लि त्या समान ॥ मन त्वचा पाणि स्पर्शन ॥ इतरार्द्धाचें ॥ ४६ ॥ रूपतन्मात्राजे कासांग ॥ चक्षु तये च्या

अर्द्धभाग॥ बुध्ध्युदानपादरूपांग॥अपरार्द्धीचें॥४७॥रसतन्मात्राजेसमस्त॥अर्द्धभागतिचा
उपस्थ॥रसजिव्हासमाणचित्त॥अर्द्धाचेंअन्या॥४८॥साकल्यपत्वेंतन्मात्रागंध॥गंधविषय
तद्‍दागार्थ॥अहंकारअपानगुद॥घ्राणेंशीअर्द्ध॥४९॥श्रोत्रादिज्ञानेंद्रियगण॥ज्ञानात्मवहा
सत्वगुण॥क्रियाहीदिसतल्यमणोन॥रजोगुणजी॥५०॥तमासाहंकारापासून॥जन्मलेंत्याचीऐ
शीखूण॥परीहेंजाणावेंसंपूर्ण॥अपंचिकृत॥५१॥तैंशाचियाचियादेवता॥सत्वरजप्राधान्यो
मुक्ती
भूता॥ज्ञात्याजाणासूक्ष्मरूपता॥अपंचीकृत॥५२॥त्रिगुणमिश्रहोते॥तेऐसेंपावलेभेदातें॥
जैसेत्रिधातुदेहस्फुटते॥आहले [illegible] यंत्रीं॥५३॥असोअपंचीकृतापून॥होउनियांपंचीकरण॥
स्थूलसृष्टिझालीनिर्माण॥गुणानुसारें॥५४॥तोगुणतारतम्यभाव॥आधींऐकासअभि
प्राव॥पंचीकृततात्पर्यसर्व॥सांगेनमग॥५५॥तमतमात्मकेंकरोनि॥वृक्षपाषाणादिकयो
नि॥वीसलक्षउपलक्षणीं॥वर्णिल्याशास्त्रीं॥५६॥तमरजात्मकेंकीटक॥योनिरूद्रल
क्षसंख्याक॥पशुतेतमसत्वात्मक॥तीसचिलक्ष ॥५७॥रजतमात्मकेंनवचि॥लक्षसं
ख्याजलचरांची॥रजरजात्मकेंपक्ष्यांची॥गणनादहा॥५८॥रजसत्वात्मकेंनिर्द्धारि॥म
नुष्ययोनिलक्षचार॥चौर्‍यांशीलक्षाचाप्रकार॥तोहाजीऐसा॥५९॥सत्वतमात्मकेंअसु
र॥सत्वरजात्माकाचेसुर॥ब्रह्माविष्णुआणिशंकर॥सत्वसत्वाचे॥६०॥गुणत्रयांचेती
न
नतीन॥भेदहोतांनऊगण॥परंतुहेंपंचीकारण॥होतांहोसारें॥६१॥तोचिपंचीकृतप्रका
र॥सांगतोंऐकासविस्तर॥पिंडब्रह्मांडहेंसमग्र॥स्पष्टलेंड्यायें॥६२॥अंतःकरणमनबुद्धि॥
चित्ताहंकारतयामधीं॥मिळतांझालेंत्याचेसंधी॥स्थूलाकाशहें॥६३॥व्यानसमानोदान
प्राण॥त्यालागींमिळतांअपान॥वायुउपजलातेथून॥ प्रत्यक्षहाजी॥६४॥श्रोत्रत्वक्चक्षु
जिव्हाघ्राण॥ज्ञानेंइंद्रियांहोतांमेळण॥प्रत्यक्षअग्नीसतेजोष्ण॥प्रकटलाहा॥६५॥वा
क्पा णिपादोपस्थगुद॥कर्मेंद्रियांऐक्यसंबंध॥होतांचिआहलेंविशद॥प्रत्यक्षआप॥
॥६६॥

अमृ० ॥४॥

शद्बस्पर्शरूपरसाशी ॥ गंधमिळलांअनयाशीं ॥ गंधमिळलांअनयाशीं ॥ स्पष्टआलेंपृथिवीशी ॥ प्रत्यक्षजेहें ॥ ६७ ॥ ऐशीं हीं भूतेंपंचीकृत ॥ उसन्न झाल्याब्रह्मांडांत ॥ पिंडउद्भवलें समस्त ॥ रोशेचिपुटें ॥ ६८ ॥ मांसास्थित्वचानाडीरोम ॥ हेपृथिवीचे भागनेम ॥ आपाचेंअवधारावर्मे ॥ कैसेंअसेतें ॥ ६९ ॥ शुक्रशोणितलाळमूत्र ॥ सहस्वेदआपेंनिर्द्धार ॥ क्षुधातृषाआळसनिद्रा ॥ मैथुनतेजें ॥ ७० ॥ चळणआणीकवळण ॥ प्रसारेंशीं आकुंचन ॥ निरोधन हे वायुगुण ॥ समस्तदेहीं ॥ ७१ ॥ कामक्रोध शोकमोहेंशीं ॥ भयमिळूनयापांचाशी ॥ वास्तव्यसमस्तदेहाशी ॥ आकाशभागें ॥ ७२ ॥ कामादिअसुरीसंपत्ति ॥ आकाशींदेशीहोजन्मती ॥ विवेकादिदैवीसंपत्ती ॥ तेशीचित्यापें ॥ ७३ ॥ असोऐसेंपंचीकरण ॥ होतांस्थूळझालेंनिर्माण ॥ हेपिंडब्रह्मांडाचीखूण ॥ कथिलीअल्प ॥ ७४ ॥ पंचीकृतेंस्थुळजाहलें ॥ परीतेंनाहींव्यापारलें ॥ तेंचिव्यवहारूलागें ॥ अपंचीकृतें ॥ ७५ ॥ अंतःकरणव्यान

सर्ग ६

णे

श्रीराम ॥४॥

श्रोत्र ॥ वाचाशद्बंहोतीव्यापार ॥ ऐकणेंबोलणेंनिर्द्धार ॥ नभाचेदोन ॥ ७६ ॥ मनसमानत्वचापाणि ॥ स्पर्शेव्यापारहोतीदोनी ॥ स्पर्शनेंशींदानग्रहणी ॥ वायुचमुख्य ॥ ७७ ॥ बुद्धिउदानचक्षुपाद ॥ रूपेंशीव्यापारद्विविध ॥ पाहणेंचालणेंहेसिद्ध ॥ तेजापेंहोती ॥ ७८ ॥ चित्तप्राणजिव्हाउपस्थ ॥ रसेंव्यापारद्वयहोत ॥ स्त्रभरत्याशननिश्चित ॥ आपतत्वाचे ॥ ७९ ॥ अहंकारअपानघ्राण ॥ गुदगंधेंव्यापारदोन ॥ मलोत्सर्गगंधग्रहण ॥ होतीपृथ्वीचे ॥ ८० ॥ अंतःकरणाचेंपंचक ॥ ज्ञाताभोक्तानिश्चयात्मक ॥ याशीज्ञानशक्तिउल्लेख ॥ सत्वाच्यागुणें ॥ ८१ ॥ तेचीज्ञानेंद्रियपंचक ॥ हेंहीयाचेंचिअंगीक ॥ तमेंशीद्रव्यशक्त्यात्मक ॥ पंचविषय ॥ ८२ ॥ क्रियाशक्तीशीरजोगुण ॥ तेचिमुख्यत्वेंपंचप्राण ॥ पंचकर्मेंद्रियांमेळण ॥ जाणिजेहोतां ॥ ८३ ॥ विषयदेहआधिभूत ॥ करणेंआध्यात्मसमस्त ॥ विष्णवादिकाधिदैवत ॥ सूक्ष्मरू

अमृ ॥५॥

पखें ॥८४॥ अंतःकरणाचे प्रकार ॥ मनबुद्धिचित्ताहंकार ॥ परी मनबुद्धि निर्द्धार ॥ दोन चि मुख्य ॥८५॥ चित्ताहंकार अंत र्भूत ॥ मनबुद्धि या दोहों आंत ॥ अंतःकरण कारणांत ॥ गणिलें आहे ॥८६॥ एवं स्थूळ सूक्ष्म कारण ॥ सूक्ष्म लिंगदेहाचें चिन्ह ॥ कारण ह्मणजे अज्ञान ॥ उभयां हेतु ॥८७॥ ऐशिया परी एक पिंड ॥ नाना पिंडें एक ब्रह्मांड ॥ या परी ब्रह्मांडें उदंड ॥ कल्पिया शक्ति ॥८८॥ त्या शक्तिजें अनंतावधि ॥ सा रत्याचा वोली अल्पबुद्धि ॥ शबलब्रह्म उपाधी ॥ आख्याता ऐसी ॥८९॥ [illegible] नाथिलें चि आहे वाटलें ॥ त्यांत पूर्णब्रह्म दाटलें ॥ घटमठोपाधी बोलिलें ॥ आकाश जैसें ॥९०॥ घटादिकें गगन च्छेदे ॥ तदभावीं कां पुनः सांधे ॥ ऐसें न च्छेदन भेदे ॥ ब्रह्म ही तैसें ॥९१॥ अव्यक्तापासूनि र्यात्नण ॥ जाहलें चि नाहीं उत्पन्न ॥ कायदिसलें जरी स्वप्न ॥ साच होईल ॥९२॥ असो मृगांबु चि आपगा ॥ सूर्यरश्मि व्यास तरंगा ॥ हा बोल जैसा आहे उगा ॥ तैसें चि हे ही ॥९३॥ इ० अ० शबल० व्या० च०

॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥ ॥छ॥

श्रीहंसगुरवेनमः॥ शबलब्रह्मजें बोलिलें॥ अनंतशक्तिपुक्त थिलें॥ तेंचिशक्तिलेशें पावलें॥ ईश्वरनाम॥१॥ करूनस्वशक्तियेकाश्रय॥ सृष्टिनिर्मिल्या मायामय॥ चाळिताहो ब्रह्मादि काय॥ अंतर्यामित्वें॥२॥ स्थुलासह सूक्ष्माशी चाळी॥ नियंतृत्वेंसकळां पाळी॥ स्वकीयोदयींजैसा हेळी॥ वर्तवीजगा॥३॥ हेंचिएकाजीसविस्तर॥ होऊनियांआनांएकाग्र॥ कैसें चालिलें चराचर॥ उद्भवोनिहें॥४॥ मूळमाया मूळस्फुरण॥ ज्या असे अव्यक्ताभिधान॥ तेंचित्रिगुणगर्भधारण॥ होतांमहत्व॥५॥ महत्तत्वगुणसाम्यता॥ तेंजें मुख्यसत्वलमता॥ द्विप्रकारकलेअवस्था॥ विद्यायानांवें॥६॥ यापरीजेकां विद्यामाया॥ तेनिमित्तोपादानाद्वया॥ दिसेजैसीएकाचितोया॥ शुक्लकृष्णता॥७॥ विद्यामायाजिशीह्मणती॥ तींतजे आभासेचिस्थिति॥ तोईश्वरकर्त्ताजगतीं॥ आश्रयेंतिच्या॥८॥ मायेलागींठेवीस्वाधीन॥ याचिहेतुईशसर्वज्ञ॥ महाग्निनीशींजैसापूर्ण॥ सुअश्ववह॥९॥ महत्तत्वींचीसत्ववृत्ती॥ तेनिमित्तयाजगाप्रति॥ तमप्रधानावृत्तीस्थिति॥ उपादानतें॥१०॥ महत्तत्वामाजीलंदरवा॥ अविद्यानामेंशक्तिजेका॥

तोचि कारण देह निका॥ या ब्रह्मांडीचा॥११॥ समष्टि कारण शरीर॥ तोचि आनंदकोश थोर॥ त्याचें
वर्णन सविस्तर॥ सर्गीं पुढिल्या॥१२॥ मूळमाया महाप्रकृति॥ येतां गुणसाम्याचि स्थिति॥ तत्संबंध्यें कां
शानिश्चिती॥ विद्यामाया जे॥१३॥ आश्रय करून तयेचा॥ कर्ता ईश्वर जगताचा॥ ऊर्णनाभि सूत्र जाळ्या
चा॥ कारक जैसा॥१४॥ निमित्तोपादान उभय॥ ऊर्णनाभिच एक होय॥ कीं मृगजळा जैसा सूर्य॥ मध्या-
न्हें करें॥१५॥ विद्यामाया हे ज्ञानशक्ति॥ परी विक्षेपी जीवा प्रती॥ दाखऊन अन्यथा कृती॥ एकाचें येक
॥१६॥ भिन्न करणी भिन्न नाम॥ हें तरी केवळ कृत्रिम॥ परांगनेचें जैसें प्रेम॥ पत्निव्रता॥१७॥ म्हणो
न विद्या मायाशक्ति॥ जे मोहीत विक्षेपाकृती॥ ते मायें जैशी विषदाती॥ निजपत्याशी॥१८॥ अथ
वा स्त्री जैशी जारिणी॥ मिथ्या च भर्त्यासंनिधानीं॥ सेवामिषें तुडबुडोनि॥ वंचीत सेत्या॥१९॥ तरी
हें साचचि सर्वांशी॥ ऐसें म्हण वेनाजी मशी॥ काय द्यावें महाधनाशी॥ उधळ्या हातीं॥२०॥ उधळ्याशि
किंवा कृपणा॥ मूर्खा देतां फळ घडेना॥ सुबीज जैसें पेरावेंना॥ असद्भूमीशी॥२१॥ नातरी अत्यंत अ-

शक्ता॥ अन्न द्यावेंना अवसता॥ काय दुधन द्वरिता॥ येईल कामा॥२२॥ ऐशी पाहतां विवंचना॥
विद्या हे तु अन्यथाज्ञाना॥ हें न घडे जैसा कुमना॥ कल्पवृक्ष जी॥२३॥ ऐकून वक्त्याचें वचन॥ संत
बोलिले सुप्रसन्न॥ भला रे भला समाधान॥ उत्तम केलें॥२४॥ आतां निरूपण पुढील॥ सांगावें गा
अति निर्मळ॥ तें श्रोत्यां वक्ता बोले प्रांजळ॥ लीनपणें शीं॥२५॥ देहीं आनंदमय कोश॥ भोक्तेपणें निर्मून
ईश॥ पुढें भोग्यादिक विशेष॥ रचिता झाला॥२६॥ आनंदावरी आवरण॥ केला कोश नामें विज्ञान॥
निश्चय कर्ता जो संपूर्ण॥ आच्छादी तोही॥२७॥ विज्ञानाशी आच्छादावया॥ निर्मी ईश्वर मनोम
या॥ संशयी परी भोग्य घ्याया॥ साधन हेंचि॥२८॥ याशीही केलें आच्छादन॥ जेणें त्या नाव कोश
प्राण॥ प्राणाशी आच्छादी तो अन्न॥ मयाचा कोश॥२९॥ अन्नमय कोश हा देह॥ त्याचे अंतरीं प्रा
ण राहे॥ इंद्रवृत्ती मन तें आहे॥ अभ्यंतरीं त्या॥३०॥ त्या माझारि असे विज्ञान॥ अहंवृत्ती रूप स्फु
रण॥ माजी आनंदमय पूर्ण॥ राहिला असे॥३१॥ ईशें आस सत्तेचें स्थळ॥ पिंडीं जें निर्मिलें सबळ॥

तो आनंदकोश केवळ ॥ मायीक आद्य ॥ ३२ ॥ आनंदशरीर कारण ॥ सूक्ष्म विज्ञान मन प्राण ॥ स्थूळ
देह तो कोश अन्न ॥ प्रत्यक्ष हाजी ॥ ३३ ॥ महतत्वाख्य मायावृत्ती ॥ विद्या अविद्या तिच्या शक्ति ॥
विक्षेपावरण ह्मणती ॥ अविद्येनें ज्या ॥ ३४ ॥ विद्याविद्येंत आभासले ॥ चैतन्य ते जीवेश झाले ॥
एकें सृष्टि कार्यें निर्मिलें ॥ भोगिलें अन्यें ॥ ३५ ॥ मुळीं महतत्वामाझारी ॥ भेद नाहींच जीवेश्वरीं ॥
कार्यावरूनि यां निर्द्धारी ॥ ह्मणावे भिन्न ॥ ३६ ॥ ऐशी माया महत्कारणी ॥ पंचपदार्थांची मांडणी
॥ यांशी सहजोद्भूत ज्ञानी ॥ ऐसें ह्मणती ॥ ३७ ॥ पुढें हि सहज चि होत ॥ परी ईश्वरीं आरोपत
॥ स्त्रीचें ज्यापरी कृत्याकृत्य ॥ आरोपे भर्त्या ॥ ३८ ॥ मन बुद्धीशीं ज्ञानेंद्रियें ॥ प्राणपंचक कर्मेंद्रि
यें ॥ क्रमें सत्राशीं यथान्वयें ॥ सूक्ष्म देह हा ॥ ३९ ॥ चंद्रमा ब्रह्मा आणि दिशा ॥ वायु सूर्य वरुण ते
सा ॥ अश्विनी देव सहवासा ॥ सत्तपदार्थ ॥ ४० ॥ अग्नीं द्रोपेंद्र प्रजापती ॥ तेवी पांच वातोनि
र्ऋती ॥ वरी यां जे पांच मिळती ॥ तेही ऐका जी ॥ ४१ ॥ सद्योजात अघोर ईश ॥ वामदेवेंशीं तत्पुरु

ष ॥ ऐसे पदार्थ सत्तदश ॥ सूत्रात्म्यामाजी ॥ ४२ ॥ पंचभूतें पंचविषय ॥ या दाहांचा जो समुदाय ॥ तो
चि स्थूळ विराट काय ॥ व्यष्टि समष्टि ॥ ४३ ॥ कीं पांच भूतें पांच खाणी ॥ या परी हे दाहा मिळोनि ॥
स्थूळत्वें विराट वचनीं ॥ बोलिजे नाहे ॥ ४४ ॥ एवं पिंड ब्रह्मांडा आंत ॥ पदार्थ बत्तीस नेमस्त ॥ न्यू
नाधिक ते अंतर्भूत ॥ यांत चि होती ॥ ४५ ॥ चित्त अहंकारासहित ॥ मनबुद्धींत अंतर्भूत ॥ ना
रायण रुद्र त्यां होत ॥ देवता क्रमें ॥ ४६ ॥ मन बुद्धीची मूळवृत्ती ॥ अंतःकरण तिशी ख्याति ॥ ति
येशी विष्णु हा निश्चिती ॥ देवता होय ॥ ४७ ॥ करूनियां पंचीकरण ॥ कैसें पिंड ब्रह्मांड संपन्न ॥
केलें त्याचें झालें कथन ॥ मागील सर्गीं ॥ ४८ ॥ तथापि हें प्रकारांतरें ॥ सप्तान्नत्वें बोलिलें सारें ॥ तें अ
वधारा सविस्तरें ॥ कांहींसें अल्प ॥ ४९ ॥ एक अन्न तें साधारण ॥ ज्याशी ह्मणतात मर्त्यान्न ॥ ब्रीह्या
दिक हें अभिधान ॥ त्याशीच असे ॥ ५० ॥ दुसरें दर्शपूर्णमास ॥ द्विविध देवान्न विशेष ॥ क्षीरत्वें चौ
थ्या पश्वन्नास ॥ ओळखावें जी ॥ ५१ ॥ वाचा प्राण सहित मन ॥ केवळ आत्म अन्नें तीन ॥ माजी वाचा

उपलक्षण॥ दशेंद्रियांशी॥५२॥ प्राणोपलक्षणेंकरून॥ आणि जो जीहे पंचप्राण॥ मनें केंमन बुद्धि
दोन॥ आणावेंध्यानीं॥५३॥ संकल्पविकल्पलें वृत्ती॥ मन ऐशीतयेशी ख्याती॥ निश्चयात्मक
जेका स्फूर्ति॥ तीनाव बुद्धी॥५४॥ यापरीहे सत्राप्रकार॥ वाक्प्राण मनीं जाणाथोर॥ हालिंगदेहा
चाविचार॥ त्रयीमाजीया॥५५॥ पुढें यापासून निश्चित॥ स्थूलसृष्टि जेका घडत॥ तेत्री ह्यादिरू
पेंनेमस्त॥ चहुंप्रकारें॥५६॥ तेंचिसंक्षेपेंनिरूपण॥ करितो कांहिसें कथन॥ तीन भूतें वाक्प्रा
णमन॥ तेजापपृथ्वी॥५७॥ पृथ्वी ह्मणजे अन्न जाणा॥ याची पाहतां विचारणा॥ यातिहीं वां-
चून असेना॥ वस्तुच जगीं॥५८॥ लोहितत्वतें वाक्तेजाचें॥ शुक्लत्व सर्व प्राणापाचें॥ अन्नरूप जें पृ
थ्वीतिचें॥ कृष्णत्व सारें॥५९॥ चंद्रीं लोहितत्व आभासे॥ शुक्लकृष्णताही जे दिसे॥ तेका ढिस्या
चंद्राशी आसे॥ कायजीरूप॥६०॥ वस्तुमात्राचें विवेचन॥ ऐसें करितां भूतेंतीन॥ हानिश्च
यवाचारंभण॥ आणि जे नांव॥६१॥ ह्मणोन जें जें कांहीं झालें॥ त्रिकारणें वियुक्ताथिलें॥ सक

ळत्रैलोक्य व्यापिलें॥ तिहींनींच या॥६२॥ तोचि परिसिजे प्रकार॥ कैसा त्रिभूतांचा विस्तार॥
होऊनियां हें चराचर॥ प्रत्यक्ष आलें॥६३॥ वाचेचें रूप हा भूलोक॥ पाताळांसहित अशेष॥ म-
नांतरिक्षदेवलोक॥ सर्वही प्राण॥६४॥ वाचा ऋग्वेद स्वयें जाणा॥ यजुर्वेद हे खूण मना॥ सा
मवेद संकेत प्राणा॥ श्रुतिप्रसिद्ध॥६५॥ वाचा आपण सर्व देव॥ मन स्वयें पितर सर्व॥ प्राणम
नुष्यं ऐसाभाव॥ निश्चयात्मक॥६६॥ मातेचें रूप वाग्देवता॥ मन हानि जाणिजे पिता॥ प्रा
णोप प्राणांची जे संस्था॥ ते होय प्रजा॥६७॥ भोक्ता भोगणें भोग्य जात॥ झालें तिहींपें ऊर्ध्व
रीत॥ आतां विशेष जो देहांत॥ झाला तो ऐका॥६८॥ तामसतेज भागें अस्थि॥ रजोभागें
मज्जेची स्थिती॥ सत्वभागें होय निश्चिती॥ प्रत्यक्ष वाचा॥६९॥ आपतामसभागें मूत्र॥ रजोभा
गें झालें रुधिर॥ सात्विकभागें हानिर्द्धार॥ प्रकट प्राण॥७०॥ अन्न तामसभागें मळ॥ रजोभा
गें मांस केवळ॥ सत्वभागें मनचपळ॥ संशयात्मक॥७१॥ तामसांशास्थूळ ह्मणावें॥ मध्य-

मराजसांशनांवें॥ सत्वांशालागींसमजावें॥ सूक्ष्मत्त्व्मणोनि॥ ७२॥ हें रहस्यत्रिकरणाचें॥ निवें
दिलें आलेंजेंवाचें॥ न्यूनपूर्णकरावुमचें॥ तुह्मीसज्जन॥ ७३॥ यारीतीमायीकईश्वर॥ निर्मिता
झालाचराचर॥ गगनींगंधर्वनगर॥ आभासेजैसें॥ ७४॥ आतांजेंजेंज्यापरी झालें॥ तेंतेंतैसेंचि
लयागेलें॥ ब्रह्मजेसेंतैसें संचलें॥ आदिमध्यांतीं॥ ७५॥ अध्यारोपजेसा वर्णिला॥ तैसंजरी
अपवादाला॥ वर्णावेंतरी याप्रश्नाला॥ विस्तारहोय॥ ७६॥ ह्मणोनकांहीं नबोलतां॥ उपसं
हाराची व्यवस्था॥ पाहांजेशी ऐकिलीकथा॥ उपक्रमाची॥ ७७॥ संतह्मणतीगापावलें॥ नाहींत
त्कारणउरलें॥ पुढीलनिरूपणबोलें॥ जेंअसे योग्य॥ ७८॥ ऐकून ऐसीसंतवाणी॥ वक्तास
मनींसंतोषूनी॥ प्रश्नपरिणामात्मगूनि॥ आरंभकरी॥ ७९॥ कांहींहीसंबंधावांचोन॥ पटजे-
साकाशुभ्रवर्ण॥ तैसेंचिपरब्रह्मपूर्ण॥ विकारातीत॥ ८०॥ यरीजोसंबंध स्वकीचा॥ तैसायो
ग ब्रह्मीं मायेचा॥ तैं घट्टितयेथें असाचा॥ अंतर्यामीहा॥ ८१॥ घोंटल्यापटीं चित्राकार॥ रे

रिवलेंमषीनेंनिर्द्धार॥ तैसासूत्रात्म्याचाप्रकार॥ सूक्ष्मत्वेंब्रह्मीं॥ ८२॥ चित्रें अवघींरंग
विलीं॥ तैशीसृष्टिस्पष्टत्वाआली॥ ऐशी पिंडब्रह्मांडाआली॥ रचनाब्रह्मीं॥ ८३॥ कित्येक
चित्रीं वस्त्राभास॥ तैसेंप्राणीसचिदाभास॥ तेचिजंगमइतरांस॥ स्थावरनाम॥ ८४॥ यापरीजें
हेंचराचर॥ त्याब्रह्मअधिष्टानमात्र॥ सकळचित्रांशीआधार॥ पटहांजेसा॥ ८५॥ रंगासहचि
त्रांआलीती॥ जैशीकाघट्टितांची व्याप्ति॥ सूत्रविराटीं तैशीवस्ती॥ अंतर्यामींची॥ ८६॥ अंतर्यामीश
बलब्रह्म॥ त्याशीचईश्वरहेंनाम॥ महत्तत्वीं आलेंपरम॥ विद्योपाधीनें॥ ८७॥ हिरण्यगर्भहासं
केत॥ सूत्रात्म्यामाजीतयाहोत॥ विराटामाझारीनिश्चित॥ वैश्वानरजी॥ ८८॥ हिरण्यगर्भवै
श्वानर॥ समष्टीजीवत्वें ईश्वर॥ जोतोसालाकळेप्रकार॥ सर्गींपुढिल्या॥ ८९॥ ब्रह्मादिसर्वप्राणिमा
त्र॥ यांच्याबुद्धीनियमीथोर॥ तोयेकचिपरमेश्वर॥ शबलब्रह्म॥ ९०॥ नियमीब्रह्मांडेंअनंत॥ याहेतु
महेश्वरख्यात॥ एकाब्रह्मांडाआकळीत॥ तदर्थेश्वर॥ ९१॥ याच्यानिभयेंवायुवाहे॥ सूर्योदयही

करितांहे॥ अग्नींद्रतपे वर्षताहे॥ धांवे मृत्युही॥ ९२॥ निमित्त विवर्तोपादानें॥ सर्वां करून भिन्नपणें॥ हा राहे सर्वज्ञपणानें॥ सर्वत्रांमाजी॥ ९३॥ जीवांत त्त्कर्मानुसारीं॥ हाचि प्रपंचामाजी प्रेरी॥ न पापपुण्य यामाझारि॥ नांघे देकोणा॥ ९४॥ यांचें बुद्धि देणें परम॥ जीवें व्हावें निजांगें ब्रह्म॥ यासीच नारायण नाम॥ बोलती कोणी॥ ९५॥ अर्द्धनारीश आदिशक्ति॥ कोणी ह्मणे मंगलमूर्त्ति॥ सूर्य स्कंद ऐसें बोलती॥ कित्येक जन॥ ९६॥ नामरूपभेद अनेक॥ कल्पितां ही मूळतें येक॥ जेसा का वृक्ष बहुशाख॥ एकाचि मुळीं॥ ९७॥ असो क्लेशकर्म भितीत॥ विपाकाशया नातळत॥ तो विद्योपाधिक नेमस्त॥ ईश्वर जाणा॥ ९८॥ हें तत्सदाख्य निरूपण॥ वाच्यांशलेंकेलें कथन॥ तो वाच्यांश हरतां पूर्ण॥ केवळब्रह्म॥ ९९॥ इतिश्री ईश्वररूपव्याख्यायाः अ० पंचमसर्गः॥ ५॥

श्रीहंसगुरवेनमः॥ ब्रह्माविष्णुविश्वेशइंद्र॥ आदिकरोन प्राणिमात्र॥ तेथें तेथें मीच शरीर॥ अध्यास करी॥ १॥ तोचि जाणावा जीव स्थूळ॥ एका भिन्न होतां केवळ॥ देहभेदें नाना बरळ॥ आपणा मानी॥ २॥ हेंचि केसें तें सविस्तर॥ निवेदितों संतां समोर॥ तरी ऐकीजे जी सादर॥ एकाग्रपणें॥ ३॥ मूळमाया मूळस्फुरण॥ माजी आभासे जें चैतन्य॥ तयाचें चैतन्या अभिधान॥ शबलब्रह्म॥ ४॥ मूळपुरुषमूळमाया॥ शबलब्रह्म संज्ञा तया॥ अथवा अव्यक्त ऐशिया॥ परी हीख्याति॥ ५॥ मूळमायेमाजी त्रिगुण॥ जें भासो लागली समान॥ महत्तत्व नामकरण॥ तेव्हां येतिशी॥ ६॥ निखळ सत्वतम दोनी॥ जी माजीते विद्याजननी॥ मिश्रितो भयारजोगुणी॥ अविद्यामाया॥ ७॥ एवं विद्या अविद्या जेथें॥ महत्तत्व ह्मणावें त्यातें॥ माजी विद्येचें स्वरूप तें॥ एकाजी आधीं॥ ८॥ स्वरूपोन्मुखतें स्फुरण॥ असतां भासों लागे आ

न ॥ असें जों तों स्वयें स्मरोन ॥ स्वयत्नीं मिळे ॥ ९ ॥ शबलब्रह्म जें बोलिलें ॥ वियेमाया सारी
आभासलें ॥ त्या आभासाशी नाम आलें ॥ ईश्वर ऐसें ॥ १० ॥ ईश्वरा प्रती सत्वोपाधी ॥ नि
मित्तकारण प्रसिद्धि ॥ उपादानकारणसिद्धि ॥ तमोपाधीनें ॥ ११ ॥ एक ईश्वर जो म्हणोन
॥ तोचि निमित्त उपादान ॥ नट जैसा नटे आपण ॥ अर्द्धनारित्वें ॥ १२ ॥ निमित्तोपादान उभ
यय ॥ ईश्वर चि येक अद्वय ॥ शिवविष्णूचें रूप होय ॥ मुख्यत्वें तेंचि ॥ १३ ॥ यास्तव शिव
विष्णु दोनी ॥ ईश्वर चि स्वयें म्हणोनि ॥ नित्यमुक्त निर्मोहपणीं ॥ बोलिली श्रुति ॥ १४ ॥
श्रोते म्हणती सत्वोपाधी ॥ विष्णु निमित्त वाटे बुद्धी ॥ उपादान शिव अनादि ॥ तमोपा
धीनें ॥ १५ ॥ परम हेतु एक शिव ॥ विष्णुमय हें जग सर्व ॥ निमित्तोपादानीं तो भाव ॥ श्रु
तीचा ऐसा ॥ १६ ॥ उपाधीकडे दृष्टि देतां ॥ श्रुत्यर्थाशी मिथ्यारूपता ॥ श्रुतिवचना विश्वास
तां ॥ प्रत्यय उडणें ॥ १७ ॥ ऐसे दोनी पक्ष विरोधि ॥ वारीं बापा तूंचि सुबुद्धि ॥ आणि

कैसें तें प्रतिपादीं ॥ उपादान ही ॥ १८ ॥ ऐकून श्रोत्यांचें वचन ॥ वक्ता बोले होऊनि लीन ॥ स
र्वज्ञांची आज्ञा प्रमाण ॥ तरी ऐकाजी ॥ १९ ॥ वामसव्य उभय कर ॥ यांचे होती जे जे व्यापार ॥ न
बदलती परस्पर ॥ ऐसें तो नसे ॥ २० ॥ नातरी अर्द्धनारी वेष ॥ तेथें सव्यांगीं दिसे पूंस ॥ तें
चनटे शाविल्या स्त्रीस ॥ घडो शंके कीं ॥ २१ ॥ कीं कीजे इडेनें पूरक ॥ पिंगला नाडीनें रेचक ॥
परी पूरका चा रेचक ॥ पिंगलेशीही ॥ २२ ॥ अथवा शुक्लभासे कृष्ण ॥ कृष्णतें दिसे शुक्लवर्ण ॥
हें तुम्ही पाहाना अन्योन्य ॥ काय उदक ॥ २३ ॥ हें असो या मासें वनिता ॥ मासें इलेशी पुरु
षता ॥ येल होली विदित वार्ता ॥ आहे चि तुम्हा ॥ २४ ॥ तेवी निमित्तीं उपादान ॥ उपादानीं
निमित्तपण ॥ दिसतां प्रत्यवाय पूर्ण ॥ विचारें नाहीं ॥ २५ ॥ मनुष्यत्व हें साधारण ॥ तें स्त्री
त्व पुरुषत्व दोन ॥ भेद तैसेंचि उपादान ॥ निमित्तेश्वरीं ॥ २६ ॥ विष्णु जरी निमित्त झाला ॥
शिव उपादान दिसला ॥ कीं शिव निमित्त विष्णूला ॥ उपादानता ॥ २७ ॥ परी ईश्वरत्व अभेद
॥

अमृ० २

सर्ग ६

तेथेंनाहींअसहीभेद॥हेंतुम्हीजाणतसांसिद्ध॥मीकायसांगूं॥२८॥मुख्यतेंसत्तानिमित्त
ता॥सल्लक्षणजेसुखावस्था॥तोअर्थशिवशब्दींहोतां॥सत्यचिश्रुति॥२९॥तरीश्रुतीकीं
प्रत्ययाशी॥केंविरोधसांगाजीमशी॥म्यांनिवेदावेंसर्वज्ञाशीं॥ऐसेंतोनाहीं॥३०॥तथा
पिब्रह्मवयाभूषण॥मन्मुखेंवदविलेंपूर्ण॥तरीहेंकृपेचेंलक्षण॥आपुलेंस्वामी॥३१॥आतां
उपादानजेंहोत॥तेंपरिणामीकींविवर्त॥सांगाहींएकानिश्चितार्थ॥कैसाअसेतो॥३२॥दधी
दुग्धवदुपादान॥नऐसेंअध्यासाधिष्ठान॥रज्जूचियाफणीलागून॥रज्जुहाजैसा॥३३॥नात
रीजैसामृगजळा॥विवर्तोपादानार्ककळा॥कींनभाचियापुष्पमाळा॥लागूननभ॥३४॥अ
सोमहत्तत्वकारणीं॥विद्यामायेचिउभारणी॥कैशीतेबोलिलेंवचनीं॥अल्पसंकेतें॥३५॥ऐ
कूनवक्त्याचेंउत्तर॥सज्जनसुखावलेथोर॥मगकरूनअत्यादर॥बोलतेझाले॥३६॥यासर्गीं
जीवाविद्यामुख्य॥सांगणेंआहेअवश्यक॥तरीतेंआतांकथानक॥एकवींआह्मां॥३७॥

श्रीराम २

हु

वक्ताबरेंह्मणूनि॥प्रवर्तलाज्ञाताव्याख्यानीं॥येथेंसर्वींसावधपणीं॥द्यावेंजीचित्त॥३८॥
मूळमायामुळींचीस्फूर्ति॥माजीआभासेजेचिद्व्यक्ति॥तेशबलब्रह्माचिस्थिति॥कथिली
वरी॥३९॥मूळमायेमाजीत्रिगुण॥समत्वेंजेव्हांभासमान॥होतीतेव्हांत्याअभिधान॥येम
हत्तत्व॥४०॥तेंचेनिखळसत्वतम॥जयातेंविद्याऐसेंनाम॥तिचेहीवरीभिन्नवर्म॥स्प
ष्टकेलेंसे॥४१॥आतांतमसत्वमिश्रता॥जेकामलिनसत्वावस्था॥तेरजत्वेंअविद्यामाता
॥कैशीतेऐका॥४२॥स्वरूपोन्मुखहोतांस्फूर्ति॥नेणवेजेकावस्तुस्थिति॥रज्जूअसूननेत्रां
प्रती॥नदिसेजैसा॥४३॥दिसूंनद्यावेंमूळरूप॥दावावाअन्यथाविक्षेप॥रूपोभयांअवि
द्याजस्य॥करितीबुध॥४४॥शबलब्रह्मजेंबोलिलें॥तेंजेंअविद्येआभासलें॥तेंतयाजी
वनामआलें॥समष्टिरूप॥४५॥हासमष्टीचामहाजीव॥ईश्वरत्वेंचियाचाभाव॥याशीच
नांवब्रह्मदेव॥जाणिजेऐसें॥४६॥अविद्येनेंजीवत्वआलें॥तेंश्रीगुरुबोधेंफिटलें॥ह्मणो

नत्याश्रुतीच्या बोलें ॥ जीवन्मुक्तत्व ॥४७॥ जीवपणा प्रतिषेधून ॥ पुढें मुक्त जाहले पूर्ण ॥ त्यासी
च जीवन्मुक्त म्हणून ॥ सर्व स्नाठावी ॥४८॥ ऐसा हा ब्रह्मा समष्टीचा ॥ ईशात्वें जीव सकळांचा ॥
जैसा हेतु नाना जळींचा ॥ आभासा सूर्य ॥४९॥ त्रिगुण भिन्न भिन्न पणीं ॥ होणें तेचि गुण क्षोभिणी ॥
जीवेशभेद हाये थूनी ॥ झाला से जाणा ॥५०॥ तोचि भेद सृष्टिकारण ॥ झाला निश्चय आणा पू
र्ण ॥ तेविषययींचें निरूपण ॥ कांहीसें ऐका ॥ ५१॥ निमित्तोपादान जो ईश ॥ सृष्टि रचि
ता हो अशेष ॥ त्यावरी जे कृतिमानस ॥ जीवसृष्टि ते ॥५२॥ ईश्वरें जें जें कांहीं केलें ॥ तें तें जी
वें भोग्या आणिलें ॥ कीं ईश कृद्रूपा ठेविलें ॥ अनीशें नाम ॥५३॥ म्हणजे रूप स्थूळ सूक्ष्म ॥
ईश्वराचें कृत हा नेम ॥ तें अमुका अमुक नाम ॥ तें जीवकृत ॥५४॥ कृत जें समष्टीश्वराचें ॥
तें भोग्य समष्टीजीवाचें ॥ हो तगुण दोष असाचे ॥ कल्पून वरी ॥५५॥ कीं ईशरूप महाजीव ॥
मेधा तपें रची जें सर्व ॥ तें व्यष्टिजीव आणी नांव ॥ ठेवून भोग्या ॥५६॥ या स्तव नाम रूपा सर्व ॥

कर्तें जीवेशो भयभाव ॥ अविद्या विद्या उपाधित्व ॥ धरितां झाले ॥५७॥ व्यष्टीं जीव भेद झाला कैसा ॥ तोवि
चार आणिजे ऐसा ॥ जैसा स्वप्न सृष्टीचा ठसा ॥ एकापें झाला ॥५८॥ जीवानेकत्व व्हाया मूळ ॥ अवि
द्या नानात्व केवळ ॥ चंद्रादि छाये जैसें जळ ॥ बहु घटींचें ॥५९॥ मूळ अविद्या अव्याकृत ॥ अनेकधा
जे धवां होत ॥ तें कारणशरीर येत ॥ नाम तयेशी ॥६०॥ मूळाविद्या एक निश्चिती ॥ परी तिच्या अनं
त शक्ति ॥ जैशीं एका दावणी प्रती ॥ अनेक दांवीं ॥६१॥ तेथें प्रतिदांव्या एकेक ॥ बद्ध आहला
पशु मूर्ख ॥ तैसा चि जीव भोगी दुःख ॥ मीपणें देहीं ॥६२॥ ते जीव नाना कारणींचे ॥ प्राज्ञना
में बोलिले याचे ॥ सूक्ष्मीं स्थूळीं तेचि असाचे ॥ तैजस विश्व ॥६३॥ महत्तत्वींची मूळाविद्या ॥ स
मष्टिरूप जे का आद्या ॥ तिशी अव्याकृत हें सद्या ॥ आलें से नाम ॥६४॥ तेथील चिच्छाया स्व
येभ ॥ तो ईश्वर हिरण्यगर्भ ॥ सूत्रीं स्थूळ विराटीं डिंभ ॥ वैश्वानराख्यें ॥६५॥ असो ऐसा नाना
तें जीव ॥ मुक्तीं एक अभिन्न शिव ॥ होतां उगा घे अहंभाव ॥ मी देह बळें ॥६६॥ मुंगीपासून ब्रह्मदेव ॥

इंद्रादिक कीं विष्णु शिव ॥ देहमात्रीं मी मी हा भाव ॥ जीवें घेउगा ॥ ६७ ॥ जीव पाहतां परिपूर्ण ॥ शुद्ध
रूप चैतन्य घन ॥ देहाहून असंतभिन्न ॥ देहाचा साक्षी ॥ ६८ ॥ देहापें जीव भिन्न कैसा ॥ गृहस्वा
मी गृहाशीं जैसा ॥ कीं दामीं पशु हा असमा ॥ न घडे दाम ॥ ६९ ॥ नातरी काष्ठीं जैसा वन्ही ॥ न का
ष्ट निश्चयें करोनी ॥ कीं आकाश पंकमिळणीं ॥ न पंक जैसें ॥ ७० ॥ अविद्येच्या आधीन झाला ॥ तेणें
चि जीव दुःखी ठेला ॥ जैसा दुष्टाभिनीवरला ॥ राउत कच्चा ॥ ७१ ॥ अविद्या जे अति मलीन ॥
काम कर्मादिकें करून ॥ तद्वश जीव होतां पूर्ण ॥ क्लेशातें पावे ॥ ७२ ॥ ह्मणाल त्यां वरुती आ
तां ॥ नित्यमुक्ता लागीं जीवता ॥ वर्णिली तेणें दुःखावस्था ॥ त्यों शिही आली ॥ ७३ ॥ तरी स्वा
मिया अवधारा ॥ बंधन नाहीं चतुर्वक्त्रा ॥ तरी बद्धता हरिहरां ॥ घडेल कैशी ॥ ७४ ॥ ब्रह्मा जी
वत्वें बद्ध झाला ॥ होतां तोही बोधें सूटला ॥ जीवत्व नसतां श्री शेशाला ॥ बंधना दुःख ॥ ७५ ॥ ह्म
णोन नित्यमुक्तपणें ॥ ईश्वर हा उभयां गानें ॥ बोधिलें ब्रह्म या कारणें ॥ जेणें सद्रूप ॥ ७६ ॥ वैकुंठ

कैलासनायक ॥ यां जीवत्व औपचारिक ॥ साकार दृष्टि निरर्थक ॥ वर्णिलें असें ॥ ७७ ॥ ऐसें ऐकून
समाधान ॥ श्रोत्यांचें सुखावलें मन ॥ मग ह्मणती सांगे चिन्ह ॥ क्लेशादिकांचें ॥ ७८ ॥ क्लेश कर्म वि
पाकाशय ॥ अविद्या धर्म जे निश्चय ॥ ते माथां घेऊन अपाय ॥ जीव हा पावे ॥ ७९ ॥ ते चि क्लेशादि
धर्म कैसे ॥ कळाया बोलु हो तीं ऐसे ॥ जो त्याग केलिया मानसें ॥ जीव हो सुखी ॥ ८० ॥ अविद्या राग
द्वेषास्मिता ॥ तेवीच अभिनिवेश ता ॥ या पंच काशी नामवाली ॥ क्लेश हे ऐशी ॥ ८१ ॥ अनित्याशु
चि दुःखानात्मा ॥ तेथें जो नित्यादिकें प्रेमा ॥ त्या विपरीत बुद्धिधर्मा ॥ अविद्या नाव ॥ ८२ ॥ स्फु
रणापासून देहांत ॥ हा सकळमीच संघात ॥ हे अस्मिता असे विख्यात ॥ अहंकाररूपें ॥ ८३ ॥ राग
नामें विषयप्रीति ॥ अप्रीतीशी द्वेष ह्मणती ॥ अभिनिवेश कर्तास्फूर्ति ॥ भोक्ता हि मी चि ॥ ८४ ॥
कीं अभिनिवेश तो ऐसा ॥ ममत्वबुद्धि जे मानसा ॥ अथवा भय चि सहसा ॥ वाटावें मना ॥ ८५ ॥
यापरी हें क्लेशपंचक ॥ जीवा लागीं महाघातक ॥ अवधारा आतां रूपक ॥ कर्माचें कैसें ॥ ८६ ॥ देहेंद्रि

याचा जो व्यापार ॥ तयाचें नांव कर्म थोर ॥ त्या कर्माचे भेद चवार ॥ ते होती ऐसे ॥ ८७ ॥ एक कर्म तें शुक्ल होत ॥ कृष्ण दूजि यासि म्हणिजेत ॥ शुक्ल कृष्ण ती जें चतुर्थ ॥ शुक्ल ना कृष्ण ॥ ८८ ॥ जपोपवासादि जें कर्म ॥ शुद्ध पुण्या देत परम ॥ त्या कर्माशी असे जी नाम ॥ शुक्ल हें ऐसें ॥ ८९ ॥ परस्त्री संगादि जें कांहीं ॥ कृष्ण कर्म नाम त्यां दिहीं ॥ आतां शुक्ल कृष्ण वर्म ही ॥ तें आहे ऐसें ॥ ९० ॥ मुख्य तें पुण्यालागीं देत ॥ पाप होतसे अंगभूत ॥ तें यज्ञादि कर्म निश्चित ॥ हिंसादि रूपें ॥ ९१ ॥ जेथें दोन्ही पुण्य ना पाप ॥ तें अशुक्ला कृष्णाचें रूप ॥ हें जो योगी ब्रह्म स्वरूप ॥ तेथें चि वसे ॥ ९२ ॥ हा कर्माकर्मादि गुह्यार्थ ॥ अक्रा सर्गीं पिंचोद्याख्यांत ॥ विशद ह्मणोनि येथें ॥ ठेविला गूढ ॥ ९३ ॥ आहे तें कर्म तें कवण ॥ ऐकावें विपाक लक्षण ॥ कर्मानुभव जो कां पूर्ण ॥ जीवाशी होत ॥ ९४ ॥ तो अनुभव त्रिधा रीती ॥ माजी प्रथम जाणा जाति ॥ देवासुर मनुष्य पंक्ति ॥ कीं तीर्यग्योनी ॥ ९५ ॥ अमुक भ्यास तों जगावें ॥ आयुष्य ऐसें त्या ह्मणावें ॥ सुख दुःख जें अनुभवे ॥ त्या नांव भोग ॥ ९६ ॥ अनादि

कर्मपिं निश्चित ॥ विपाकाशी कारणभूत ॥ पुण्यपाप संस्कार होत ॥ आशय तो चि ॥ ९७ ॥ एवं क्लेश कर्म विपाक ॥ आशय सह हें चतुष्क ॥ येणें जीव पावत दुःख ॥ अतिशयें शी ॥ ९८ ॥ हा स्वकीय कर्मानुसार ॥ होऊनि प्रेर्य परतंत्र ॥ किंचिज्ज आहे निर्द्धार ॥ देहाभिमानें ॥ ९९ ॥ जो जो साकार देह झाला ॥ जीव मीच ह्मणूं लागला ॥ सार्वभौम हा जैसा आला ॥ ग्रामाधीश ला ॥ १०० ॥ अविद्या असो निस्वभिन्न ॥ तत्कर्म माथां घेसंपूर्ण ॥ निशाचरांचें आचरण ॥ साव हा जैसें ॥ १०१ ॥ हें असो अविद्येचें कर्म ॥ स्वमाथां घेत देहधर्म ॥ मीच हा मरें पावें जन्म ॥ ह्मणवोनियां ॥ १०२ ॥ त्वं पदाचें हें निरूपण ॥ वाच्यांश लेंकें केलें कथन ॥ तो हरलिया जीव पूर्ण ॥ केवल ब्रह्म ॥ १०३ ॥ इ० अ० जीवरूपव्या० षष्ठ सर्गः समाप्तः ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

अमृ॰ ६

सर्ग ६

श्रीराम ६

श्रीहंसगुरवेनमः॥ परब्रह्मजें परात्पर॥ तेथें नानाविधविं[illegible]व॥ नसे निर्मूळ चराचर॥ सामर्थ्यें दावी॥१॥ तेबुद्धिरूपा महाशक्ति॥ परब्रह्माची मूळस्फूर्ति॥ तयेशी च नाम प्रकृति॥ सर्वांचें मूळ॥२॥ याचें सविस्तर कथन॥ अंगीकारा तुम्ही सज्जन॥ ऐसें श्रोतीं अवधारून॥ सावध झाले॥३॥ ब्रह्म सच्चिदानंदघन॥ भेदपरिच्छेदविहीन॥ अखंडत्वें दंडायमान॥ अनंतरूप॥४॥ अत्यंत थोराहून थोर॥ जेण चेज्याचा पारावार॥ तेंचि परब्रह्म साचार॥ सर्वदा असे॥५॥ नाहीं जयाशी उपजणें॥ मरणें आणि येणें जाणें॥ सदां सर्वकाळ असणें॥ अखंडरूप॥६॥ कीं प्रागभाव ध्वंसाभाव॥ अन्योन्याभाव अत्यंताभाव॥ त्रिकालाबाध्य स्वयमेव॥ सद्रूपें ब्रह्म॥७॥ सकळ कांहीं दृश्यभास॥ नामरूपात्मक खें कोस॥ जेणें प्रकाशी जें अशेष॥ दृष्टा साक्षित्वें॥८॥ दृश्य भासतो ओसरला॥ निर्मळपणें लया गेला॥ त्या लयाशी पाहता झाला॥ त्या नाव साक्षि॥९॥ यापरी ष्टा

अमृ०
॥१॥
ओ

साक्षीशक्ति॥भिन्ननामींएकचिन्मूर्ति॥चिद्रूपब्रह्मसाम्हणती॥स्वयंप्रकाश॥१०॥दुःखाभा वींउपजेसुख॥सुखाभावींनिपजेदुःख॥याविकाराअलीनलेख॥सुखमात्रज्या॥११॥तो चिकेवळआनंद॥घनशब्देंभरींवकंद॥अभेदनामेंनाहींभेद॥कदाहीज्या॥१२॥स त्यतेंब्रह्मयेकजैसें॥दुजेंजरीअसतेंतैसें॥सजातीयभेदाचेंपिसें॥तरीचहोतें॥१३॥एक चिएसेंम्हणेश्रुति॥अर्थातअन्याचीव्यावृत्ति॥विजातीयभेदाचीयुक्ति॥म्हणोनव्यर्थ॥ १४॥विजातीयभेदसंभवे॥जरीमिथ्याकांहींअसावें॥तेंतरीनसेचिस्वभावें॥तिहीं हीकाळीं॥१५॥ब्रह्मींअवयवनसतां॥स्वगतभेदमिथ्यावार्ता॥अद्वयास्फूरणाची कथा॥नाहींचनाहीं॥१६॥अहंब्रह्मस्फूर्तिपांचोन॥विद्याविद्यानहोतीदोन॥दि सतीकायदेहावीन॥नामसव्यंगें॥१७॥विद्याविद्याजरीफोस॥कैंप्रतिभासती जीवेश॥जीवेशांपांचोनिजगास॥ठवहाकैंचा॥१८॥म्हणोनस्वगतहेंभेद॥

सर्ग ७

श्रीराम
६

नाहींनासजातीयबंध॥विजातीयाचातोसंबंध॥नाहींचनाहीं॥१९॥ब्रह्मेंएक देशीअसावें॥तैंचदेशेंपरिच्छेदावें॥व्यापकातयूनस्वभावें॥देशतोकैंचा॥२०॥नित्य त्वींकालपरिच्छेद॥हातोतर्कैकेवळमंद॥वस्तुरूपापदार्थैबाध॥कधींहीनव्हे॥२१॥साव यवेंजेंजें कांहीं॥तेथेंसंभवेहेंसर्वही॥पूर्णखंडातेंतिंचिदेहीं॥असंभाव्यहें॥२२॥खंडलेंचि नाहींअखंड॥तेथेंमायादिकांचेंबंड॥शरीरेंनाचितरीपाखांड॥बोलावेंकाशा॥२३॥ऐसा हाब्रह्मात्माअनंत॥मायाकल्पनेंविरहित॥तेथेंअहंब्रह्मास्मिहेत॥स्फुरलाचिनाहीं॥२४॥ स्फूरणसत्यनाहींझालें॥जगत्कार्येंअनुमानिलें॥अज्ञानरज्जुसर्पामुळें॥रज्जूचें जैसें॥२५॥रज्जुभुंजगसत्यनाहीं॥रज्जुअज्ञानाठायकहीं॥मिथ्याहोतांजगकार्य ही॥स्फूरणतैसें॥२६॥मिथ्यात्वचिस्फुरणाचया॥म्हणोनत्याम्हणतीमाया॥जेना हीकदाकाळीं तिया॥मायाहेंनाम॥२७॥मायातेंचघडेलसत्य॥जैसेंमृगजळेंतृषा

भ्रांत ॥ तत्त्वहोऊनियां निश्चित ॥ रमेल सुखें ॥ सेनागंधर्वनगरिंची ॥ धांवण्यास धांवे सगि
ल साची ॥ किंवा कोणा वंध्यापुत्राची ॥ घडेल भेटी ॥ २९ ॥ शशशृंगाचें शस्त्र घडे ॥ शुक्तिर
जत हाताचें ढे ॥ नाल रीमणी हा आतुडे ॥ रज्जूसर्पाचा ॥ ३० ॥ नक हातीं च्या केशाप्रती ॥ देव
ल कवणा ग्रंथि ॥ नरवधारा तमाची स्थिती ॥ खर्वंड वेल ॥ ३१ ॥ कांसवी च्या घृतीं पद्माभें ॥
तळीं येतीस हजपणें ॥ महाफणी ऐकेल कानें ॥ सुस्वरगीत ॥ ३२ ॥ किंवा शिरच्छेद ध्यायेचा ॥
घडें जिंका का बागुलाचा ॥ अजागलस्तन दुग्धाचा ॥ दोहावा होय ॥ ३३ ॥ चंद्र खळां धा
न्यमळणी ॥ इंद्रचापाशी गवसणी ॥ लेणी घालुवती वेणीं ॥ स्वामीकन्येचा ॥ ३४ ॥ खद्यो
ताग्नीचिया सुलेजें ॥ दिवे लावचतील सांजे ॥ चित्रींया पर्जन्यें भिजे ॥ केदारक्षेत्र ॥ ३५ ॥
काळिमा लागेल आकाशा ॥ नमये सामोरें चंडांशा ॥ पिकें पिकतील हुताशा ॥ माजी बर
वीं ॥ ३६ ॥ करो निर्यावायुचा सोल ॥ महागज आकळवेल ॥ दोहियेलें दुग्ध भरेल ॥ मागु

तें स्तनीं ॥ ३७ ॥ कीं मासा पूर्वीं चिया मृता ॥ पूर्वचित कुटुंबीं संस्था ॥ सिद्ध करुळे लतत्व
ता ॥ बद्धाशी जरी ॥ ३८ ॥ तरीच माया होय सत्य ॥ नव्हे ह्मणोनी हे असत्य ॥ स्वस्वरूपीं
माया विवर्त ॥ श्रुत्यनुभवें ॥ ३९ ॥ विच्यारें मायातु मिथ्या तुच्छ ॥ तर्कानुमानें अनिर्वाच्य
येरां अज्ञानें भासे साच ॥ सर्वही काळ ॥ ४० ॥ परी हे नाहींच निश्चिती ॥ तिहीं हीं काळीं बो
ले श्रुति ॥ मंत्रमण्योषधिनें शक्ति ॥ अग्नीची जैशी ॥ ४१ ॥ सत्य ह्मणों तरी हे नासे ॥ अ
सत्य तरी कार्य दिसे ॥ ताकिं कां अनिर्वाच्य भासे ॥ माया हे ऐशी ॥ ४२ ॥ मिथ्या प्रतिभा
सापाहून ॥ सत्यत्वबुद्धि भुंकें श्वान ॥ तैसा बद्ध मिथ्या नेणून ॥ वरके सत्य ॥ ४३ ॥ परी
माया जगासहित ॥ नाहीं चनाहीं हा सिद्धांत ॥ स्थाणूचोर मिथ्या तैं होत ॥ लूट ही तैशी ॥ ४४ ॥
मुधीं मृगजळ चि नसे ॥ तरी मासे ही तैंचि तैसे ॥ चकोराची तृप्ति अंयसे ॥ न घडों शके ॥ ४५ ॥
हें कांहीं जरी होतें सत्य ॥ तरी माया आणि तत्तुल्य ॥ साच ह्मणूं येतें निश्चित ॥ कोणा ही

अम०
॥३॥

कधीं ॥४६॥ पाइंजातां अहंस्फुरण ॥ परब्रह्मीं केवळ शून्य ॥ ह्मणे निर्भ्रमाद्वय पूर्ण ॥ जैसा चें तैसें ॥४७॥ तथापि कोणी आपणाला ॥ मी आहे सें स्मरताझाला ॥ तेणें काय द्वितीय आला ॥ येतो पुरूष ॥४८॥ साचचि द्वितीयत्वा आला ॥ तरी चोरें घालिता घाला ॥ छायेनें आइलरक्षिला ॥ पां यनीं ॥४९॥ छायेनें घडे होय कैसें ॥ ना पिलसो डिळा राक्षसें ॥ ह्मणोन छाया माया असे ॥ साचचि पणें ॥५०॥ मायीक होतां साचमानें ॥ तें माया मोहित्या कारणें ॥ मायासी ता मायाहरिणें ॥ भुलली जैशी ॥५१॥ जै थेसी तेची हे अवस्था ॥ कोण पाड ये रांग्राकृतां ॥ असो ब्रह्मीं स्फूरणवार्ता ॥ मिथ्या चिसारी ॥५२॥ स्मरो कीं न स्मरो आपणा ॥ पुरूष अधिक ना उणा ॥ होतां न होतां छायाकोणा ॥ न न्यूनाधिक्य ॥५३॥ ब्रह्मस्वयें स्मरे मी असें ॥ जगदिसे त्याच सरिसें ॥ न्यूनाधिक्य तेंना हीं कैसें ॥ साच मानावें ॥५४॥ आणीक जैसें सत्संकल्पें ॥ जगदिसे प्रत्यक्षरूपें ॥ तैसे कांनक नजी

सर्ग

यस्थ

या

श्रीराम
३

यसंकल्पें ॥ दिसत असे ॥५५॥ तरी ऐकावें सावधान ॥ नव्हीं तरंगाचें स्फुरण ॥ [illegible] ॥ होतां काय विशेषण ॥ ये तसें जग्या ॥५६॥ विशेषाधीन परब्रह्म ॥ जैसें तैसें सर्वदा [illegible]म ॥ तेथें नामरूपाचा भ्रम ॥ भ्रमिष्टा साचा ॥५७॥ भ्रमिष्टासि भ्रम जो झाला ॥ ब्रह्मीं तेणें लो आरोपिला ॥ आणि नावठे विलें त्याला ॥ सत्यसंकल्प ॥५८॥ एवं कल्पकाची कल्पना ॥ हे सारी बळावली जाणा ॥ एऱ्हवीं विचारें असेना ॥ काहींच साच ॥५९॥ अहंब्रह्मास्मि कल्प ॥ या हेतूतो सत्यसंकल्प ॥ ज्ञा ळाना हीं ह्मणोन जल्प ॥ मायाया नामें ॥६०॥ मायीक सृष्टी नसतां दिसे ॥ हेंचि महदाश्चर्य असे ॥ तरी हें रूप चिकीं ऐसें ॥ सत्संकल्पाचें ॥६१॥ मनोमय कल्पना जैंधी ॥ कीं जैशी स्वप्नसृष्टी व्हावी ॥ ब्रह्मसृष्टी तैशी असावी ॥ आणि जैशी ती ॥६२॥ ह्मणा येक सकळ वेद ॥ दूजी व्याची नयाप्रसिद्ध ॥ तरी परिणाम विशद ॥ दोहिंचा सम ॥६३॥

स

असे

श्रीराम

बहु कीं अल्पकाळें गेलें ॥ परी जाणें नाहीं चुकलें ॥ व्यष्टि समष्टि हेंचि झालें ॥ कारण त
या ॥ ६४ ॥ असो जें जें निर्मिलें जेणें ॥ मी तूं शक्तू त्याकारणें ॥ करें अथवा केलें मनें ॥ तें तें
गेंडें जैसें ॥ ६५ ॥ म्हणोनियां प्रत्यक्ष सृष्टि ॥ जे रचिली जीवें समष्टी ॥ ते दिसेचि रकाळ
दृष्टी ॥ सर्व येद्यत्वें ॥ ६६ ॥ परी हें साच नाहीं झालें ॥ भ्रांतें उगें सत्य मानिलें ॥ मृगजळ
जैसें कल्पिलें ॥ मृगें चि साच ॥ ६७ ॥ रज्जू चएक नयनाशी ॥ दिसल असतां कल्पने
शी ॥ भ्रमें भासें व्यर्थ मानसीं ॥ नसला चि सर्प ॥ ६८ ॥ जगत्कार्यें कारण माया ॥ कल्पि
ली परी असे वायां ॥ स्फोटें दाह शक्ति जैशिया ॥ परी वन्हिं त ॥ ६९ ॥ दाहशक्ति स्फोट
ना वन्ही ॥ जगना ब्रह्म मायराणी ॥ मध्यें चि हे तिसरें पणीं ॥ नसून भासे ॥ ७० ॥ हे
भिन्न म्हणतां वेगळी ॥ काढितां नये कदां काळीं ॥ अभिन्न तरी सर्वकाळीं ॥ नसे चि ब्र
ह्मीं ॥ इच्छा उगा म्हावा सत्कारा ॥ कित्येक महाकवीश्वर ॥ वर्णिली हे सहस्त्रकर ॥ प्र

भाची प्रभा ॥ ७२ ॥ परंतु हे अखंडानंतीं ॥ संभवेना कदा कल्पांतीं ॥ हा निश्चय चिवे
दश्रुती ॥ यु[illegible] नुभवें ॥ ७३ ॥ ऐकून श्रोते सुखावले ॥ म्हणती स्वांडों निरूपिले ॥ तेणें स
माधान जाहालें ॥ पूर्ण आमुचें ॥ ७४ ॥ परी एक संदेह मना ॥ येथे अज्ञान झालें कोणा ॥
चिद्धनीं तरी संभवेना ॥ जगती जड ॥ ७५ ॥ म्हणो निस्फुरणा अज्ञान ॥ झालें म्हणतां
ही दूषण ॥ मूळपुरुषीं नेणपण ॥ ये तया हे तू ॥ ७६ ॥ मूळपुरुषीं जाऊ यज्ञरी ॥ तरी
ज्ञानकें चें ईश्वरीं ॥ शिवविष्णू चीमाल दूरी ॥ अनर्थ लि झाली ॥ ७७ ॥ आणीक एकें गा
वचन ॥ आधीं संकल्प कीं अज्ञान ॥ कीं जगयाचें ही कथन ॥ यथार्थ सांगें ॥ ७८ ॥
वक्ता म्हणे अवधारावें ॥ अज्ञान संकल्पा संभवे ॥ हें युक्त चि आहे स्वभावें ॥ सक
कमान्य ॥ ७९ ॥ परी तयाज्ञें (सें) अज्ञान ॥ तेणें चि रिति अहे ज्ञान ॥ विद्याविद्यारूपें क
रून ॥ कथिलें मागां ॥ ८० ॥ माडि विद्यो पाधि जयाची ॥ तो ईश्वर हें तो सिद्ध चि ॥ ह्म

णोनयस्तीअज्ञानाची॥ईश्वरींनाहीं॥८३॥निमित्तोपादानत्वभेदें॥ईश्वरयेकउक्तवेदें॥
यास्तवनित्यमुक्तबोधें॥श्रीशेशपूर्ण॥८२॥ईशस्वयेंज्ञानसंपन्न॥होतांमूळपुरुषींज्ञा
न॥आहेचयेथेंमुळाचीन॥येईलकैसें॥८३॥आलांसंकल्पकींअज्ञान॥किंवाआधीं
जगसंपूर्ण॥तरीकल्पनासपैचीन॥अज्ञानकोठें॥८४॥सर्पाज्ञानेंचीनकल्पना॥हेंही
घडेनाकदाजाणा॥कल्पनासअज्ञानेंविना॥सर्पहीनव्हे॥८५॥स्वप्नामाजीलप्रकार॥
कींदिसेरज्जूचाविस्तार॥तेथेंऐसाहोव्यभिचार॥कार्यकारणीं॥८६॥कल्पनामानिलां
कारण॥कार्यसर्पआणिअज्ञान॥सर्पकारणेंकायीज्ञान॥कल्पनेसह॥८७॥
अज्ञानकारणमानिलां॥समर्पकिल्पनेंकार्यता॥याव्यभिचारेंकायआतां॥म्हणावेंखरें॥८८॥कन्यालेचिलक्षणीमाता॥~~निजपुत्रसंभवेपिता॥हेंअघट~~घटेवार्ता॥स्वप्नीं
होडेंसी॥८९॥तैसेंकार्यीशीकारणत्व॥सर्वेचिकारणकार्य त्व॥हेंहीनव्हेअघटित्व॥
मायेवाचोनि॥९०॥म्हणोनहेंनव्हेसाचार॥आवघाभ्रांतिचाविकार॥हादृश्यभास
स्वप्नाकार॥निश्चयेंमिथ्या॥९१॥मिथ्याचपरंतुआभासे॥तदुपपत्तिव्हायाऐसें॥
चि पालन ॥ शिवरात्रीचें ॥ ५८॥ जैशी एकादशी पवित्र ॥ तैशीच महाशिवरात्र ॥ रामनवमी शीं साचार ॥ जन्माष्टमी ही ॥ ५९॥ फलाशान येचि मनांत ॥ हें चि आगळें याच हूत ॥ सहजीं चित्तशुद्धी होत ॥ मनुष्यमात्रीं ॥ ६०॥ हो का व्रतें अनेका परी ॥ याचहूंचि नयेची सरी ॥ तथापि एकादशी पुरी ॥ द्विपक्षा स्वगी ॥ ६१॥ या कारणें हे अतिश्रेष्ट ॥ शिवर्यादि तीन श्रेष्ट ॥ पक्षैकें चि नेतीव रिष्ट ॥ लोकीं या हेतू ॥ ६२॥ तेंव पुसतें सारे संत ॥ स्मार्त आणीक भागवत ॥ अनादिसिद्ध या दोहींत ॥ मत कोणतें ॥ ६३॥ तेवी भागवतांची चाली ॥ जे प्रस्तुत आहे चालली ॥ युक्त कीं अयुक्त कथिली ॥ पाहिजे तुवां ॥ ६४॥ अयुक्त होतां युक्त कैशी ॥ सत्य निवेदावी आम्हा शी ॥ जेणें संदेह नि मानसीं ॥ उरेना कांहीं ॥ ६५॥ वक्ता विनवी जी हे याती ॥ पुरे वेनाच सागूं आतां ॥ अग्रही पावती खिन्नता ॥ म्हणवोनियां ॥ ६६॥ संत म्हणती तूं जकाय ॥ आम्ही पुसतां आहे भय ॥ तरी यथार्थ सांगें ना सर्ये ॥ निःशंक सांगें ॥ ६७॥ तेंव्हां निरूपायें चि वक्ता ॥

सत्योत्तर ह्मणून बोलता॥ जीजी एकादशी पाहता॥ सन्मूळ आद्य॥ ६८॥ द्वैतास्तवनाव अद्वै-
त॥ तेथीच भागवतें स्मार्त॥ परी मूळ एक निश्चित॥ आद्येकादशी॥ ६९॥ येथें भवतुस्त्यां-
स्मृती॥ शतशः प्रमाण असती॥ पारणें ज्येयचें निश्चिती॥ द्वादशीमाजी॥ ७०॥ प्रसंत रही-
या महान्॥ प्रसिद्ध आहे पुरातन॥ अंबरीषें केली साधन॥ द्वादशी नान्या॥ ७१॥ परम
भक्त अंबरीष॥ जिणें तरला भवाब्धीस॥ भस्मानियां गेले अशेष॥ दोष ज्याचे॥ ७२॥ तें-
व्रत सोडूनि पावन॥ द्वादशी दिनीं उपोषण॥ पाळी पूर्वीं तरी भोजन॥ करूनि यांजी॥ ७३॥
पूर्व तो विद्ध तेंस दोष॥ उत्तर पारण्या निर्दोष॥ कल्पून करी भोजनास॥ उभय दिनीं॥ ७४॥
परी हाही नियम स्थिर॥ दृष्टि पडेना चि साचार॥ पूर्वा विद्धीं हीन द्विवार॥ भोजना सोडी-
॥ ७५॥ तैं जरी कां पुसत्या कोणें॥ तरी सांग तह्मा कारणें॥ आह्मा भागवतां पारणें॥ त्रयो-
दशींत॥ ७६॥ पुढें धरीतां मागे हाटे॥ मागें तरी पुढें निसटे॥ याखालींच आयुष्य घटे॥

तेण वेजया॥ ७७॥ तेणीव ह्मणजे विस्मृति॥ स्वयें कोण कर्त्तव्य स्मृति॥ दुरावलीं ज्यापें नि-
श्चिती॥ दुरभिमानें॥ ७८॥ यानावजी नूतन मत॥ जें का स्वकपोलकल्पित॥ अनादिसिद्ध
तें पूर्वोक्त॥ मन्वादिकृत॥ ७९॥ असो ऱ्या भागवतामनीं॥ भवाब्धि जाणें चि तरूनीं॥
सत्य तेणें द्वयोपोषणीं॥ प्रवर्त्तावें जी॥ ८०॥ ह्मणजे एकादशी चिया॥ भ्रमातीं संशयी रागि-
या॥ विद्धादीन पाहतां तया॥ द्वयोपवास॥ ८१॥ श्रीरुद्रावर्तनीं संदेहो॥ कीं भवव्याधी
त्रस्त देहो॥ पुनर्जपें द्विगुणें चि हो॥ लंघनें शुद्ध॥ ८२॥ या बोला नाहींच प्रमाण॥ ह्मणे त
ज्जिव्हा शतचूर्ण॥ होईल पाहावें ह्मणोन॥ शोधून तेणें॥ ८३॥ ऐशी उक्ति निष्पक्षपात॥
ऐकूनियां संत विस्मित॥ होऊनि बोलती उचित॥ निरूपिलें त्वां॥ ८४॥ तुझ्या पूर्ण सिद्धां-
त बोलें॥ संदेहाशी मरण आलें॥ आमचें अत्यंत तुष्टलें॥ अंतःकरण॥ ८५॥ आतां पुढील नि-
रूपण॥ अनुक्रमें करीं कथन॥ तेव्हां वक्ता ह्मणाला वचन॥ बोलता ऐसें॥ ८६॥ पंचाग्निसाध-

नकरणें ॥ अथवा वायू निरोधणें ॥ कीं धूम्रपान आचरणें ॥ जन्मादिवास ॥ ८७ ॥ इत्यादिकांस्म
णिजे तप ॥ परी हा बाह्य खटाटोप ॥ येणें बहु कीं पावे अल्प ॥ सकामफळ ॥ ८८ ॥ येणें विपरी
पर्वें नाना ॥ संक्रांत्यादि करोनि जाणा ॥ सकाम फल द वासना ॥ होताती जैशी ॥ ८९ ॥ मग तीं
प्रस्तुत कीं पुढें ॥ हानें मना हीं जी निवाडें ॥ निष्कामाचें फळ रोकडें ॥ हत्कुद्धि येथें ॥ ९० ॥
आतां दानाची वार्ता कैशी ॥ तेही अवधारा अल्पशी ॥ श्राद्धादिकांची ही कांहीं शीं ॥ ... तै
शीच कथा ॥ ९१ ॥ अन्नदान गोभूमीदान ॥ वस्त्र सुवर्णादिक दान ॥ गृहादि वस्तु कन्यादान
॥ यापरी दानें ॥ ९२ ॥ बहुत दानें पाहुं जातां ॥ नव्हे अन्नदाना साम्यता ॥ अन्न सर्व दानांच्या मा-
थां ॥ श्रेष्ठ तें असे ॥ ९३ ॥ अतिथि पातलीया घरीं ॥ जो सन्मानी निजासापरी ॥ अन्नदान तें-
चि चतुरीं ॥ जाणावें श्रेष्ठ ॥ ९४ ॥ इतर दानें जीं असती ॥ तीं फळाशें उपजविती ॥ अन्नदान तैसें
निगुतीं ॥ नव्हेच कदां ॥ ९५ ॥ अहो करूं जातां गोदान ॥ नृगाकेवढें आलें विघ्न ॥ हें पुरातन वर्त

मान ॥ जाणाच तुह्मी ॥ ९६ ॥ सकळ दानीं हेच स्थिती ॥ व्रतीं तपीं ऐशीच गती ॥ घडल काम निका
प्रती ॥ किंचित न्यंगें ॥ ९७ ॥ ह्मणोन कामना रहित ॥ सर्व हि कर्मीं भगवंत ॥ भजावा तरिच स्वहि
त ॥ निश्चयें होय ॥ ९८ ॥ निःकामीं घडतां हीन्यून ॥ कर्ता बाध रहित पूर्ण ॥ जैसा का अंबरीष
राजा ॥ तीर्थ हीघेतां ॥ ९९ ॥ असो पाळणें पितृतिथि ॥ तेथें ही होतां हेचि गती ॥ पितृगण
मा घारे जाती ॥ काम निकाचें ॥ १०० ॥ पितृतिथ्यादि नैमित्तिक ॥ ऱ्हाव्याच लागती वार्षिक ॥ या
गादिक सांवत्सरीक ॥ नव्हती तैसे ॥ १ ॥ हे विपुल वैभव होतां ॥ आणि करायाइच्छी कर्ता ॥
तैंच व्हावे प्रत्यवायता ॥ येऱ्हवीं नाहीं ॥ २ ॥ असो हे यागादिक कृति ॥ जो का पूजी भगवन्मूर्ति
॥ सकामपणें तो ही गती ॥ ऐशीच पावे ॥ ३ ॥ वेदशास्त्रोक्त मूर्ति नाना ॥ माजी जे प्रिय ज्याच्या
मना ॥ ते तो घेऊन तदर्चना ॥ प्रवर्त्ते प्रेमें ॥ ४ ॥ अंतरीं वांच्छूनि यां धन ॥ स्त्री पुत्रादि यशा कीं
मान ॥ आधीं प्रतिमेचें स्थापन ॥ वि ध्युक्त करी ॥ ५ ॥ दिव्य बांधूनियां मंदिर ॥ तेथें अर्पी

अमृ०
६

सर्गं
१२

सर्वोपचार॥ दासदासीवस्त्रालंकार॥ उत्तमोत्तम॥६॥ गजरथाश्वादिवाहनें॥ शिबिकादिकरोनि यानें॥ गोवृषभमहिषीवनें॥ उपवनेंही॥७॥ शुकसारिकादिमयूर॥ नानाविधपक्षी सुंदर॥ वापीकूपादिसरोवर॥ आल्हादकर्ते॥८॥ सुवर्णादि उत्तमपात्रें॥ भरूनि यांठेवी सुनीरें॥ पुष्पें तुळसी बिल्वपत्रें॥ युक्तपात्रेंही॥९॥ गंधकर्पूरपरिमळ॥ धूपदिपादिक तांबूल॥ पुष्पमाळाक्षतासोज्वळ॥ नैशींचि फळें॥११०॥ चामरातपत्रें निशाणें॥ भेरी दुंदुभी डंका वीणें॥ तालमृदंग युक्तगाणें॥ सामोरें देवा॥११॥ लाडूनें नैवेद्या सिद्धता॥ देवासंमुख बैसे स्वतां॥ सांग देवाशीं हो पूजिता॥ स्वदीक्षाक्रमें॥१२॥ नैवेद्य अर्पिल्या देवाशी निवेदी फलतांबूलाशी॥ मग जोडून दोंकरांशी॥ प्रार्थितसे॥१३॥ हे देव देवा जगदीशा॥ दिव्यभोग यावा बहुसा॥ जन्मोजन्मीं कांहीं सहसा॥ न्हावें नाडणें॥१४॥ दोहीं परी ममथांच्छीत॥ पुरवा पालूं चि समर्थ॥ या संकल्पें स्तविता होत॥ सकामस्तोत्रीं॥१५॥ सामर्थ्य

देवा

श्रीराम
६

वंत ऐसें सज्जी॥ येर अर्पूनि भातभाजी॥ देवालागीं सकामें पूजी॥ कल्पून सारें॥६॥ संवचोरजैसा काआधीं॥ गोड बोलून लावी नादीं॥ वरीं कांहीं देऊनि साधी॥ आपला काया॥७॥ तैसाचसकाम देवाशी॥ स्तऊनियां सेवी धनेशी॥ परी अंतर साक्ष देवाशी॥ हें कळे सारें॥८॥ असो सकाम जो का ऐसा॥ मुकोनियां देवा फलाशा॥ भ्रमे सदां कीटहा जैसा॥ आवर्तामाजी॥९॥ राज्यप्रासीच्या येतां काळ॥ मूर्ख इच्छीत पूगीफळ॥ तेणें योगें राज्या सफळ॥ ज्यापरी मुके॥१२०॥ तैसा सकाम नाशवंता॥ इच्छून अंतरे अनंता॥ मग राज्य गेल्या स्वस्थता॥ नदशा लेशी॥१॥ ऐशी भक्ती जो कोणी करी॥ जीवीं अद्वैद देवावरी॥ ते दुभंग नावसागरीं॥ बुडवी तैशी॥२॥ निर्निमित्त भक्ती वांच्छून॥ व्यभिचार सव्यवधान॥ याचें ह्रेनाचि दूषण॥ संसृति जेणें॥ ह्मणोन विचा-

रकरावा॥ हा नृदेह नदवडावा॥ उगा व्यर्थ ज्याचेनीं देवा॥ पाविजे मुख्य॥ ४॥ राजसकर्मी चीहे स्थिती॥ यथामतीतुह्मा पुढती॥ कथिली शुक्लकृष्ण उक्ति॥ इयेशीचलें॥ १२५॥
इ० अ० शुक्लकृष्णकर्मरूप अकर्मन्या० द्वादशसर्गः॥ १२॥ समाप्तः॥ ७॥ ७॥ ७॥

श्रीहंसगुरवेनमः॥ सत्य एकचिपरब्रह्म॥ असत्यजगद्रूपनाम॥ ऐसें आधीं ज्ञान उत्तम॥ परोक्षें झालें॥ ॥१॥ पुढें अपरोक्षें करून॥ सत्यकायतें ओळखून॥ येरतुच्छ केलीसंपूर्ण॥ ब्रह्माद्यैश्वर्यें॥ २॥ सकळेंश्वर्यें छेदीशी मूळ॥ बीजसंकल्प जो केवळ॥ स्वप्रकाशापरोक्षें काळ॥ त्याचाही झाला॥ ३॥ याशी ह्मणिजेता हे तप॥ हें शुद्धतपाचें स्वरूप॥ अंतर्तप ऐसा जो जल्प॥ तो एकयाशी॥ ४॥ शिवपजावा शिवपणें॥ तें हेंचि परिपूर्णत्वानें॥ ऐसेंस निश्चय आणनें॥ श्रुत्यनुभवें॥ ५॥ यापरी ऐकूनियासंत॥ बोलती गात्वां हा श्रुत्यर्थ॥ बहुसूक्ष्म काढिला युक्त॥ मानला आह्मा॥ ६॥ तरी आतां हें निरूपण॥ सविस्तर करीं कथन॥ तें धवांचका आनंदून॥ बोलता झाला॥ ७॥ अस्ति ब्रह्म भाति हीब्रह्म॥ ब्रह्मचि पूर्ण प्रियतम॥ नास्ति न भाति रूपनाम॥ अत्यंताप्रिय॥ ८॥ ऐसें श्रुतीनें ज्ञान झालें॥ तें परोक्ष आहे बोलिलें॥ गुरुमधुर करूं आलें॥ ऐकूनजेसें॥ ९॥ स्फुरणापासून देहांत॥ कीं घटपटादि पदार्थ॥ वस्तुजात आहे भासत॥ आणि प्रियही॥ १०॥ आहेपणा भासकपणा॥ प्रियता हे ब्रह्मींची पूर्णा॥ निवडिलिया नाहीं पणा॥ इत्यादि उरे॥ ११॥ तें

अमृ० १ | सर्ग १३

चित्याजगताचें रूप॥ ह्मणोनि सर्वनामरूप॥ आसज्जड दुःखस्वरूप॥ ज्ञान हें ऐसें॥१२॥ याशी अपरोक्ष ह्मणावें
॥परप्रकाश ऐशा नावें॥ दर्शकें दाविल्या जाणावें॥ गुडाशी जैसें॥१३॥ या अपरोक्षें सनिश्चय॥ अमंद वैराग्य
तें होय॥ तथापि अधुलें अपाय॥ सत्वर पावे॥१४॥ याच कारणें स्वप्रकाश॥ अपरोक्षज्ञान निर्दोष॥ व्हावें
लागे जैसें गुडास॥ सेवणें स्वयें॥१५॥ स्वप्रकाशापरोक्षावीण॥ संकल्परूप बीजाज्ञान॥ नजाय नानव्हेचि
पूर्ण॥ वैराग्य कदां॥१६॥ स्वप्रभापरोक्षें करोन॥ ब्रह्मास साक्षात्कार पूर्ण॥ तुटे असत्प्रीति बंधन॥ वैरा-
ग्यें सांग॥१७॥ त्रिधा प्रतीति नाम जीशी॥ ते हे जाणिजे येथें ऐशी॥ परी वैराग्य कासयाशी॥ ह्मणावें ए
का॥१८॥ सांग व्यंग द्विविध भेदें॥ सृष्टीमाजी वैराग्य नांदे॥ द्विविध भेदें चि विशदें॥ व्यंग जें तें ही॥१९॥ ह्म
णजे वैराग्यैकमूर्ति॥ परी त्या अंगें तीन होती॥ हेतुस्वरूप ती जें चिन्ही॥ जाणिजे कार्य॥२०॥ हेतु ह्मणजे
तें निमित्त॥ वैराग्य व्हावया चित्तांत॥ विषयमात्रीं सुनिश्चित॥ दोषदर्शन॥२१॥ विषयत्याग चि करणें॥
स्वरूप वैराग्याचें होणें॥ कार्य तदर्थ मागुतेनें॥ न व्हावें दीन॥२२॥ दोषदृष्टि व्हाया कारण॥ जाणिजे तें परोक्ष

श्रीराम १

ज्ञान॥ उभयापरोक्षक्रमानें॥ त्यागा कार्याशी॥२३॥ किंवा परोक्षीं अंग एक॥ वैराग्याचें आद्य निःशंक॥ अं
गद्वया परोक्षीं त्रिक॥ पूर्णपरोक्षीं॥२४॥ ह्मणोनि यां स्वयंप्रकाश॥ अपरोक्षज्ञानीं च वास॥ पूर्णवैराग्या
चा दिवस॥ रात्रीं निश्चयें॥२५॥ सूक्ष्मभेद हा वैराग्याचा॥ आधीं जाणला आवासाचा॥ ह्मणोन स्पष्ट के
ला वाचा॥ परिसा पुढें॥२६॥ विषयमात्रां माजी पूर्ण॥ ऐसें व्हावें दोषदर्शन॥ जैसें सविषान्न ऐकून॥ मन
त्या विटे॥२७॥ क्षुधा लागतां ही बहुत॥ त्या अन्नासांडून फिरत॥ मागें जेणें मरणग्रास॥ होय या हेतू॥२८॥
तैसा विज्ञो मुमुक्षु साचा॥ त्याग करूनि विषयाच्या॥ विटे फिरे जन्ममृत्यूचा॥ जाणून धोका॥२९॥ फिरला
विषयापासून॥ तो फिरला चि पुनः दीन॥ न व्हे सविषान्ना कारणें॥ क्षुधित जैसा॥३०॥ ऐसें तीव्रतर
वैराग्य॥ स्वप्रभापरोक्षें अभंग॥ एताचि स्वयें ब्रह्मासंग॥ झाला तें वसे॥३१॥ श्वान चघळितां अस्थि-
शी॥ सुखावे परंतु दुःखाशी॥ पात्र होय विषयीं तैशी॥ प्राणियां दशा॥३२॥ गळ गिळितां सुखवाटे॥
परी सवेंचि घसा फाटे॥ तैसें विषयीं आहे मोठें॥ दुःख निवार॥३३॥ गर्भापासून जन्मवरी॥ जन्मा

पूनमृत्युतोंवरी॥ सुखाचालेशयासंसारीं॥ तिळहीनाहीं॥३४॥ तथापिसुखचिकल्पिलें॥ तरीविनाशि
लेंनासलें॥ आयपापरीकळूंआलें॥ विच्यारकेल्या॥३५॥ तोचिविच्यारकैसाकीजे॥ देहाविवरूनपाहि
जे॥ तेंचिकांहींयेथेंबोलिजे॥ दोषदर्शना॥३६॥ देहाचेंपाहूंजातांमूळ॥ अत्यंतआहेअमंगळ॥ ज्या
ऋतुस्नातेच्याकेवळ॥ रुधिरींजन्म॥३७॥ स्त्रावझाल्याजयारुधिरा॥ बोलतवेदशास्त्रगिरा॥ अशु
चित्वत्यापेंशरीरा॥ उत्पत्तीहोय॥३८॥ ऐसेंअमंगळापासून॥ शरीरउपजलेंघाण॥ नवछिद्रेंयास
प्रमाण॥ प्रत्यक्षहोती॥३९॥ मांसास्थिआंतडीकांतडीं॥ माजीदुर्गंधीचींपोतडीं॥ कंटाळवाण्या
शिरानाडी॥ बहुसाललें॥४०॥ अशुद्धशद्धनाहींशुद्ध॥ त्याचांदेहींभरलानद॥ जंतादिकिडेना
नाविध॥ त्रासकतेसे॥४१॥ नासिकींमुखींश्लेष्मालाळ॥ उपस्थींगुदींमुत्रमळ॥ वाहतअसेस
र्वकाळ॥ मरणावधी॥४२॥ राहोंराहोंचिचमत्कार॥ वांटेकैसेंरेतरुधिर॥ एकझालेंकरार्यंकुर॥
फुटतीजया॥४३॥ हेंगर्भींमाजीकोणकरी॥ आंतबैसूनकोणेपरी॥ विचारूंगेलियाअंतरीं॥ नेणवेकां

हीं॥४४॥ उत्पत्तिमात्रपाहूंजातां॥ नेणवेपाचीनतत्वतां॥ नान्योत्तराज्ञानसमस्तां॥ याहेतूमूळ॥४५॥
स्वकीयरूपाचेंअज्ञान॥ तेणेंचिहेंअन्यथाभान॥ असोदेहालागींजनन॥ प्रत्ययायेत॥४६॥ जन्मा
पुढेंआहेसादिसे॥ वाढीयेदिवसदिवसें॥ तारुण्यभासूंलागतसे॥ मध्यमावस्थे॥४७॥ पुढेंहोतां
दिसतक्षीण॥ क्षीणहोतांहोतांमरण॥ पाउननाहींसाहोऊन॥ जायनजैसा॥४८॥ विचारेंदेहतु
च्छघाण॥ ममत्वेंकरूंयेस्वभिन्न॥ तोमीचमूर्खत्वयाहून॥ कोणतेंजगीं॥४९॥ गर्भींतीलजाचणी
किती॥ आठविलियात्रासेमति॥ जन्ममृत्यूच्याहीविपत्ति॥ स्मरतांतैसें॥५०॥ आदिअंतींदुःखदेहा
शी॥ ह्मणोनियांतेचिमध्याशी॥ मध्येंसुखवाटेचित्ताशी॥ परीतेंसांत॥५१॥ सुखजातांदुःखघडत॥
कींदुःखाभावींसुखहोत॥ जैसेंदिवारात्रींफिरत॥ यंत्रवाळूचें॥५२॥ कींदेहींमिश्रसुखदुःख॥ ऐसेंहो
यनिश्चयात्मक॥ जळामासारींजैसापंक॥ कींपंकींजळ॥५३॥ असोमृत्युकाळींशरीर॥ होऊनजा-
यथंडगार॥ थिजोनियानेत्रसुंदर॥ होतातखांची॥५४॥ नाकहोउनियांवांकडें॥ कोरामानगुटीचा

मोडे॥ अस्ताव्यस्त शरीरपिंड॥ अवनीवरी॥ ५५॥ तेव्हां कोणीच नये संगें॥ एकलीया चजाणें लागे॥ सकळ
ही फिरती मागें॥ स्त्रीपुत्रादिक॥ ५६॥ शरीर चिन्हें ज्या त्यांचें॥ तेथें येर कोण कोणाचें॥ देह कृमी विष्ठा
भस्मांचें॥ पात्र चि अंतीं॥ ५७॥ आला तैसाच जात प्राणी॥ ऐसें उघड दिसे जनीं॥ म्हणोनियां पाहवा मनीं॥ विचार जितां॥ ५८॥ पुरुषतो पाहे विचार॥ श्वान खरादि पशु येर॥ पशुत्वें आचरणी अपार॥ जन्ममृत्यूची॥ ५९॥ या हेतू सुखदुःखातीत॥ केवळ सुख जें शाश्वत॥ तेथें रमती बुद्धीमंत॥ उपेक्षें याच्या॥ ६०॥
ज्यास पूर्णबोध जाहला॥ तो पूर्ण सुखाशी पावला॥ त्याचा निःशेषत्वें तुटला॥ देहसंबंध॥ ६१॥ ज्ञात्याचा संबंध देहाशीं॥ नसे तरी वागणें त्याशी॥ होतां दिसे दिवा कीं निशीं॥ तें कोणे परी॥ ६२॥ प्रारब्धें देहाची
व्यवस्था॥ होत असे तो त्यापरता॥ जैशी वस्ती गृहाची चिंता॥ पांथस्था नाहीं॥ ६३॥ अथवा घोडें जें भाड्याचें॥ भाडेकऱ्याच ओझें त्याचें॥ बसणाराशी त्याचि तेचें॥ नाहींच कांज॥ ६४॥ मनुष्यमात्रीं स्थिती ऐशी॥ परी नेणवे अज्ञानाशी॥ ज्ञानी जाणें भेदो भयाशी॥ याच कारणें॥ ६५॥ असो दोषदृष्टी करून॥ विषयत्यागिले संपूर्ण॥ पावला अपरोक्ष पूर्ण॥ स्वयंप्रकाश॥ ६६॥ तो विषयीं व्हाया अदीन॥ दृढापरोक्षाचें साधन॥ करील साधक होऊन॥ कैसें तें ऐका॥ ६७॥ जें जें दिसताती जडार्थ॥ आपली या देहासहित॥
तेथें तेथें वृत्ति घालीत॥ आस्तित्वीं आधीं॥ ६८॥ विषयमात्रामाजी ऐशी॥ वृत्ति जाय तों आस्तित्वाशी॥
भिंडे जैसा शूर दुर्गाशी॥ भेदून जाय॥ ६९॥ तेवीचं चकीं वृत्ति जातां॥ आधीं स्मरे अस्ति भातिता॥ अस्ति भाति आणि प्रियता॥ सहजावस्थे॥ ७०॥ ऐसेचि दशधा व्यापार॥ पांचांही तत्वांचे सुंदर॥ कीं वाईट परी तें सार॥ स्मरत आधीं॥ ७१॥ वृत्ति जाय जायतो जैशी॥ नगीं धरीत सुवर्णाशी॥ नामरूपा माझारीं तैशी॥ सच्चिदानंदा॥ ७२॥ शस्त्र खोंची दिसे शरीरीं॥ परी भिडे जैसें जिव्हारीं॥ नामरूप त्यागें त्यापरी॥ वृत्त्यधिष्ठाना॥ ७३॥ ऐसा अभ्यास वृत्तिचे नीं॥ साधकपणें रात्रंदिनीं॥ सिद्ध करवील होऊनी॥
आपण साक्षी॥ ७४॥ अभ्यास जो का अन्वयाचा॥ तो ह्या चि पूर्ण होय साचा॥ निवेदिला सें येथें वाचा॥ दिव्यदर्शना॥ ७५॥ परी अस्ति भाति प्रियता॥ स्वदेहीं आधीं ओळखितां॥ बाह्य लक्षणाची हाता॥ हातवटी

ये ॥ ७६ ॥ जैशी हेमगौरी घरिंची ॥ कळतां जाणूं ये पराची ॥ कीं पर लेखाक्षरा वाची ॥ आणि त्या स्वयें ॥ ७७ ॥ त्य
णोनियां देह गेहींचा ॥ आधीं देव जाणावा साचा ॥ मग श्रम न नसे पराचा ॥ जाण तां काहीं ॥ ७८ ॥ तेंच स्वकी
य ओळखण ॥ केशी तीनि ऐकालक्षण ॥ जेणें व्यतिरेकाची खुण ॥ सहजी कळे ॥ ७९ ॥ इंद्रियांसह स्थूळ
देहे ॥ जागरीं मीच वोळ्यां हें ॥ विषय हाच जाण तोहे ॥ प्रिय ही हाचि ॥ ८० ॥ भासे देह मी वाटे स्वप्नीं ॥ तैसें
च आहे प्रियत्वानी ॥ तेणें अप्रियास लाज्ञानी ॥ स्थूळ हा होय ॥ ८१ ॥ स्वप्नमाव कोनि यांजातां ॥ सुसी शीत्रि
यास्ति भाति ता ॥ नास्ति न भाति अप्रियता ॥ भासाची ऐसी ॥ ८२ ॥ सुषुप्ति म्हणजे जाणा ऐसें ॥ निःसंकल्प वृ-
त्ति जे असे ॥ आहे जाणें प्रिय होतसे ॥ तेंच मी स्वयें ॥ ८३ ॥ आत्मोन्मुख उठून वृत्ति ॥ पावे तदाकारें समा-
धि ॥ तिशी जाणता तो चिन्मूर्ति ॥ प्रियत्वें आहे ॥ ८४ ॥ तुर्या मी अस्तित्वादि होतां ॥ सहजी सुषुप्ती शी भिन्न
ता ॥ तुर्ये नास्तित्वादि रूपता ॥ आत्मप्रतीति ॥ ८५ ॥ वृत्ती पूर्न देहापर्यंत ॥ मी आत्मा सकळोदयास्त ॥ जा
णत स्वयें तद्रहित ॥ प्रियास्ति भाति ॥ ८६ ॥ स्वकीयाभाव वृत्ति जाणें ॥ युक्तिविरुद्ध हें बोलणें ॥ स्वमृत्

कायहो सागणें ॥ मृत जो तया ॥ ८७ ॥ क्षणें आहें नाहींच क्षणें ॥ तें मिथ्या निःसंदेहपणें ॥ मी सदां परिपूर्णत्वानें ॥ स
च्चिदानंद ॥ ८८ ॥ या कारणें प्रियास्ति भाति ॥ जो अविनाश स्वयंज्योति ॥ आनंदघनात्मा निश्चिती ॥ तो मीच
स्वयें ॥ ८९ ॥ तो आत्मा मीचसें बोलणें ॥ वृत्तिचियेचि संबंधानें ॥ आत्मत्वीं नाहींच बोलणें ॥ नांतें क्रियाही ॥ ९० ॥
निजरूपाज्ञानें जी वृत्ती ॥ स्वयत्वा विसरली होती ॥ तेच मी ब्रह्मात्मा निगुती ॥ स्मरून म्हणे ॥ ९१ ॥ म्हणजे नस्वा
मी म्हणून ॥ पावली होती जें बंधन ॥ ते मी आतां मुक्त म्हणून ॥ उद्गार करी ॥ ९२ ॥ आत्मा बध चि नाहीं झाला ॥
अबंधनें मुक्ति कोणाला ॥ बद्ध कल्पना झाली ज्याला ॥ तो मानी मुक्त ॥ ९३ ॥ यांत काय हो माझी हानि ॥ ध्या वो मा
तें सुखें करोनि ॥ हेही विचाराची करणी ॥ वृत्तीच करें ॥ ९४ ॥ तो निर्विचार कैसा करी ॥ वृत्ती पुनःपुनः चतुरीं ॥
परिसावा येथें वैखरीं ॥ कळाया बोलूं ॥ ९५ ॥ स्थूळास्तित्वादि सत्य होतें ॥ तरी भासाशी कैसें जातें ॥ भासासा
चें तें केवी येतें ॥ सुषुप्ती लागी ॥ ९६ ॥ सुषुप्तीचें ही मावळूनी ॥ येत तुर्ये वृत्ती लागूनी ॥ तिचें ही जातां हरपूनी ॥
आत्याचें आत्म्या ॥ ९७ ॥ ज्याची प्रियता अस्ति भाती ॥ ज्यानीं ज्यानीं आणिली होती ॥ उसनी ते गेली मागुती ॥ जे

थीलतेथें ॥ ९८ ॥ तें सिद्धरूप निर्विकार ॥ तेथें वृत्तीहि अहोरात्र ॥ होऊनियां साधक थोर ॥ अभ्यास करी ॥ ९९ ॥ विपरी
त भावनानाश ॥ जेणें होय तो निदिध्यास ॥ त्याशीच बोलिजे अभ्यास ॥ निश्चयात्मक ॥ १०० ॥ ऐसा सच्चिदानंद पणें
॥ पूर्ण साक्षात्कार पावणें ॥ जेणें स्वदेहीं त्याच बाणें ॥ अभ्यास बाह्य ॥ १ ॥ म्हणोन व्यतिरेकावीन ॥ केवळ पेंना अन्वयपू
र्ण ॥ यास्तव येथें तल्लक्षण ॥ बोलिलें असे ॥ २ ॥ केवळ स्वरूपाकार होणें ॥ सिद्ध होतां साधकपणें ॥ त्या वासना
क्षयलक्षणें ॥ सरूप ऐसा ॥ ३ ॥ सहजें तें स्वरूपाकार ॥ तो वासनाक्षय निर्द्धार ॥ अरूप आणि जे साचार ॥ स्वामी
परीक्षा ॥ ४ ॥ दग्धकर्म शेष त्रिविध ॥ तो आणावा संदेह सिद्ध ॥ विदेह सिद्ध नुरे दग्ध ॥ इच्छाने च्छा जें ॥ ५ ॥ सा
धून औषध्यादि सिद्धि ॥ लद्धलें सिद्ध जगामधि ॥ जे धूर्तक रितीप्रसिद्धि ॥ कोरडी आह्मी ॥ ६ ॥ ते भवीं बुडून
आपण ॥ येरां ही क रिती पतन ॥ महाजळीं जैसा पाषाण ॥ स्वाश्रितासह ॥ ७ ॥ असस सिद्ध जे ऐसे ठक ॥ त्यांशी
भिवो न बद्ध मूर्ख ॥ परी मुमुक्षु मानी रंक ॥ शाप्य तुल्य त्यां ॥ ८ ॥ कोणी ठक लटकी शांति ॥ व्यथा परी व रीदा विती ॥
ते णें सिद्ध म्हणून घेती ॥ सामर्थ्येंवीन ॥ ९ ॥ त्यांशीही मुमुक्षु जाणून ॥ पूर्ण मैं दंसें ओळखून ॥ सांडी तसें आप

रीतृण ॥ अनुपयोगी ॥ ११० ॥ वैराग्यादिक तपोबळें ॥ ज्यांचें सामर्थ्य जगीं चालें ॥ त्यांही नसतां ज्ञान डोळे ॥ मुमु-
क्षु सोडी ॥ ११ ॥ तेथें येरांची कोण कथा ॥ समूळ सांडी वोलक्षता ॥ जे शीनये विरुद्धा चिंता ॥ श्रीविरक्ताच्या ॥ १२ ॥
सिद्ध तोचि जो वस्तु झाला ॥ त्या स्वबोधें ब्रह्म स्थेला ॥ सिद्धि नसतां बाह्य त्याला ॥ उणीव नाहीं ॥ १३ ॥ वस्तु सिद्धाचे
चमत्कार ॥ होती त्याचा कैसा प्रकार ॥ ऐशी शंका होतां उत्तर ॥ अवधारावें ॥ १४ ॥ कृष्णरात्रीं व्यासायं काळीं ॥ को-
णी पुरुषें आमंत्रिली ॥ प्रसादिलीलो काक कूं ये ज्ञानोत्तरीं जी ॥ १६ ॥ ज्ञानी ठाव ना ज्ञान तमा ॥ तेथें रिघावें कैंचा
कामा ॥ काय होईल जी साउमा ॥ आधारसूर्या ॥ १७ ॥ ये विषयींचें निरूपण ॥ स्मरलें त्याचें निवेदन ॥ करितों जेणें
उद्धारन ॥ हो या प्रश्नाचें ॥ १८ ॥ स्वयें आत्मा हा यजमान ॥ चिदग्नि स्वधर्म संपन्न ॥ श्रद्धा वृत्ति तुर्या सज्ञान ॥ ध
र्मपत्नि ते ॥ १९ ॥ उभयीं यत्न आरंभिला ॥ सिद्ध करून सामग्रीला ॥ इध्म बर्हि देह लोमाला ॥ आणि जे तेथें ॥ २० ॥
उरो वेदी मान्नी प्रखर ॥ स्वबोध तपवैश्वानर ॥ धडकला जेणें संहार ॥ नामरूपाचा ॥ २१ ॥ शमदम युक्त ब्राह्म
ण ॥ ऋत्विजें तेथें चौघेजण ॥ सांग वाचा जे परिपूर्ण ॥ तो होता तेथें ॥ २२ ॥ अध्वर्यु चक्षु अनुकूल ॥ प्राणो द्गाता

तें चीसबळ ॥ मन ब्रह्मा तोही केवळ ॥ तेसाचि सांग ॥ २३ ॥ ब्रह्मा ऋत्विजो शमाचा ॥ त्र्यंय तरें पंच दशांचा ॥ मिळा जाणा
वा ऋत्विजांचा ॥ दमसंपन्न ॥ २४ ॥ हृदय युपीं मन्युक्रोध ॥ अज्ञानवृत्ती चेंनी बद्ध ॥ झाला तो पशु आज्यसद्य ॥ काम
मात्र हा ॥ २५ ॥ ब्रह्म विद्या महाश्रवण ॥ तें आरंभीं दीक्षाग्रहण ॥ मननें शी निदिध्यासन ॥ हवनक्रिया ॥ २६ ॥ स्थू
ळ देह समिधा होम ॥ झाल्या होमिला आज्य काम ॥ मन्यु पशु क्रोध ज्या नाम ॥ तोही तेसाचि ॥ २७ ॥ चिद चिद्ग्रं
थीचा जो भेद ॥ सोमपान त्या नाव शुद्ध ॥ जें अजरामरत्व सिद्ध ॥ तो साक्षात्कार ॥ २८ ॥ स्वसाक्षात्कारें चि करो
नि ॥ जीव द्वैता निःशेष हानि ॥ पूर्णाहुति ते पूर्णपणीं ॥ होऊन गेली ॥ २९ ॥ शुक्लकृष्ण गती उल्लंघन ॥ त्या नाव अव
भृथस्नान ॥ याग अग्निहोत्र संपूर्ण ॥ कर्म तें ऐसें ॥ १३० ॥ त्रिकाळ ऐसेंचि हवन ॥ दर्शपूर्णमास पालन ॥ चालु
मीस्य ही आचरण ॥ विध्युक्त कीजे ॥ ३१ ॥ जो वरी आहे धर्मपत्नि ॥ तंव हा क्रम रात्रंदिनीं ॥ चालवावा लागें हो
ऊनि ॥ निरालस तें ॥ ३२ ॥ सचेतन मुक्त जे होती ॥ ते हा यज्ञ सदा करिती ॥ ब्राह्मण ऐशी त्यांच ख्याति ॥ सद्गृह-
स्थ ही ॥ ३३ ॥ या यज्ञाचा ऐसा महिमा ॥ भार्या पावे पूर्णी परमा ॥ लक्ष्मन होतां चि सीमा ॥ यज्ञाची झाली ॥ ३४ ॥

यज्ञकर्म समाप्त झालें ॥ सविधी शिखशी त्यागिलें ॥ अचेतन मुक्त बोलिलें ॥ आहे त्या हंस ॥ ३५ ॥ सचेतन स
देह मुक्त ॥ अचेतन विदेह मुक्त ॥ दोहीं परी हे जीवन्मुक्त ॥ निःसंदेह तें ॥ ३६ ॥ सचेतन जीवन्मुक्ताची ॥ वृत्ती
उठतां दिसो साची ॥ परी दशा भर्जित तीची ॥ बीजा त्या न्यायें ॥ ३७ ॥ मूळ वृत्ति हो वां भर्जित ॥ तद्वत सर्व तदुद
रस्थ ॥ जे शी गर्भिणी झाल्या मृत ॥ गर्भ तो ऐसा ॥ ३८ ॥ असूट व्याख्यानें रसाळ ॥ समाधिस्थ झाले सकळ ॥
श्रोते वक्ते बराचि काळ ॥ केवळ सुखें ॥ ३९ ॥ त्वरें चि वक्ता सावधान ॥ बोले होऊनियां वचन ॥ ज्ञानयज्ञ तें या
लागून ॥ अभिधान जी ॥ १४० ॥ ऐशिया यज्ञाचें करणें ॥ शिव होऊन तें शिवा अर्चिणें ॥ संकल्प बीज दग्ध होणें ॥
येणें समूळ ॥ ४१ ॥ आतां ब्रह्मा द्यैश्वर्य सिद्धि ॥ कोठें कोणा होय उपाधि ॥ आपला आपण अवधि ॥ शेष
स्वयेंचि ॥ ४२ ॥ तेथें अज्ञान नाहीं काम ॥ तरी कैंचा सिद्धीचा भ्रम ॥ स्वयें ब्रह्मात्मा पूर्णकाम ॥ केवळपणें ॥ ४३ ॥
ऐसा सिद्ध जो झाला सृष्टी ॥ त्या सिद्धि नये बोल दृष्टी ॥ परी उभ्या ह्मणतो पागीं ॥ बाधतो काय ॥ ४४ ॥ बहिर्मुखा
चें मत ऐसें ॥ याचें उत्तर ऐसें असे ॥ स्वप्रकाश मुळींच नसे ॥ पाठ की पोट ॥ ४५ ॥ तथापि चमत्कार होती ॥ देह

अमृ० ८

प्रारब्धाचिच गती॥ आणि ते प्रत्यया ही येती॥ भावार्थी दिवें॥४६॥ ज्ञानापूर्वी कर्म जें झालें॥ प्रारब्धरूपें भोगा आलें॥ सर्ग
संचितामधून भासलें॥ शरीर योगें॥४७॥ अथवा संचिता वांचून॥ स्वसंकल्पें भगवान॥ अवतार त्याही कारण॥ १३ धे
बीज जे वढें॥४८॥ ते येथेंचि शरीर योगें॥ तत्कर्म जे नादि सूत्र लागे॥ ऐसा नियम विचार उगें॥ बोलणें नव्हे॥४९॥
त्या कर्मी तितुकें होणार॥ तितुकेंचि होत निर्द्धार॥ मग अवतार कीं येर॥ तो असो कोणी॥५०॥ पदरजें स्त्रीशि
ळीशिळा॥ द्विज मृत पुत्र आणिला॥ परी तें एकेक चिवेळा॥ मागुतें नव्हे॥५१॥ स्वमातेच्या गत गर्भीशी॥ गुरू
च्या ही मृत पुत्रांसी॥ आणिलें नजीववे त्याशी॥ अभिमन्यूतें॥५२॥ ऐसा पाहूं जाता विचार॥ जे झाले होतीच
मत्कार॥ ते केवळ कर्मानुसार॥ होणारा परी॥५३॥ ज्ञान ह्मणजे तें निष्कर्मी॥ तेथें कासयाचें हो कर्मी॥ उगें बो
लिलें नेणे वर्म॥ मूर्ख ह्मणोनि॥५४॥ असो आत्या देह संबंध॥ नसतां कैचें त्या प्रारब्ध॥ तो पाप पुण्यातीत शु
द्ध॥ केवळपणें॥५५॥ ज्ञानापूर्वीच्या क्रियमाणा॥ ज्ञाता हा कदापि स्पर्शेना॥ तो लिंपेल ऐसें घडेना॥ तदुत्तरीं
च्या॥५६॥ ज्ञानोत्तरींचि या पुण्याशी॥ भक्त विभागी निश्चयेंशी॥ अभक्त ते तुकें पापाशी॥ तो शुद्ध पूर्ण॥५७॥ श्रीराम ८

त्याचा भेद त्वितो सरला॥ भयाचा धोकाच हरला॥ अवधीशी दिलें विधीला॥ तिळतर्पण॥५८॥ अहो काय
म्यां पुण्य केलें॥ अरेरे हें पाप घडलें॥ चित्तीं येऊंच विसरलें॥ जया ज्या ऐसें॥५९॥ निमाली चिंताच सकळा॥
मृत्यु पावली हळहळ॥ निर्संतान झालें समूळ॥ तळमळीचें॥६०॥ सांग वैराग्य अंतरंग॥ व्यंग जाणावें
बहिरंग॥ पूर्ण बोधीं वैराग्य सांग॥ अपूर्णी येर॥६१॥ स्वप्रकाश परोक्षज्ञानें॥ अंतवैराग्य मोक्ष होणें॥
मात्र बाह्य वैराग्याविनें॥ तुष्टे ना लोक॥६२॥ बाह्य वैराग्यें लोकीं ख्याती॥ पुण्यलोकाची ही हो प्राप्ति॥ परी मो
क्षें शीजीवन्मुक्ति॥ ना पूर्णज्ञानें॥६३॥ असो पूर्ण बोध जें झाला॥ संकल्प बीजापें सुटला॥ यथार्थ तप
स्वी बोलिला॥ तोचि जी एक॥६४॥ हें अशुक्लाकृष्ण तें तप॥ येथें कथियेलें सरूप॥ विस्तारामाजीच सं
क्षेप॥ करून कांहीं॥६५॥ ऐकून ऐसें पूर्ण बोल॥ संतां आले सुखाचे डोल॥ तेणें मग मृदु मंजूळ॥ बोलते
झाले॥६६॥ धन्य धन्य गा तुझी वाणी॥ सत्यप्रिय हितकारिणी॥ अप्रतिबंध निरूपणीं॥ स्पष्टत्वें चाले॥६७॥
य भीड कोणाची न धरिशी॥ प्रश्नोत्तरें थार्थ देशी॥ यथासांग प्रतिपादिशी॥ आला विषय॥६८॥ तस्माद्दु

रुभक्तलूं पूर्ण॥ मानलाशि आह्मा लागून॥ तरीच झालें आगमन॥ आमचें येथें॥ ६९॥ तुझ्या निरूपणाची ख्याति॥ मन विसरे मनाप्रति॥ ते काय एकेक प्रतीति॥ सांगावी तूज॥ ७०॥ असो आतां पुढील कथा॥ कैशी तिये ची सांगें वार्त्ता॥ ह्यासर्गी पावलों तृप्तता॥ परम आह्मी॥ १७१॥ इ॰ अ॰ अशुक्ल अकृष्णालपरूपव्या॰ त्रयोदश सर्गः समाप्तः॥ ७॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥ ॥ छ॥

श्रीहंसगुरवे नमः॥ उत्तम सुवासित अन्न॥ यथेच्छ केलिया भक्षण॥ मग पत्रांकुशीं करदन्न॥ अनुचित चि॥ १॥ तैसें कथन या सर्गीचें॥ निरूपिणें अयोग्य वाचे॥ परंतु क्रमानें प्रश्नांचे॥ बोलणें आलें॥ २॥ ह्मणोनि निर्विदिशी संतां॥ आसुर कृष्ण कर्मकथा॥ तरी अवधाराजी आतां॥ सावधपणें॥ ३॥ अत्युग्र रागद्वेषयुक्त॥ हिंसादंभादिक मिश्रित॥ अहंकारें कर्म घडत॥ त्या नाम आसुर॥ ४॥ अथवा धरून मत्सर॥ मनीं दंभ कीं तिरस्कार॥ हिंसोद्देशें चि अभिचार॥ प्रवर्तें कर्मी॥ ५॥ हें असुरकर्म जाणावें॥ तामस ही याच ह्मणावें॥ अधोगतीस लागे जावें॥ तें जीवा येणें॥ ६॥ प्रीति धरून परस्त्रीची॥ अथवा द्रव्यादि वस्तूंची॥ उपासीत परोपरींची॥ साधनें क्रूर॥ ७॥ नाना परींचे जपमंत्र॥ कठीण बीजांचे भ्यासुर॥ जे चुकलिया लेशमात्र॥ वेड चि लागे॥ ८॥ तैसे मंत्र जरी दारुण॥ परी ते जपे सावधान॥ स्मशान भूमीशी होऊन॥ नग्न शरीर॥ ९॥ कृष्णपक्षीं मध्यान्ह रात्रीं॥ बाळंतिणी लागीं उकरी॥ जपे मंत्र बैसून उरीं॥ तयेच्या धीर॥ १०॥ मंदवारीं मांजरी काळी॥ आंवळून देतसे बळी॥ चोरी पतिव्रतेची चोळी॥ साधाया तिशी॥ ११॥ उलूकादि पक्षी साधून॥ नेत्रीं करीतसे अंजन॥ चोरी

आऊनि गुप्त धन॥ प्राणिमात्रांचें॥१२॥ छाया रहिल मांडुळाशी॥ साधी अदृश्य व्हायाशी॥ तिळभरी न भी यापाशी॥ स्त्री धनरागें॥१३॥ राग असतां या साधना॥ साधीत ना तरी मारणा॥ प्रवर्ते द्वेष येतां मना॥ महा निष्ठुर॥१४॥ भौमीं चिता भस्म अणून॥ कीं कृष्णसर्पाचा दशन॥ मारावया शत्रु लागून॥ सा धनें साधी॥१५॥ नवचंडी बलीचें शृंग॥ माजी भरोन अयेपांग॥ पुरी वारुळीं व्हायाव्यंग॥ देहत याचा॥१६॥ रक्त मूत्र कीं सुरारसें॥ स्नानोत्तर आसनीं बैसे॥ दक्षिणमुखें जपतसे॥ विलोप मंत्र॥१७॥ नृदेलाची करून माळ॥ नाना मंत्र जपे चांडाळ॥ नरमुंडें होम बरळ॥ अग्नींत करी॥१८॥ कांहीं मंत्रें कितेक यंत्रें॥ अथवा कितीयेक तंत्रें॥ साधनें करी अपवित्रें॥ श्येनयागादि॥१९॥ हें तामस तप असुर॥ तीव्र सांगीतलें निर्धार॥ आतां अवधारा प्रकार॥ मध्यम कांहीं॥२०॥ कृष्णाष्टमी चतुर्दशीशी॥ आमावास्या भौमभृगूशी॥ निशीथ अथवा प्रदोषीं॥ आरंभी कर्मी॥२१॥ व्यतिपातादि योगीं नाना॥ मातंग्यादि कनऊ कन्या॥ यांच्या प्रवर्तत पूजना॥ प्राशून मद्य॥२२॥ मद्य आणून विक्रयाचें॥ मीन मांस त्याच परीचें॥

साहित्य मेळवून वांचे॥ बोलल मंत्र॥२३॥ आणि त्या ज्या हीन कामिनी॥ बैसून त्यांचे योन्यासनीं॥ प्रवर्ते जारण मारणीं॥ सिद्ध्यादि जपा॥२४॥ ऐसा एकांतींनीच सिद्धि॥ साधून मग जगामधीं॥ पूजा आरंभी दंभबुद्धी॥ गुप्त प्रकट॥२५॥ छक्के आल्याच कोणी जन॥ येऊं देन करी बंधन॥ पयपुष्पें दावी करून॥ मद्य मांसाची॥२६॥ हीनवेंद्य जवळी नारी॥ वाघिणी दिसती शाकरी॥ कचित् पुरुष परोपरी॥ जंबुक वृक॥२७॥ आपलाही देह अनान॥ क्षणें भुजंग पंचानन॥ देवताचें डी गजानन॥ हरिहरार्क॥२८॥ हें अद्भुत दिसतां जाणा॥ चळकांप सुटे दुर्जना॥ पावती प्रसाद प्रार्थना॥ मिळून केल्या॥२९॥ ऐसे ठकबैं मोहताती॥ तें भोळ्यांची कोण गणती॥ आपश्याच शरण येती॥ भेणें कीं भक्ती॥३०॥ संत ह्मणती गा हे कथा॥ वीट आला ऐकून चित्ता॥ तरी पुरे किंचित् वार्ता॥ पुसूं ती बोले॥३१॥ कवळा विचार धूर्ती चा॥ सांगें कैसा मूढ जमाचा॥ आणि तो निरोपित्या वाचा॥ आटोपीं सगी॥३२॥ वक्ता ह्मणून बहुबरें॥ बोलता झाला उत्तरें॥ केवळ मूढ जी पामरें॥ आचार त्यांचा॥३३॥ ह्मणजे पाखंडी आस्तिक॥ ऐ

अमृ०

२

किलोतैसाचनास्तिक॥परिसावाकेवळमूर्ख॥पाखंडीनष्ट॥३४॥नेणेंस्नानसंध्यानाजप॥नेणेंचिकां
हींपुण्यपाप॥सकामाचेंनेणेंस्वरूप॥निष्कामतेंही॥३५॥नकळेनेणेधर्माधर्म॥कीर्तनेंदेवपूजादिकर्म॥
हव्यकव्यव्रतनियम॥तेणेंचपरी॥३६॥स्वर्गनेणेनरकनेणे॥किंवाकळूननाहींह्मणें॥कोणईश्वरक
धींकोणें॥पाहिलाअसे॥३७॥ईश्वरहाजरीअसता॥कैंचकामातेंनदिसता॥नाहींचनमनीसवि
ता॥उलूकजैसा॥३८॥साधुजेनरनारीहोती॥नग्नाजैसेनावलोकिती॥विधिवस्त्रहीनात्यारीती॥
वेदश्रुतीही॥३९॥स्वनिर्लज्यपणेंचिएक॥वेदश्रुतिमातेंविमुख॥ह्मणूनह्मणेपाहाधाक॥कैसायांमा
झा॥४०॥अहोहेसाचचिअसतें॥तरीकांमुखचुकाविते॥तस्मात्सत्यत्वनसेंयांतें॥पाखंडीह्मणे॥४१॥
परीहोतांवस्यापात्यंत॥लाजवीनायमाचेदूत॥राजेहरजैसेउन्मत॥अपराधिया॥४२॥तुजबांधू
नचहूंकडे॥उभारतीलयमापुढें॥तेव्हांतूंखरेंअडवेंढ॥घेशीलतेथें॥४३॥लाजतकोणानहोताशी॥
तोचतूंलैंअधोमुखेंशी॥मुकाट्यानेंउभाराहसी॥अत्यंतलाजें॥४४॥हेंतुजजाणवेनाआतां॥

सर्ग १९

श्रीराम २

परीकळेलपुढेंचित्ता॥न्यायाधीशशिक्षासोगतां॥यालोकींजैसा॥४५॥असोवेदहेबडबड॥व्य-
र्थचित्तद्वातीर्थीतोंड॥ऐसेंह्मणूनवेंघेद्वाड॥निषिद्धाचळा॥४६॥तोपर्वतदुष्टसुळका॥ज्यावरी
विश्रामभूमिका॥नाहींचभौवलागरका॥निरयाब्धीचा॥४७॥तेथेंमहामोहाचीसुरा॥बहुप्राशू
नहिंडेसैरा॥गुंडेदुणमंदेंस्त्रियपरा॥सेवणेंकाम॥४८॥माजीआह्मीसावधआहों॥जाणवायाफोडून
राहों॥हाकारीपाराचाविवाहो॥करायाद्विजां॥४९॥मगतेंमोहिजेतैसें॥त्याबोलाभाळोनमानसें॥
लोभेंउड्याघालितीजैसें॥पतंगदिपीं॥५०॥आल्पविधीदुर्गीचावाला॥खबिंद्यमद्वंद्यगत्वला॥केला
तेणेंगळाफाटला॥मत्सरगळें॥५१॥आस्तिकोंजयचिसाचार॥परीभूपतिअहंकार॥महानस्वव
र्णसंकर॥करायाप्रेरी॥५२॥हेंपाहूनआस्तिकझटें॥घेऊंलागलेमहानेटें॥तेणेंनास्तिकाअंगीफुटे॥
क्रोधानिवार॥५३॥मगजीहोतपराकाष्ठा॥तीकायवाखाणावीओंठा॥सेवायालागलेउच्छिष्टा॥हीनवर्णा
च्या॥५४॥वेंदानिंद्यएकचिझाले॥शुभाशुभनाहींउरलें॥शुचिअशुचिभानगेलें॥मदिरामोहें॥५५॥

द्य

अमृ०

जैसें वेडलागल्यो देहीं ॥ ग्राह्याग्राह्य तें भिन्न नाहीं ॥ परी मेरेज लाभासें ही ॥ पीतां गरळे ॥ ५६ ॥ निषि
द्धाचार तैसा हीन ॥ मारक पाखंडी निणून ॥ कीं जाणून खरेपणीण ॥ करून घेत ॥ ५७ ॥ आपली हो बोज्ञा
ली हानि ॥ परी सज्जन त्रासो मनीं ॥ जैसा निघे अपशकुनीं ॥ स्वनासा छेदे ॥ ५८ ॥ कीं माशी आपणा
गिळवी ॥ परी यरांवो ती शिणवी ॥ त्याहि तें पाखंडी त्रासवी ॥ सज्जना तैसा ५९ ॥ यानांवजी हिंसादा
रुण ॥ पीडा पावली गो ब्राह्मण ॥ दैत्यां पासून देवगण ॥ जेशि या परी ॥ ६० ॥ देव कोण पुसतां कोणी ॥ देउ
नरजीवह्मणे अन्नि ॥ भक्ति यथेच्छ खान पानीं ॥ रमावें तेचि ॥ ६१ ॥ ऋण शीण क्षुधा शांत्यर्थ ॥ यानांवें
एक पुरुषार्थ ॥ मरण मोक्ष निश्चितार्थ ॥ पाखंडी मानी ॥ ६२ ॥ पूर्वजन्म कीं पुनर्जन्म ॥ हा आस्तिकां
उगाच भ्रम ॥ कैंचा ईश्वर कैंचा यम ॥ स्वर्ग नरक ॥ ६३ ॥ येथें आस्तिकें नास्तिकाशी ॥ प्रश्न केला जें तूं
निजशी ॥ ते धवां जो का जागा होशी ॥ तो केवी सांगें ॥ ६४ ॥ पुरुष तरी नाहीं कोणी ॥ येथें चेवडे तुं तें ज्ञ
णीं ॥ सहज आलों जागरणीं ॥ तरी तें काय ॥ ६५ ॥ नास्तिक ह्मणे हा स्वभाव ॥ सहज ऐसें त्याचें नांव ॥

सर्ग १४

२

श्रीराम २

तेणें चि जागृतीचा भाव ॥ प्रत्यया येत ॥ ६६ ॥ जागृती लागीं जो का आणी ॥ गाढ निद्रिस्तला लागोनि ॥
तो जन्म वील शंका मनीं ॥ धरूंच नको ॥ ६७ ॥ येथें नास्तिक गांगरला ॥ आस्तिक ह्मणे जन्म तुला ॥ अ
ज्ञान तों वरी चुकला ॥ घेउं नाकदा ॥ ६८ ॥ असा मोह मद्याचे भुली ॥ स्वैर गती निषिद्धाचकीं ॥ चालत
अस्तां झोंक खाली ॥ एका कीं गेला ॥ ६९ ॥ तेणें त्यापें गडबडला ॥ तो नीट निरयीं पडला ॥ तिळमात्र ना-
हींच गेला ॥ वांकडा कोठें ॥ ७० ॥ नास्तिकों [illegible] कभेद दोन ॥ परी दोघां ही संसरण ॥ चुकेना कांहीं केल्या

स्ति

पूर्ण ॥ ज्ञाना वांचोनि ॥ ७१ ॥ तें पवित्र ज्ञान उत्तम ॥ सर्गी त्तरीं तदानुक्रम ॥ निरोपीन जेणें आराम ॥
अत्यंत होय ॥ ७२ ॥ केशी आसुर तपगति ॥ निवेदिली तुह्मा पुढती ॥ या परी बोलून समाप्ति ॥ सर्गाची
केली ॥ ७३ ॥ इ० अ० कृष्णकर्माख्य आसुरकर्मण्या० चतुर्दशःसर्गःसमाप्त.॥ ७ ॥ ॥ छ ॥ ॥

श्रीहंसगुरवेनमः॥ श्रोतेह्मणतीगाआर्यकें॥ विरलों पूर्वकथानकें॥ होतों परीतुंवारूपकें॥ आनंदवीलें॥१॥ अरि
षड्वर्गाचेंलक्षण॥ तेणें सांग जाहलें पूर्ण॥ आणिकळलेंकैसेंमन॥ मूर्खाचें तेंही॥२॥ आतां शुद्धज्ञानाचीस्थि
ति॥ निरूपावीयथानिगुती॥ जेंऐकायाआमच्याचित्तीं॥ परमहर्ष॥३॥ यापरीभावश्रोतयांचा॥ पाहू
नवक्ताबोलेवाचा॥ मनोगतजैसासंतांचा॥ करितों तैसें॥४॥ अवधाराजीसावधान॥ एकादशेंद्रियेंक
रून॥ आधींकरावेंउपासन॥ श्रीसद्गुरूचें॥५॥ श्रीगुरुचियेपूर्णभक्ती॥ सांगहोयश्रवणप्राप्ति॥ मन
ननिदिध्यासहातीं॥ येतीतैसेंची॥६॥ त्यायोगेंदृग्दृश्यप्रकार॥ निरसूनियांसर्वांतर॥ जेंवसेकांहींनि
र्विकार॥ चैतन्यरूप॥७॥ त्यावांचोनकोंहींचनाहीं॥ घटपटव्यर्थसर्वहीं॥ ऐसासाक्षात्कारहोंदेहीं॥
त्यानांवज्ञान॥८॥ हेंजेंसूत्रभूतबोलिलें॥ तेंचिसविस्तरऐकिलें॥ पाहिजेजेणेंसंतोषलें॥ आपजीचि
त्त॥९॥ श्रोत्रादिपांचज्ञानेंद्रियें॥ तेंवीवागादिकर्मेंद्रियें॥ मनासहलावावेंकायें॥ श्रीगुरुभक्तीं॥१०॥
ह्मणजेकायावाचामनें॥ चित्तवित्तेंजीवेंशीप्राणें॥ सर्वकाळसेवाकरणें॥ अवंचकत्वें॥११॥ अवंचकत्वा

अमृ० १

सर्ग १५

चाहाभाव॥ मीमाझें श्रीगुरुशीसर्व॥ अर्पूनियांकीजे सदैव॥ सांगत्वें सेवा॥१२॥ त्यासेवेचीपद्धतीकैशी॥
येथेंनिवेदिलोंअसशी॥ जेणें अध्यात्मश्रवणाशी॥ अधिकारये॥१३॥ मुख्यश्रीगुरुकीर्तीचीन॥ मुमुक्षुशी
निंदाश्रवण॥ व्हावेंनाहोतांचिपिधान॥ कर्णाशीव्हावें॥१४॥ सावधाननिंदाऐकिली॥ तरीतेथोरहानी
झाली॥ श्रीगुरुभक्तीसरदविली॥ निश्चयेंत्याची॥१५॥ ऐकतांगुरुनिंदाघोष॥ जें येवढाउपजेदोष॥ तैंसु
येंप्रवर्तत्यानाश॥ कैसाजीनाहीं॥१६॥ म्हणोनियांसावधपणें॥ अर्पितैकादशकरणें॥ शुद्धरासून मुमु

सेवन

क्षूनें॥ चालतांहित॥१७॥ हे विस्तारें श्रवण स्थिती॥ कितीएकसर्गीनिरुती॥ कथिलीचालावेंत्यारिती॥
यथार्थपणें॥१८॥ मूर्खपणें किंवाकरून॥ जेत्यागितीहे शिकवण॥ तेपुण्यक्षेत्राशीयेऊन॥ पातकीहोती॥१९॥
नृदेहहेंचपुण्यक्षेत्र॥ अन्ययोनिसामान्यक्षेत्र॥ येरक्षेत्रपापासंहार॥ यापुण्यक्षेत्रीं॥२०॥ तैंहीजरीपा
पघडलें॥ तरीतेंवज्रलेपझालें॥ त्यापें मगप्राणीसुटलें॥ नजायत्वरें॥२१॥ किंवापुण्यक्षेत्रसत्संग॥ तैंश
रणरिघोनिमग॥ अन्यथाचालीनेंहोभंग॥ कायभवाचा॥२२॥ साचारश्रोत्रीब्रह्मनिष्ठ॥ संतएकश्रीगुरु

श्रीराम १

श्रेष्ठ॥ श्रुत्यनुभवेंयेथें स्पष्ट॥ केला विचार॥२३॥ हें जेंका बोलिलें बद्धाशी॥ कदांहीरुचेनामानसीं॥ जयापरीवीय
काकाशी॥ अमृतफळीं॥२४॥ अथवापूर्णिमेचाचंद्र॥ पाहूनियांविटेतस्कर॥ नातरीं अंगींनकज्वर॥ तोदुधा
जैसा॥२५॥ म्हणोनिउक्तजेंवचन॥ मुमुक्षूचमानीप्रमाण॥ सिंधुजैसाउर्चबळून॥ चंद्रोदयींये॥२६॥ श्री
गुरुभक्तजोकाऐसा॥ विचारएकात्याचाकैसा॥ होतअसेनिजमानसा॥ दीर्घदृष्टीनें॥२७॥ अहोमीझा
लों श्रीअर्पण॥ कायावाचामनेंकरून॥ वित्तेंप्राणेंजीवेंशीपूर्ण॥ स्वसत्तात्यागें॥२८॥ त्याशीमागुतेंमी
कींमाझें॥ म्हणनेंहेंमलानसाजे॥ गोदानमाघारेंघेइजे॥ परमपाप॥२९॥ सालंकारधेनुब्राह्मणा॥ दि
ल्याप्रवर्तेतीतोपालना॥ कींनपरीनाणींच मना॥ विकल्पदाता॥३०॥ तेसेंचम्यांहीआचरावें॥ श्रीगुरुका
जींचझिजावें॥ मनोगतापरीचालावें॥ श्रीगुरुचिया॥३१॥ यामाजीनाहत्याअन्यथा॥ तैंदानघेतलेंमा
घुता॥ नेणूननृगाशिरींहोता॥ कैवढात्रास॥३२॥ माजाणूनम्यांकेल्यातेसें॥ बुडेनच अन्यथानसे॥ तरी
श्रीगुरुमातेंऐसें॥ नव्हायारक्षो॥३३॥ अहो सर्वब्रह्मोऽहसत्ता॥ जो संतश्रीसद्गुरुदाता॥ स्वामीप्रवर्तलोंअ

संता ॥ याचा उदार ॥ ३४ ॥ जागृर्दैश्वर्य दानि याशी ॥ सारुंकार स्वप्न स्त्री जैशी ॥ सा समरीजे अवस्था तैशी ॥ नव्हे काय
हे ॥ ३५ ॥ मिथ्या घेऊन सत्य देणें ॥ दृष्टश्रुत नेत्रें नाकानें ॥ श्रीगुरुशी कायतें होणें ॥ घेउन लाभ ॥ ३६ ॥ तथापि तें
मशी सुटवें ॥ तेंच म्यां सप्तद पावावें ॥ घेतियेलें श्रीगुरुदेवें ॥ जाणून ऐसें ॥ ३७ ॥ लब्धो भजें मज सुटेना ॥ तैं
धिक् माझी विचारणा ॥ राज्य येतांही देववेना ॥ कवडी जैशी ॥ ३८ ॥ आधीं कपर्दिका तें हीन ॥ परी दिधली सं-
कल्पून ॥ ते माघारी घेतां वंचन ॥ याहून कोण ॥ ३९ ॥ म्हणोन ऐसा मूर्खपणा ॥ मज लागून घडावाना ॥ दि
ल्या वीन कांहीं लाभेना ॥ निश्चय चिह्ना ॥ ४० ॥ अवघा सुटे असत्संग ॥ संतप्राप्ति तैंच अभंग ॥ मग साच
अथवा सोंग ॥ ते साचि लाभ ॥ ४१ ॥ बुद्धिपूर्वक जे नार्पिती ॥ ते तैशाच सुख पावती ॥ सुखी चीप्रत्यक्ष प्रती
ति ॥ आहे च सर्वां ॥ ४२ ॥ जैसें चोरी स गेलें धन ॥ कीं सांडलें हातें नेणून ॥ तें निरूपायें ब्रह्मार्पण ॥ म्हणावें
उगें ॥ ४३ ॥ तैसें अर्पणा प्रवर्तती ॥ ते विक्षेपाशीच पावती ॥ या हेतू जाणून अर्पिती ॥ धन्य धन्य ते ॥ ४४ ॥
अर्पित्या सहित निश्चय ॥ अशेषार्पण ज्ञानें होय ॥ यांत नाहीं नाहीं संशय ॥ तिळमात्रही ॥ ४५ ॥ येथें यद्धो भा

विष्टमन ॥ सद्गुरु सेवा त्या कठीण ॥ तो प्रवर्तों करूं सेवन ॥ थिरांचें सुखें ॥ ४६ ॥ सद्गुरु साक्षात्परब्रह्म ॥ बंधमो
क्षातीत अनाम ॥ अरूप चि सरूप नाम ॥ शिष्यार्थ दिसे ॥ ४७ ॥ परी सद्गुरु निर्विकार ॥ दिसतांही जया आका-
र ॥ जळा भिन्न जळाचीगार ॥ जैशिया परी ॥ ४८ ॥ निराकारें ब्रह्म म्हणिजे ॥ साकारें सद्गुरु बोलिजे ॥ इतुकेंच प-
री जाणिजे ॥ न भेद तेथें ॥ ४९ ॥ त्या गुरु ब्रह्मा ध्यीपासून ॥ मुक्त मुमुक्षु बद्ध जन ॥ बद्ध म्हणजे परिपूर्ण ॥ महा
विषयी ॥ ५० ॥ मुक्त ते मोत्याऐसे देव ॥ मुमुक्षु लवणाचा भाव ॥ बद्ध विषयी जाणा सर्व ॥ कवड्या तैसे ॥ ५१ ॥ पा
ण्यांचे नीच मोत्यां मोल ॥ परी स्वयें होवेना जळ ॥ कीं राहतांही बहुकाळ ॥ जळाचे संगीं ॥ ५२ ॥ तया मूळरूपा
यावया ॥ इच्छा उद्भवे जेव्हां धिया ॥ हंसरूपें सद्गुरुराया ॥ तैं पडे येणें ॥ ५३ ॥ हंसमुख स्पर्शें तत्काळ ॥ मुक्ता प्रास
आपुलें मुळ ॥ रूप जेकां निर्मळ जळ ॥ मुक्तत्व सांगें ॥ ५४ ॥ कवडी मागीं पाणी न्यून ॥ म्हणोनि हीन पाणीपण ॥ ख
येंना संगें ही करून ॥ हंसादिकांच्या ॥ ५५ ॥ तिशी यावया मूळरूपा ॥ लवण ज्ञात्या वीन सोपा ॥ मार्ग नाहीं अन्यथा
खेपा ॥ चुकती च ना ॥ ५६ ॥ तो चि पहा बोधा मिठाचा ॥ जळस्पर्शें जळ गारेच्या ॥ पूर्वरूपा येत तसे साचा ॥ अप्रति

बंध ॥ ५७ ॥ ऐसा जो मुमुक्षु साचार ॥ त्याशीं इंद्रादि देव थोर ॥ कामा येतीना तें हें दूर ॥ काय विषयी ॥ ५८ ॥ मुक्ता हें
ता जावी देवांशी ॥ वाटतां भेटी श्रीहंसाची ॥ नाहीं तरी सुकृत नाशीं ॥ जन्मती भूमीं ॥ ५९ ॥ ह्मणोनि मुक्तपणें दे
वां ॥ जन्ममृत्यु लागे भोगावा ॥ बद्ध तरी सदा स्वभावा ॥ अंकित त्याचा ॥ ६० ॥ जे स्वर्गें जन्मती मरती ॥ सद्गुरु
वीन कष्टी होती ॥ ते मुमुक्षु श्रीसोडविती ॥ कैसें घडेल ॥ ६१ ॥ येर ऐसें त्यास ह्मणावें ॥ तसेंच नृपश्वें करावें ॥
सज्जल त्यागें जैसें जावें ॥ मृगांबु पाना ॥ ६२ ॥ नाहीं श्री सद्गुरुची प्राप्ति ॥ तृषा न हरे येरा भक्ती ॥ त्यानें रें उपा
साव्या मूर्ति ॥ सर्वेश्वराच्या ॥ ६३ ॥ कांचे आड स्वप्रभ मणि ॥ ठेवितां प्रभा ये आंगणीं ॥ त्या प्रभेशी मणि मानो
नि ॥ धांवे जो नर ॥ ६४ ॥ त्याची धांव भ्रमाचवरी ॥ नान्यथा हें तिळहि भरी ॥ परी हे यत्प्रभा निर्धारीं ॥ तो भ्रां
त कोण ॥ ६५ ॥ ऐसा विचार जो कां कोणी ॥ अंतरीं प्रवेश करोनि ॥ त्याशी करीं तत्काळ मणि ॥ लाभत असे ॥ ६६ ॥
तैसा जो भक्त प्रतिमेचा ॥ त्यास लाभ सर्वेश्वराचा ॥ सर्वेश नाम सद्गुरुचा ॥ जाणिजे ऐसें ॥ ६७ ॥ परब्रह्मा नाहीं
आकार ॥ ह्मणोनि तें बोधेना नर ॥ याहि लूतो सालु साकार ॥ मुमुक्षु हिता ॥ ६८ ॥ इंद्रादि प्रतिमोपासन ॥ दीप

प्रभेचें आभासन ॥ त्यावरी यत्नें जातां शीण ॥ न लभे मणि ॥ ६९ ॥ यास्तव बद्ध आणि मुक्त ॥ जे तत्तदभिमानें ग्रस्त ॥
त्यांच्या प्रतिमा होती व्यर्थ ॥ मुमुक्षू लागीं ॥ ७० ॥ तरी बंधमोक्षा भतीत ॥ आदिगुरु जो नित्यमुक्त ॥ हरिहर ज्या
चे निश्चित ॥ पूर्णावतार ॥ ७१ ॥ तत्प्रतिमा त्याच उपास्य ॥ हें सत्य जाणावें रहस्य ॥ येर प्रतिमा मुमुक्षूस ॥ येती ना
कामा ॥ ७२ ॥ अन्वेतनीं चेतनायेणें ॥ हें नव्हे सामान्य भक्तीनें ॥ चैतन्यालागीं प्रसादिणें ॥ हें ही तैसेंचि ॥ ७३ ॥ परी
करून मूर्तिसेवा ॥ पुढें श्रीगुरुच वरावा ॥ तें आधींच कोन आश्रावा ॥ मुमुक्षूनें तो ॥ ७४ ॥ केवढी प्रल्हादाची भक्ति ॥
शुष्क काष्ठीं प्रकटे मूर्ति ॥ परी संसृती हर्ता अंतीं ॥ श्रीगुरु नान्य ॥ ७५ ॥ असो मंदा उपाय नसे ॥ ह्मणोनि मूर्तिभज-
तसे ॥ परी तीव्र मुमुक्षु असे ॥ तो नेणें अन्य ॥ ७६ ॥ बहुत्य जैसा लोभ मनीं ॥ तैसा तो भजे तत्त्स्थानीं ॥ निःशेष ल
भाचीं ज्या हानि ॥ श्रीगुरु तें तो ॥ ७७ ॥ शुद्ध सत्त्वाचा नर असे ॥ सद्गुरुशीच भजतसे ॥ येर भजती काम जैसे ॥ अंत-
रीं त्यांच्या ॥ ७८ ॥ हंस पेक्षि मुक्ता सेवित ॥ मध्यम फळादि भक्षीत ॥ द्रोणकाक सुख विष्ठेंत ॥ तैसेंच हें ही ॥ ७९ ॥ अ
धिकारी अनधिकारी ॥ स्पष्ट जाहले याउत्तरीं ॥ आतां जत्यब हु वैखरी ॥ करणें न को ॥ ८० ॥ असो जो का मुमुक्षु

द्वी

अमृ० ६

पूर्ण॥ सेवीसद्गुरु रात्रंदिन॥ सत्संग दुर्लभ जाणून॥ मनुष्य तही॥ ८१॥ श्रीगुरुत्वा जो समागम॥ सत्संग ऐसें न याना म॥ सर्ग १५

निष्काम पाप पुण्य सम॥ मनुष्य तेंतें॥ ८२॥ यांत श्रीगुरुत्वें वर्णन॥ पंचविसाव्या सर्गी पूर्ण॥ आहे ऐका मनुष्यपण॥

दुर्लभ येथें॥ ८३॥ पाप पुण्य समता घडे॥ तैंच मनुष्य देह जोडे॥ पुण्याधिक्यें देवत्वीं पडे॥ पापान्यायीं येरें॥ ८४॥ मो

लें उन्वरत्नें मिळती॥ तैसीच पाषाणादि प्राप्ति॥ परी स्पर्श पावया हातीं॥ मोलें दुर्लभ॥ ८५॥ कीं धान्य द्वयाची मिश्र

ता॥ तींतून नित्य कांहीं घेतां॥ हें कीं तें अधिक समता॥ येणें दुर्लभ॥ ८६॥ धान्य द्वयीं शुद्ध मलीन॥ ऐसे ही भेद हो

ती दोन॥ माजी हीनाशी बहुपण॥ अल्पत्व शुद्धा॥ ८७॥ मलिनाचें साम्य कठीण॥ होणें तेथें दुर्लभपण॥ शुद्धा

चें आहे च ह्मणोन॥ बोलणें नको॥ ८८॥ हा चि न्याय मनुष्य देहीं॥ विचारितां दुर्लभ हें ही॥ ह्मणोनि मुमुक्षुत्व

कांहीं॥ नव्हे चि सोपें॥ ८९॥ सांतही जन्म ब्राह्मणाचा॥ येणें हा सामान्य पुण्याचा॥ ठेवा नव्हे जाणिजे सा॥ कैसा तो ऐका॥ ९०॥ ची

पुण्यायी चा संबंध गेला॥ पापतें चुरा चि सगळा॥ सम सालिया ये आगळा॥ ब्राह्मण जन्म॥ ९१॥ हा भेद म्यां जो निवेदिला॥

अन्यथात्व नाहीं च याला॥ ऐसा एकादा चि बोलिला॥ लक्ष चत्वारीं॥ ९२॥ पहपहा सकळ सृष्टीं॥ मनुष्यांची असं श्रीराम ६

ख्य दाटी॥ परी प्रपंचीं ओढ मोठी॥ बहुतेकांची॥ ९३॥ पूर्ण परमार्थीचा पक्ष॥ ऐसा आढळे क्वचि दक्ष॥ दळीं जैसा वेधि

ता लक्ष्य॥ एकदा शूर॥ ९४॥ प्रपंची आणि परमार्थी॥ दोघेही मनुष्य चि होती॥ तें कां विषमत्वाची प्राप्ति॥ व्हावी जी

ऐशी॥ ९५॥ ह्मणोनियां विषमत्वाला॥ भेद जो कावरी बोलिला॥ तो युक्त ह्मण मांडोलला॥ सज्जनवृंद॥ ९६॥ संतह्म

णती विचक्षणा॥ गुरुभक्ता ज्ञानसंपन्ना॥ मुद्रा पहातां भरशी ना॥ कोणाच्या मनीं॥ ९७॥ परंतु वक्तृत्वें पाहतां॥

तुज समान नाहीं वक्ता॥ असतां ही तुसी साम्यता॥ न ये गा कोणा॥ ९८॥ उपनिषद्या ख्यानीं थोर॥ सावध जैसा

भाष्यकार॥ तैसा तूं या परी अंतर॥ आमुचें ह्मणे॥ ९९॥ पूर्व कवींच्या काव्या बळ॥ तुझ्या वक्तृत्वें येतुं बळ॥ ऐकूं आ

लें भूमंडळ॥ वेत्तियां आत्मा॥ १००॥ असो पुढील निरूपण॥ चालवून क्षुधित मन॥ तृप्त करीं आमचें पूर्ण॥ तैंव

क्ता बोले॥ १॥ निष्काम कर्मे जो जन्मला॥ चत्वारी साधनें शोभला॥ तो पूर्ण श्रीगुरु सेवेला॥ प्रवर्ते नेम॥ २॥ ऐसा पु

रुष जो निर्द्धारीं॥ गुरुभक्त या भूमीवरी॥ एक तो श्रवणाधिकारी॥ ब्रह्मविद्येच्या॥ ३॥ ब्रह्मविद्या तो चि वेदांत॥ वेदां

त ह्मणजे निश्चित॥ वेदें निर्णयिला सिद्धांत॥ चरम जो कां॥ ४॥ निद्राहार भय मैथुन॥ पश्वादिकां हि यांचें ज्ञान॥

तेंचि मनुषीं तरी कोण॥ विशेषत्व जी॥५॥ ह्मणोन नव्हेन व्हे ऐसें॥ मनुष्यामाजि रिविशेषें॥ ब्रह्मज्ञानीं ठेविला असे॥ महा
धिकार॥६॥ तें जरी नर हा साधीना॥ तरी तो पशू हून उणा॥ ह्मणावया भय असेना॥ जानियां कदां॥७॥ भूत भविष्य
वर्त्तमान॥ कीं परमन परीक्षण॥ परी तें साचन व्हे ज्ञान॥ तारण जेणें॥८॥ यास्तव ब्रह्मज्ञान साधी॥ तोचि गण्य मनु
ष्यांमधीं॥ येर व्यर्थ जाणें उपाधि॥ भूमीशी भार॥९॥ योनि मात्र अवघे रथ॥ इंद्रियाश्वें सदा चालत॥ मन तो वाग्दो
र निश्चित॥ सारथि बुद्धि॥ १९०॥ प्राण भूमिश्च धारयाशी॥ मार्गक्रमण दिवानिशीं॥ सेवणें बहिर्विषयांशी॥ बाध
कजे का॥११॥ सारथी गाढ झोंपी गेला॥ जें तें तेचि गति अश्वांला॥ होतसे विदित सर्वांला॥ आहे चजी हें॥१२॥ हे
अवस्था स्थावरीं वसे॥ सर्वकाळ जाणा मानसें॥ आतां सोपचि परी असे॥ अवस्था भेद॥ १३॥ तिशी ह्मणिजेता हे
स्वप्न॥ जे थें ज्ञान ना पूर्णज्ञान॥ त्या अवस्थेमाजी गणन॥ पश्वादिकोंचें॥१४॥ पश्वादि जंगम निराळे॥ होतां मनु
ष्य जे राहिले॥ जागृदवस्थेचे बोलिले॥ आहेत जी ते॥१५॥ सदसद्विवेचक बुद्धि॥ वसे मनुष्य मात्रांमधीं॥ जागृ
तीची मुख्य प्रसिद्धि॥ ह्मणोनि येथें॥१६॥ या कारणें मनुष्यपण॥ श्रेष्ठ पशुस्थावरां हून॥ हें का यजी ह्मणावें सान॥

येथींचें भाग्य॥१७॥ मनुष्यदेहीं आला प्राणी॥ तेणें दुष्ट विषयां पूनि॥ परतावें तरी च जनीं॥ होय तो धन्य॥१८॥ मनुष्य
त्व हा रथवर॥ महत्पुण्यें लाभला थोर॥ सारथी वरी या चतुर॥ निश्चयी बुद्धि॥१९॥ सर्वसांग होतां या रीती॥ इंद्रिया
श्व अव्हाटा जाती॥ ते व्हां हें काय ऐसा श्रोतीं॥ आक्षेप केला॥१२०॥ वक्ता ह्मणे जी अवधान॥ दीजो ऐका या
हें कारण॥ मोहमद्या झाला प्राशून॥ सारथी भ्रांत॥१२१॥ तेणें मनोदोर तोढिला॥ पाहुनियां इंद्रियाश्वांला॥
उन्मत्तमपण करायाला॥ फावला वेळ॥२२॥ ह्मणोनियां अव्हाटा जाती॥ गर्तानरकीं उड्या घेती॥ कीं स्वर्गादि
दुर्गपावती॥ वेंघून पात॥२३॥ रजें तमें वेष्टिले प्राणी॥ त्यांची जाहली हे काहणी॥ सत्त्वाची ऐका वीकरणी॥
कवणे परी॥२४॥ जे बाधक बहिर्विषय॥ दृश्य अथवा मनोमय॥ त्यागून जो का धरी सोय॥ श्रीसर्वेश्वरीं॥२५॥
विटूनियां विषयीं येरीं॥ जैसा मण्याच्या प्रभे वरी॥ मणिबुद्धि धांवे त्यापरी॥ प्रतिमादेवीं॥२६॥ तो भक्तचि
जरी निर्द्धार॥ परी हीन कारण सार॥ सर्वेश्वरा नेणें पा मर॥ मण्याशी जैसा॥२७॥ याहून कांहीं बरा अ-
से॥ तो ईश्वरा मानी विश्वासें॥ नृ जैसा मणि भावी तसें॥ प्रभेशी मूळ॥२८॥ उत्तम जो का याही हूनि॥ प्रवेशे

अपृ० विचारें निर्गुणीं॥ करीं लाभे ज्यापरी मणि॥ कवण एक॥ ४७॥ स्वयें होऊन मणि ब्रह्म॥ सर्वी पाहें ब्रह्मा सा राम॥ उरलाच नाहीं ज्या भ्रम॥ नामरूपाचा॥ १३०॥ तो उत्तमोत्तम जाणावा॥ सिद्ध पुरुष ओळखावा॥ साधक जाणि जे स्वभावा॥ उत्तम जो तो॥ ३१॥ रत्नुकें वक्ता जों बोलत॥ तों लीन झाला स्वरूपांत॥ बोलणें राहून निर्वात॥ स्तब्ध लें ठेला॥ २२॥ पाहून श्रोते घाबरले॥ ह्मणती काय हें हें झालें॥ किती निरूपण चाललें॥ होतें उत्कृष्ट॥ २३॥ आतां जरी हा नये वृत्ती॥ वरी लरीके बीसमाधि॥ या व्याख्याना आणि पुढती॥ प्रश्नही बहू॥ ३४॥ यापरी परस्पर मात॥ करितां ही वक्ता निवृत्त॥ झाला तो न ढळे किंचित॥ स्वसुखांतूनि॥ ३५॥ मग नाम घोष गजरें॥ गर्जू लागले श्रोते सारे॥ तथापि दिसेना विचारें॥ चळ बळीचें॥ ३६॥ तेव्हां सर्व संत मंडळी॥ श्री स्वामीतें प्रार्थू लागली॥ महाराजा पाहिजे केली॥ कृपा हे आतां॥ ३७॥ कारण मुख्य तें आपण॥ येथें आह्मा आधिलें पूर्ण॥ एकों ऐकूं च निरूपण॥ पवित्र याचें॥ ३८॥ तें जरी काय येथें स्तब्धतां॥ केवी आह्मा होय तृसता॥ पाहितूं स्मरून मूळार्था॥ कीजे उचित॥ ३९॥ तेव्हां स्वामी तें वृत्ती वरी॥ येऊन बोलती ज्ञ

सर्ग ३५

श्रीराम ६

री॥ स्वस्थ व्हा एक दिनवरी॥ आज ज्या लुही॥ ४५॥ उदपीकसांग घेडेल॥ व्याख्यान होवया जाईल॥ सर्व प्रश्नोत्तरें पावाल॥ सुखानें तुह्मी॥ ४१॥ रत्नुकें बोलोनि यांमौन॥ धरितां श्रोते आनंदून॥ कंठीती रात्री शी तो दिन॥ सुखसंवादें॥ ४२॥ पुढें निद्रिस्थ सर्व झाले॥ नियमेंचि जागरा आले॥ तंव रिक्तासन देखिलें॥ वक्त्याचें तेहीं॥ ४३॥ तेणें सर्वत्र बचकून॥ पाहूं लागले श्रोते जन॥ तंव लोक करूनियां स्नान॥ देखिला येतां॥ ४४॥ सकळांशी आनंद झाला॥ मग सर्व प्रातर्विधी ला॥ सारूनियां निरूपणाला॥ ऐकाया आले॥ ४५॥ बैसल्या संत स्वस्वासनीं॥ वक्ता सकळांतें नमूनि॥ बैसली यास्व कीयासनीं॥ बोलता झाला॥ ४६॥ विश्वासें मानी ईश्वराशी॥ तो जाणा मध्यम मानसीं॥ तो चि मुमुक्षु निश्चयेंशी॥ सत्य जी सत्य॥ ४७॥ प्रतिमेशी च मानी दृढ॥ तो ही मुमुक्षु परी मूढ॥ मात्र निष्कामें न व्हे जड॥ सकाम ऐसा॥ ४८॥ याकारणें त्रिघे सात्विक॥ बोलियेले निश्चयात्मक॥ रजोगुणी तो कामनिक॥ जाणिजे बद्ध॥ ४९॥ तामस तो असंत बद्ध॥ त्यांत असती दोन भेद॥ आस्तिक नास्तिक विशद॥ जाणिजे ऐसें॥ ५०॥ कर्म करिती अभिचारा॥

तेतामस अत्यंत क्रूर॥ जयांचे मनीं लेश मात्र॥ नाहीं दया॥५१॥ अन्य तामस जे असती॥ निषिद्धाचारीं प्रवर्तती॥ परी वाक्याधार दाविती॥ स्वानुकूल जो॥५२॥ मग कल्पित कीं उचित॥ न पाहती नदादि अंत॥ प्रवर्तती कर्मी बाह्यार्थ॥ घेऊन उगा॥५३॥ नास्तिक तामस असती॥ शास्त्र मुळींच न मानिती॥ परि हें त्यागा मिथ्या नीति॥ बोलती दाऊं॥५४॥ त्यांचें मागील सर्गी चिन्ह॥ स्पष्ट दाविलें सें करून॥ आस्तिक तामस लक्षण॥ किंचित् येथें॥५५॥ असो नास्तिक मूढ असे॥ निरीश्वरमतीं प्रवेशे॥ मृगांबु सत्य भावी जैसें॥ पशु अमूक॥५६॥ ह्मण जे देहादि प्रपंच॥ सत्य मानी परी नाहींच॥ ह्मणे याशीं मूळ कोणीच॥ पशुवदुक्त॥५७॥ कोणी मुख्य नाहीं मानितां॥ भय लज्जा उडाली चिंता॥ मोहमदें ऐशी अवस्था॥ यद्बुद्धि पावे॥५८॥ ढिला बला तन्मनोदोरू॥ तेणें स्वैर इंद्रिय वारू॥ धावूं लागले अनिवारू॥ पांचा विषयीं॥५९॥ मृग गज आणि पतंग॥ भ्रमर मीन प्राणभंग॥ पावती जैसें तैसा सांग॥ प्राणिया हा ही॥६०॥ येऊनि यां नरदेहासी॥ बहिर्मुखत्वें दशा ऐशी॥ ज्यांतें अध्यात्म श्रवणाशीं॥ होती का योग्य॥६१॥ ह्मणोनि या ब्रह्म विद्येच्या॥ श्रवणा अधिकारी साचा॥ तोचि एक अंगीं जयाच्या॥ साधनें चारी॥६२॥ त्या ब्रह्म विद्येची ओळख॥ प्रथम हे

चि जीवेशैक्य॥ द्वितीय तें संबंध योग्य॥ ध्येय ध्यात्याचा॥६३॥ अनिष्टनाश इष्टप्रासि॥ प्रयोजन ज्याशीं ह्मणती॥ तृतीय चतुर्थ निश्चिती॥ अधिकारिया॥६४॥ किंवा आद्यंतो उपक्रम॥ दूज्या उपसंहार नाम॥ सयुक्तिक दाविला भ्रम॥ प्रकार तिजा॥६५॥ अभ्यासाचा प्रकार चौथा॥ पंचमार्थवादा पूर्वला॥ जी नाम प्रयोजन सत्ता॥ कीं फलश्रुति॥६६॥ स्वयें दशमें ऐशी स्थिति॥ तैशी जेथें सद्यःप्रतीति॥ प्रकार साहींशीं निश्चिती॥ वेदांत तोचि॥६७॥ या वांचून अधिकारिया॥ श्रवणोपाय तो तो वायां॥ ज्यापरी सती लागूनियां॥ वेश्याचरित्र॥६८॥ श्रवणें अर्थ आला मना॥ तेंजे उठे असंभावना॥ ते जावया लागीं मनना॥ केलें पाहिजे॥६९॥ ह्मण जे जो श्रुतार्थ पूर्ण॥ युक्तीं त्याचें अनुचिंतन॥ तया लागूनियां मनन॥ ऐसें ह्मणावें॥७०॥ विपरीत भावना नाश॥ व्हावया कीजे निदिध्यास॥ निजरूपाचा जो अभ्यास॥ निदिध्यास तो॥७१॥ विषयाकार वृत्ती वीण॥ जें का स्वरूपानुसंधान॥ निदिध्यासन किंवा ध्यान॥ नाम त्याशींच॥७२॥ चित्तशुद्धि झालिया वरी॥ एकाग्रता व्हावया पुरी॥ निदिध्यासा वीण संसारीं॥ साधन नाहीं॥७३॥ त्या निदिध्यासाचे प्रकार॥ अधिकार भेदें निर्द्धार॥ दोन भ

अमृ०
६

सतीसविस्तर॥ ऐकातेंकैसें॥७४॥कर्मेंज्ञात्याचित्तशोधन॥वेदांतश्रवणमनन॥ज्याशीप्रियमनापासून॥ सगे
सर्वहीकाळ॥७५॥तयाशीब्रह्माभ्यासेंप्राप्ति॥एकाग्रतेचीहोतऐसी॥तेथेंअरतितेपावती॥सगुणध्यानें॥७६॥ ३५
ब्रह्मचिचिंतावेंकथावें॥परस्परांशीसंवादावें॥सर्वकाळऐसेंकरावें॥तोब्रह्माभ्यास॥७७॥असतांएका
कीचिंतन॥मिळाल्यामुमुक्षुकथन॥संवादनसमसमान॥मिळतांव्हावें॥७८॥असोकर्मापुढतीजाणा॥
वेदेंकथिलीउपासना॥ननिदिध्यासनेंउपासना॥यांहितूभेद॥७९॥असंभावनाकींतेंअन्य॥नस्पर्शेचि
जयाचेंमन॥तयाशीसाक्षात्कारींपूर्ण॥श्रवणेंसिद्धि॥८०॥चारीसाहीचिन्हेंवेदांत॥जोकाबोलिला
वरीयुक्त॥तेंप्रत्येकबहुधाउक्त॥झालेंचिआहे॥८१॥म्हणोनितत्पुनःकथन॥येथेंघेतलेंआटोपून॥
करणेंचर्वितचर्वण॥जाणूनव्यर्थ॥८२॥असोश्रवणादित्रयानें॥दृग्दृश्यजालांपूर्णपणें॥दृङ्मात्र
स्वात्मत्वेंजें होणें॥प्रतीतिदिही॥८३॥तयाम्हणावेंसाक्षात्कार॥सत्यसत्यसत्यनिर्द्धार॥त्याचाकेसाअसे
प्रकार॥सावधऐका॥८४॥व्यानवाचेशींशब्ददृश्य॥दृग्दृष्टातोश्रोत्रतयास॥पाणिसमानासहस्पर्श॥ श्रीराम
६

दृश्यदृग्त्वचा॥८५॥रूपपादोदानासहित॥दृश्यद्रष्टाचक्षुत्याहोत॥रसप्राणोपस्थसंयुक्त॥दृग्जिव्हेदृश्य॥८६॥
गुदापानसंयुक्तगं ॥दृश्यविज्ञाणावाविशद॥द्रष्टाघ्राणत्याशीसुबुद्ध॥विचारेंपाहा॥८७॥श्रोत्रालागून
दृश्यपण॥द्रष्टातयाअंतःकरण॥त्वक्चक्षुदृश्यद्रष्टामन॥बुद्धित्यांक्रमें॥८८॥जिव्हाघ्राणालागींदृश्यता॥
चित्ताहंकारादृग्रूपता॥ज्ञानाधिक्यतेशीयोग्यता॥येदृग्रूपाची॥८९॥देहामाझारिजेकावृत्ति॥भेदतयेचे
दोनहोती॥निर्विकल्पएकीचीजाति॥सविकल्पान्य॥१९०॥माजीसविकल्पजेअसे॥अर्थेंद्रियांवीन
मानसें॥मनोराज्यकींकल्पीतसे॥स्वप्नाशीस्वयें॥९१॥तेव्हांभास्यअवघेंदृश्य॥दृग्रूपतासविकल्पास॥
मनादिवृत्तिजेविशेष॥सविकल्पते॥९२॥विशेषवृत्तीशीदृश्यत्व॥सामान्येंलागींदृग्रूपत्व॥विशेष
लोपेंसामान्यत्व॥उरेम्हणोनि॥९३॥मूढावस्थेंवृत्तीचीउरी॥विक्षेपहीनआहेजरी॥परंतुतेंग्रस्तवि
सारी॥ब्रह्मात्माज्ञानें॥९४॥जैसाप्रदोषींचारज्जूबाही॥तमेंलोपलापरीनाहीं॥ओळखिलारज्जुनेत्रांहीं॥
तैशीयापरी॥९५॥रज्जूपूर्णतेंओळखिला॥सर्पभासतोहीनिमाला॥अविक्षेपतेशीवृत्तीला॥ब्रह्मा

कारला ॥ ९६ ॥ तेजें का ज्ञानरूपवृत्ती ॥ दृग्दृश्य अज्ञाननिश्चिती ॥ अर्थात्मूढवृत्तीप्रती ॥ न्यूनता आली ॥
९७ ॥ आतां ज्ञानवृत्तीच राहिली ॥ ब्रह्माकारें ते मावळली ॥ पुनः जों वरी नुद्भवली ॥ तों जो का संधि ॥ ९८ ॥ ह्मण
जे वृत्युद्भवलय ॥ तदवकाश जो का होय ॥ दृश्य ह्मणावा परी काय ॥ आहे स्वरूप ॥ ९९ ॥ ह्मणोनि जें दृश्य
[illegible] ॥ ऐसा पूर्ण निश्चय जाणा ॥ जैसा तें सामानाधिकरणा ॥ अवधि शेष ॥ १ ॥ यापरी दृग्दृश्य निरासें ॥ पंचको
शांआंत रवसे ॥ तो दृङ्मात्र ब्रह्मात्मा असे ॥ सर्वत्रीं सार ॥ २ ॥ सार ह्मणजे बाह्यांतर ॥ तोचि संपूर्ण निर्वि
कार ॥ त्यावांचून अणुही मात्र ॥ नाहींच जगीं ॥ ३ ॥ मातीच सर्व नाहीं घट ॥ सारा कापूस नाहीं पट ॥ आंत बाह्य
सोनें चि गोट ॥ पाटली नाहीं ॥ ४ ॥ कैंचा सर्प अवघी दोरी ॥ रौप्य नाहींच शिंप सारी ॥ साननास्या मोठ्या लहरी
समुद्र सारा ॥ ५ ॥ तैसेंचि स्थावर जंगम ॥ नाहींच कांहीं रूप नाम ॥ परिपूर्ण एक आत्मा ब्रह्म ॥ आदिमध्यांतीं ॥ ६ ॥
व्यतिरेकान्वयें आपण ॥ आपणा लागीं ओळखून ॥ वृत्तिरहित स्वयें होणें ॥ त्या नांव ज्ञान ॥ ७ ॥ याचि न विष्ण
वादिदेव ॥ भेटतां साकार अपूर्व ॥ ज्ञान कीं साक्षात्कार नांव ॥ परी तो न व्हे ॥ ८ ॥ तो साक्षात्कार जरी होय ॥ परी

सगुणाचा निश्चय ॥ त्यासवेंचि निर्गुण प्रत्यय ॥ तो तो न व्हेचि ॥ ९ ॥ त्यासवेंचि जो प्रत्यय ज्ञाला ॥ साच ज्ञान ह्मणा
वें त्याला ॥ जेथें परोक्षापरोक्षाला ॥ अशेष हानि ॥ १० ॥ विष्णवादिकांचें दर्शन ॥ होय सुकृतेंचि करून ॥ प-
रीतें न व्हे पूर्ण ज्ञान ॥ आणि जें ऐसें ॥ ११ ॥ सिंहावलोकनें करून ॥ सज्जनीं स्मरावें श्रवण ॥ मननें शीं निदि
ध्यासन ॥ ज्ञाना शीं हेतु ॥ १२ ॥ सत्य मिथ्या जें का निवडे ॥ तें ज्ञानाचें रूप उघडें ॥ चिदचिद्ग्रंथि न खपडे ॥ तु
टला पुनः ॥ १३ ॥ कार्य जें का पूर्ण ज्ञानाचें ॥ तें आणि जें एक हें साचें ॥ वेद श्रुति बोलिली वाचे ॥ साक्षात्का
रखें ॥ १४ ॥ या नांव जी ज्ञान पवित्र ॥ सिद्धांत आणि जें निर्द्धार ॥ ऐसें बोलून निरुत्तर ॥ वक्ता तो ठेला ॥ १५ ॥
संत ह्मणती रे शाबास ॥ व्याख्यान त्वां केलें सरस ॥ झालें जैसा होता मानस ॥ आमचा तें सें ॥ १६ ॥ हें आ
ह्मी ह्मणावें केवळ ॥ ऐसें नाहीं तुझें रसाळ ॥ बोलचि येथें गा निर्मळ ॥ देता ती साक्ष ॥ १७ ॥ यापरी बोलू
न ह्मणती ॥ पुढिलिया प्रश्नाची स्थिती ॥ वर्णी बापा यथानिगुती ॥ असेल जैशी ॥ १८ ॥ बोबडया बोलें
ह्मणे वक्ता ॥ प्रिय बाळाच्या माता पिता ॥ संतोषती त्याच अवस्था ॥ आपणा मी ही ॥ १९ ॥ ह्मणोनि या जें जें बो

लेन॥ तेंतेंकरालचिकींमान्य॥ पडूंनंदेलाकांहींन्यून॥ तिळमात्रंकैं॥२२०॥ त्याअर्थीसज्जनींआपुला॥ ह्मणविलेंआहेजीमला॥ त्याअर्थीकिकेलसांभाळा॥ ज्यापरीतुह्मा॥२२१॥ रघुकें वक्तातोबोलून॥ जाह लापाहूनिमध्यान्ह॥ उठला घेऊनिसज्जन॥ भोजनालागीं॥२२२॥ इ० अ० ज्ञानस्वरूपव्या० पंचदश सर्गः समास॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥ ॥

